हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थे' नें पुरस्कार केलेलें चरित्र-पुस्तक

# भाग्यवान् शतायुषी

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY
20 SEP 1958
LIBRARY

य. गो. नित्सुरे

8719

KRC, SNDT W.U., Churchgate
M923.754 008719
Kar/Nit

मूल्य रु. १·२५

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
एप्रिल १९५८

सर्व हक्क
प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणें २

मुद्रक :
य. गो. जो[illegible]
आनंद मुद्रणाल[illegible]
१[illegible] सदाशिव : पुणें २

MINISTER
GOVERNMENT OF BOMBAY

सचिवालय, मुंबअी १.
२० चैत्र १८८०
(१०-४-१९५८)

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या जन्मशताब्दीच्या मंगल प्रसंगी श्री. य. गो. नित्सुरे यांनी खास विद्यार्थ्यांकरितां हे चरित्र लिहिण्यांत फार औचित्य दाखविले आहे. महर्षि कर्वे यांनी त्यांच्या विद्यार्थीदशेंत आपली विद्यापूर्ण करण्याकरितां जे अपार कष्ट सोसले व त्या काळांत त्यांच्या मनावर तत्कालीन समाज स्थितीचे जे संस्कार झाले त्याची श्री. नित्सुरे यांनी या चरित्रांत तपशीलवार माहिती दिली आहे. श्री. नित्सुरे यांच्या पुस्तकांतील भाषा सोपी असून मांडणी तर्कशुध्द आहे. चरित्र नायकासंबंधी त्यांच्या मनांत निस्सीम आदरभाव वसत असल्यामुळे त्यांच्या विवेचनांत अेक विशिष्ट तळमळ दिसून येते.

महर्षि कर्वे यांच्या अलौकिक जीवनापासून स्फूर्ति घेअून युवकांमध्यें समाजकार्य करण्याबद्दलची आवड निर्माण व्हावी हा चरित्र लिहिण्यामागील लेखकाचा अुदात्त हेतू सफल होवो अशी अिच्छा मी व्यक्त करतों व डॉ. कर्वे यांच्या जन्म शताब्दीच्या निमित्ताने हे पुस्तक तरुण वाचकांच्या हाती दिल्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो.

यशवंतराव चव्हाण

(यशवंतराव चव्हाण)

## लेखकाचें निवेदन

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांचें विद्यार्थ्यांकरितां एकादें छोटें चरित्र लिहावें अशी कल्पना गेलीं बरींच वर्षें माझ्या मनांत घोळत होती. दीड वर्षापूर्वी 'महाराष्ट्राचे सुपुत्र' या माझ्या पुस्तकाकरितां अण्णांसंबंधीं छोटासा लेख जेव्हां मी तयार केला त्यावेळीं त्यांचें संपूर्ण चरित्र लिहिण्याची कल्पना माझ्या मनांत स्थिर झाली व प्रस्तुत पुस्तकाचा आराखडा तयार होऊन लगेच बराचसा भाग लिहून हातावेगळाहि झाला. परंतु पुढें कांहीं कांहीं अडचणींमुळें पुस्तक पूर्ण करण्याचें राहून गेलें.

इतक्यांत, गेल्या कांहीं महिन्यांपासून अण्णांच्या आगामी जन्मशताब्दीच्या समारंभाच्या वार्ता वृत्तपत्रांत झळकूं लागल्या. जन्मशताब्दीनिमित्त जनतेनें अण्णांच्या संस्थांना कांहीं मदत द्यावी असेंहि 'हिंगणें स्त्रीशिक्षण संस्थे'च्या चिटणीसांचें निवेदन माझ्या वाचनांत आलें. तें वाचून मी विचारांत पडलों. मी अण्णांच्या संस्थेला काय देऊं शकेन असा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला. सध्याच्या माझ्या परिस्थितींत पैशाच्या रूपानें देणगी देणें मला शक्य नाहीं हें उघडच होतें. म्हणूनच माझ्या मनाला अवघडल्यासारखें होत होतें. पण त्यांतूनच एक कल्पना जन्माला आली.

ती कल्पना अशी कीं, अण्णांचें जें चरित्र मी अपूर्ण ठेवलें होतें तें पूर्ण करावें व त्याच्या लेखनांतून मिळणाऱ्या प्राप्तीचा कांहीं वांटा हिंगणें संस्थेला अर्पण करावा. माझे मित्र व 'व्हीनस प्रकाशन' या नामवंत प्रकाशन संस्थेचे चालक श्री. स. कृ. पाध्ये यांच्याजवळ मी माझी कल्पना जेव्हां मांडली तेव्हां ते म्हणाले, 'तुमच्याप्रमाणेंच माझ्याहि प्राप्तीचा वांटा हिंगणें संस्थेला देण्यांत मला धन्यताच वाटेल.' श्री. पाध्ये यांच्या हृदयांतील समाजहितबुद्धि इतकी जागृत आहे हें पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ?

मग मी ' हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थे ' चे चिटणीस श्री. भास्करराव कर्वे यांना भेटलों व आमचा विचार त्यांच्यापुढें ठेवला. त्यांना तो पसंत पडला. त्यांच्या सहकाऱ्यांनाहि संमत झाला. त्यामुळेंच हें पुस्तक ' हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थे ' नें पुरस्कृत केल्याचा मान मिळवूं शकलें आहे.

शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां कशा प्रकारें चरित्रें लिहिलीं जावीं यासंबंधीं मी सध्यां प्रयोग करीत आहें. ' महाराष्ट्राचे सुपुत्र ' या पुस्त-कांत जें धोरण मीं अवलंबिलें आहे तें धोरण असें कीं चरित्रनायकाच्या पूर्ववयांतील म्हणजे जीवनाच्या तयारीच्या काळांतील घटना अधिक विस्तारानें सांगणें. सुमारें अकराबारा वर्षांपासून वरील वयाच्या मुलांच्या मानसिक गरजा व संवेदनक्षमता ध्यानांत घेऊन ही योजना मीं आंखली आहे. शिक्षक, पालक व विद्यार्थी अशा सर्वांनाच ती उपयुक्त वाटेल व पसंत पडेल असा विश्वास वाटतो.

गेल्या आठदहा वर्षांत अण्णांच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ मला अनेक प्रसंगीं घेतां आलेला आहे. हें मी माझ्या जीवनांतील महद्भाग्य समजतो. असेंच भाग्य आणखी कित्येक वर्षे वाट्यांस येवो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

मुद्रण-प्रत तयार करण्यासंबंधीं माझे विद्यार्थि-मित्र रा. श्रीपाद देशपांडे व रा. वसंत चितळे यांनीं आपुलकीनें बरेंच साहाय्य केलें.

' आनंद प्रेस ' च्या कामाचा लौकिक सुविख्यात आहे. प्रेसचे चालक श्री. यशवंत जोशी व त्यांचे इतर सहकारी यांनीं आमची अतिशय घाई असूनहि सुबक व वेळेवर काम पूर्ण करून दिलें. या सर्वांच्या साहाय्याचा मी कसा उतराई होऊं ? त्यांच्या ऋणांत राहाणेंच मी पसंत करितों.

१३ एप्रिल १९५८
३८।१४ एरंडवणा
प्रभात रस्ता, पुणें ४

—य. गो. नित्सुरे

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | भाग्यवान् शतायुषी | १ |
| २ | निग्रही पिता व प्रेमळ माता | ५ |
| ३ | शिक्षणाची सुरुवात | १० |
| ४ | बालपणांतील कांहीं प्रसंग | १३ |
| ५ | शिक्षणांतील पहिला अडथळा | २० |
| ६ | अडचणींचें स्वरूप | २३ |
| ७ | सोमण गुरुजी | २७ |
| ८ | शिक्षणांतील दुसरा अडथळा | २८ |
| ९ | प्रवासाचें अपूर्व साहस | ३० |
| १० | इंग्रजी शिकण्याची संधि | ३९ |
| ११ | शिक्षणांतील तिसरा अडथळा | ४२ |
| १२ | मुंबई | ४५ |
| १३ | रॉबर्ट मनी स्कूल | ४८ |
| १४ | एक अनपेक्षित संकट | ५१ |
| १५ | अडचणींवर यशस्वी मात | ५३ |

१६ एक मित्र ५८
१७ कॉलेज-जीवन ६२
१८ विद्यादानाकडे वळले ६५
१९ समाज-ऋण कसें फेडूं ? ६९
२० समाजसेवेचे कांहीं प्रयोग ७२
२१ एक सांसारिक आपत्ति ७५
२२ पत्र कीं स्वप्न ? ७७
२३ विवाह कोणाशीं ?—विधवेशींच ७९
२४ ‘ माझे अश्रू पूस ’ ८३
२५ अण्णांनीं पुनर्विवाह केला ८५
२६ जीवनाचें आव्हान ८७
२७ स्त्रियांचा कैवारी ८८
२८ अपूर्व यशाचे धनी ९१
२९ अण्णांचा स्वभाव व आवडीनिवडी ९५
३० आजचे ‘ भारतरत्न ’ अण्णा ! ९८

* * *



आजचे अण्णा

माझ्या छोट्या मित्रांनो,

तुमच्या आयुष्यांत कितीहि अडचणी आल्या तरी नाउमेद होऊं नका. धैर्य खचूं देऊं नका. आपली विद्या पूर्ण करा. स्वतः मोठे व्हा, आपल्या आईवडिलांना समाधान द्या आणि सर्वांची आई जी भारतमाता तिचें वैभव वाढवा.

धों. के. कर्वे
१८-४-५८



महर्षि व राष्ट्रपति



कै. सौ. आनंदीबाई कर्वे

* * * * * * * * * *

# भाग्यवान् शतायुषी !

... केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांचं नांव तुम्ही ऐकलं ... गृहस्थ फार थोर आहेत आणि समाजाच्या सुधारणेसाठीं ...च्या उन्नतीसंबंधीं व शिक्षणासंबंधीं त्यांनीं फार मोठं कार्य ... त्यांचा लौकिकहि तुमच्या कानावर आला असेल.) ...संबंधीं तुम्ही असंहि ऐकलं असेल कीं, या वर्षींच्या ... सालच्या एप्रिल महिन्याच्या १८ तारखेला त्यांच्या ... वर्षं पूर्ण होऊन त्यांना एकशें एकावें वर्ष लागणार आहे. ... भाग्यवान् आहेत हे गृहस्थ ' असें तुमच्यांपैकीं प्रत्येकाला ... नवल नाहीं. शंभर वर्षं जगणारीं माणसं फार विरळा ...पन्नास लाखांत एकाद्यालाच ' शतायुषी ' होण्याचं भाग्य ... ! ' शतायुषी भव ' ( म्हणजे ' शतायुषी व्हा ' ) असा ... प्रवासाला निघतांना तुम्ही वाकून नमस्कार केला म्हणजे ...न तुम्हांला ऐकायला मिळत असेल. परंतु प्रत्यक्षांत ... भाग्य वाट्याला येणं हें मात्र अत्यंत दुर्मिळ समजलं

... की, महर्षि कर्वे हे शतायुषी होण्यांत यशस्वी झाले ... त्यांचा मोठेपणा नाहीं. आपल्या समाजाची सेवा

करण्यांत आपली हयात त्यांनीं वेंचली आहे. समाजासाठीं कष्ट न करता आरामशीरपणानें ते आपले आयुष्य जगलेले नाहींत. त्याचप्रमाणें एकाद्या कुशल धन्वंतऱ्याच्या हातांत आपली नाडी सतत ठेवून भारी किंमतीचीं परदेशी औषधें घशाखालीं लोटत त्यांनीं परावलंबीपणानेंहि रडतखडत शंभरी गांठलेली नाहीं. वयाला शंभर वर्षें पूर्ण होत आलीं असूनहि अंथरुणांत लोळून ते आपला दिवस काढीत नाहींत किंवा इतर माणसांची सेवाहि फारशी घेत नाहींत. दिवसाकाठीं तीनचार तास ते वाचनांत घालवितात व तास दीडतास रेडिओ ऐकतात. अलीकडे त्यांना थोडेसें कमी ऐकूं येतें. परंतु त्यांचीं इतर इंद्रियें बरींचशीं शाबूत आहेत. त्यामुळें अद्यापहि सार्वजनिक सभांच्या व समारंभांच्या निमित्तानें अधून-मधून जनतेला त्यांचें दर्शन घेतां येतें.

महर्षि कर्वे यांचें वास्तव्य नित्य पुण्यांत असतें. काल सकाळींच मी त्यांच्या घरीं जाऊन आलों. असाच अधूनमधून, महिना दोन महिन्यांनीं मी त्यांचें दर्शन घेण्यास जात असतों. कारण त्यामुळें आपल्या मनाला शांति लाभते व आपल्या मनाचा उत्साह वाढतो असा माझा अनुभव आहे. काल सकाळीं जेव्हां मी त्यांच्याकडे गेलों होतों तेव्हां ते बाहेरच्या व्हरांड्यांतील खुर्चीवर बसलेले होते. खालीं वांकून मी त्यांना नमस्कार केला. तेव्हां त्यांनीं आपल्या जाड भिंगांच्या चष्म्यांतून माझ्याकडे निरखून पाहिलें व स्मित केलें. अण्णांनीं (महर्षींना आप्तेष्ट मंडळी 'अण्णा' असं म्हणतात व या पुस्तकांत त्या नांवानें मीहि त्यांचा उल्लेख करणार आहें) मला ओळखलं कीं नाहीं असा एक क्षणभर मला संशय पडला व म्हणून 'मी अमुक, अमुक' असं मीं म्हटलें. त्यावर ते आपल्या अस्सल कोंकणी स्वरांत मोठ्यानें उद्गारले, 'होय! होय! ओळखलें' आणि त्यानंतर ते पुनः मोकळेपणानें हंसले. यानंतर मी त्यांच्याजवळ थोडेसें संभाषण केलें. फार बोललों नाहीं. अण्णांना



बोलण्याचा त्रास फार देऊं नये अशी भावना त्यांत होती. मात्र, पांच-दहा मिनिटें त्यांच्या शेजारीं मी न बोलतांच बसून राहिलों. पण, असं नुसतं अण्णांच्या शेजारीं बसण्यानेंहि माझ्या अंतरात्म्याला विलक्षण सुख होत होतं!

याचं कारण काय असावं बरं?

याचं कारण हेंच असावं कीं, अण्णांकडे पहात असतां असतां वर्तमानकाळांतून माझं मन उडालं व भूतकाळांत संचार करूं लागलं. अण्णांच्या गतायुष्याचा शंभर वर्षांचा धांवता चित्रपट मनश्चक्षूंपुढें आणण्यांत माझं मन रमून गेलं.

अण्णांच्या जीवनचरित्राचा मी आपल्या परीनें आजवर पुष्कळ बारकाईनें अभ्यास केला आहे. (अण्णांनीं आपलं आत्मचरित्र लिहून तें पुस्तकरूपानं प्रसिद्ध केलं आहे. आपल्या जन्मापासूनची सारी हकीगत त्यांनीं त्यांत रसाळपणानें सांगितली आहे.) काल सकाळीं अण्णांकडे पहात असतां ती सारी हकीगत, विशेषतः त्यांतले वेचक वेचक प्रसंग, माझ्या डोळ्यापुढें आले आणि समोर बसलेल्या अण्णांची जीवनसरिता हळूहळू मार्गक्रमण करीत कसकशी मोठी मोठी होत गेली व आजच्या वैभवशाली अवस्थेला पोंचली असा आदराचा व कौतु-काचा विचार माझें मन व्यापून टाकूं लागला.

मित्रहो, अण्णांचं सारं जीवनच अत्यंत अद्भुत आहे. अशक्य वाटणाऱ्या कितीतरी गोष्टी त्यांनीं शक्य करून दाखवल्या आहेत. प्रतिकूल परिस्थितीशीं त्यांनीं बालपणापासून जो झगडा दिला आहे त्याची हकीगत तर अत्यंत स्फूर्तिदायक आहे.

अण्णांच्या जन्मदत्त परिस्थितींत व विद्यार्थिदशेंतील वातावरणांत अनुकूलता अशी फारच थोडी होती. अनुकूल वारा असला तर जहाज इष्ट स्थळीं पोचणं फार सोप असतं. परंतु अण्णांच्या विद्यार्थिदशेंत

व तरुणपणीं अनुकूल वारे क्वचितच सुटले.)त्यांच्या जीवनरूपी खेळांत चांगलं दान क्वचितच पडलं; त्यांच्या हातीं चांगले पत्ते क्वचितच आले. जणूं, दैवानें निर्दयपणानें प्रतिकूलतेचं कांटेरी कुंपणच त्यांच्याभोंवतीं जन्मापासून उभं केलं होतं !

श्रीमंत व वजनदार आईबापांचा भाग्यवान् मुलगा म्हणून दैवानें त्यांना जन्माला घातलं नाहीं. दिसायला त्यांना जसं सुंदर केलं नाहीं, तसंच असामान्य बुद्धीची देणगी त्यांना बहाल केली नाहीं किंवा धडधाकट प्रकृतीची शिदोरी बांधून देऊनहि दैवानें अण्णांची या जगांत रवानगी केली नाहीं. इतर माणसांवर छाप पडेल असं रुबाबदार व आकर्षक व्यक्तिमत्व त्यांना दिलं नाहीं. पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांत त्यांना जन्माला घातलं नाहीं, इतकंच काय परंतु ज्या गांवीं एकहि इंग्रजी शाळा नव्हती अशा खेडेगांवीं जन्माला घातलं. अतिशय कुशल व बुद्धिमान् शिक्षकांचें मार्गदर्शन मिळण्याचा योगहि त्यांच्या आयुष्यांत फारसा जमून येऊं दिला नाहीं. उच्च पदावर असणारे दूरचे अगर जवळचे नातेवाईकहि त्यांना ठेवले नाहींत. एखाद्या मातबर व वजनदार पुढाऱ्यानें अगर तिऱ्हाइतानें अण्णांमधील सुप्तगुण पाहून त्यांना आपला मुलगा अगर शिष्य मानून आपल्या अनुभवाचा व लौकिकाचा वारसा त्यांना द्यावा असाहि योग दैवानें जमवून आणला नाहीं. एखाद्या अविवाहित मुलीचा संपन्न स्थितींतील हौशी बापहि त्यांच्यावर फिदा झाला नाहीं ! मग विलायतेला जाऊन शिक्षण घेण्याची त्या काळांत अत्यंत दुर्मिळ असणारी संधि दैव त्यांच्यासाठीं कसें निर्माण करील ?

जणूं तलवार उपसूनच दैव पूर्ववयांत अण्णांपुढें उभें राहिलें होतें ! परंतु अशा भयंकर प्रतिकूलतेवर अण्णांनीं अखेर मात केल्यामुळें पुढें पुढें दैवहि त्यांच्या भजनीं लागलें व (स्वप्नांतहि खऱ्या न वाटणाऱ्या



गोष्टी यशस्वी करण्यास दैवानें अण्णांना मदत केली, असें विलक्षण दृश्य आज आपणाला दिसत आहे. यामुळेंच अण्णांच्या जीवनाचा इतिहास अत्यंत स्फूर्तिदायक झालेला आहे. त्यांत अद्भुतता आली आहे; नाट्य निर्माण झालं आहे. विशेषतः, शाळाकॉलेजांतील तुम्हां विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें तर अण्णांचें चरित्र अनेक दृष्टींनीं मार्गदर्शक व उत्साहवर्धक ठरेल असें झालें आहे.)

म्हणूनच अण्णांचं जीवनचरित्र तुमच्यापुढं ठेवावं असा बेत मी केला आहे.

* * *

## प्रकरण दुसरें

* * * * * * * * * * * * * *

## निग्रही पिता व प्रेमळ माता

(अण्णांच्या जन्माच्या वेळीं कर्वे कुटुंबाची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची झाली होती.)सुमारें पन्नास शंभर वर्षें आधीं जर अण्णा कर्वे कुलांत जन्माला आले असते तर त्यांचें बालपण अत्यंत ऐश्वर्यांत गेलें असतें. (थोरले बाजीराव पेशवे व नानासाहेब पेशवे यांच्या कालापासून कर्वे कुटुंबांतील कांहीं व्यक्तींनीं पुण्यामध्यें आपल्या सावकारीचा जम फार यशस्वी रीतीनें बसविला होता. खुद्द पेशव्यांशीं त्यांचा देवघेवीचा व्यवहार होता असें शके १६६६ पासूनचे (म्हणजे सन १७४४ पासूनचे) कर्व्यांच्या दुकानाचे जे ताळेबंदाचे कागद इतिहाससंशोधकांना सांपडले आहेत त्यावरून दिसून येतें. पुढें पुढें हा व्यवहार पुष्कळच वाढत गेला व पेशव्यांचे अनेक सरदारहि कर्व्यांचे ऋणको झाले.)

अर्थात्, कोणत्याहि कुटुंबांत लक्ष्मीनें एका प्रमाणापेक्षां अधिक अस्ताव्यस्तपणें व नखरेलपणानें आपला डामडौल मिरविण्यास सुरुवात केली कीं, त्या कुटुंबांत नव्यानें जन्माला येणाऱ्या मुलांचा विकास खुरटतो. लक्ष्मी व सरस्वती एका घरांत नांदावयाच्या असल्या तर त्या दोघींपैकीं कोणीच चढेलपणें वागून चालत नाहीं. सरस्वतीच्या चढेलपणानें ( म्हणजे विद्वेच्या अगर बुद्धिमत्तेच्या अतिरेकी अहंकारानें ) लक्ष्मी रुसते आणि लक्ष्मीच्या चढेलपणानें ( श्रीमंतीच्या अगर पैशाच्या अरेरावी मस्तीनें ) सरस्वतीची गैरमर्जी होते. दुर्दैवानें हा साधा व अबाधित नियम अनेक कुटुंबांच्या लक्षांत येत नाहीं. त्यामुळें अंगच्या कर्तबगारीवर दोनतीन पिढ्यांमध्यें अत्युच्च शिखरावर गेलेलीं कुटुंबें पुढील एकदोन पिढ्यांमध्यें जमीनदोस्त होतांना आढळतात.

दुर्दैवानें कर्वे कुलाची गतहि अशीच झाली. त्यांचे पूर्वज कोंकणांतील मुरूड या एका लहान गांवांतून देशावर येऊन पेशवाईच्या काळांत आपले नशीब काढूं शकले. त्या काळांत पुण्यामध्यें कित्येक वाडे व जमीनजुमला ते विकत घेऊं शकले आणि मुरूड गावांतहि त्यांनीं बरीच इस्टेट केली. पुष्कळ सोनेनाणेंहि खरेदी केलें. परंतु पैशाच्या धुंदींत मूळची हिंमत व कर्तबगारी यांनीं कुटुंबांतून हळूहळू पलायन केलें. त्यामुळें सन १८४३ मध्यें कर्वे कुटुंबांतील व्यक्तींवर 'ज्या ठिकाणीं पूर्वीं फुलें वेचलीं त्या ठिकाणीं गोंवऱ्या वेंचण्याची ' पाळी आली.

( अण्णांचे वडील व त्यांचे दोन बंधु यांच्यांत सन १८४३मध्यें ज्यावेळीं कुटुंबांतील इस्टेटीचें वाटप झालें त्यावेळीं मालमत्तेपेक्षां कर्जाचा बोजाच अधिक आहे असें आढळून आलें. या तीन बंधूंच्या आजोबांनीं मुरुडांतील ज्या चौसोपी वाड्यांत बसून सन १७६२ मध्यें आपल्या मालमत्तेची मोजदाद केली त्याच वाड्यांत सुमारे ८१ वर्षांनीं ही मालमत्तेची मोजणी चालली होती. परंतु आजोबांच्या व नातवंडाच्या



ऐश्वर्यांत केवढा फरक पडला होता ! एकच उदाहरण द्यायचें तर ' पुतळ्या ' या सोन्याच्या दागिन्यांच्या प्रकाराचें देतां येईल. सन १७६२ मध्यें आजोबांनीं पुतळ्यांची मोजदाद केली तेव्हां त्यांची संख्या ५१९२ भरली आणि १८४३ सालीं नातवंडांना आपल्या घरांत स्वतःच्या मालकीची एकही पुतळी तर सांपडली नाहींच, परंतु उसन-उधारीवर तिऱ्हाइताकडून आणलेल्या तीन पुतळ्या मात्र सांपडल्या ! वंशपरंपरा हातीं आलेला मुरूड गांवांतील एक जुना वाडा ( पुण्यांत कर्वे कुटुंबाच्या मालकीची थोडीशीहि इस्टेट यावेळपर्यंत उरली नव्हती) व बाहेरचा पोकळ डामडौल यांचीच विभागणी अण्णांचे वडील व त्यांचे दोन बंधू यांना करून घ्यावी लागली ! तात्पर्य असें कीं, त्यांच्या हातीं प्रत्यक्ष उपयोगाचें म्हणून कांहींच धन आलें नाहीं; उलट प्रत्येकाच्या नांवावर ज्यानें त्यानें फेडावें म्हणून थोडेसें कर्जच टाकण्यांत आलें. )

( या दुःखद घटनेचा परिणाम अण्णांच्या वडिलांच्या व आईच्या मनावर किती खोल झाला असेल याची सहृदय वाचकांनीं कल्पनाच केलेली बरी ! अशा या आपत्तीच्या वेळीं सर्वसामान्य माणसें खचून जातात व निरुत्साही बनतात. परंतु अण्णांच्या वडिलांनीं व आईनें दैवगति लक्षांत घेऊन प्राप्त परिस्थितीशीं झगडा देण्याचें ठरविलें.) आपणावर गरिबी आली आहे हें त्या दोघांनीं जाणलें व घराण्याच्या खोट्या प्रतिष्ठेला बळी न पडतां बदललेल्या परिस्थितीला आवश्यक असा बदल त्यांनीं स्वतःमध्यें केला.

( कर्वे कुटुंबांतील व्यक्तीनें जेवूनखाऊन पंचवीस रुपयांची कारकुनाची नोकरी एकाद्या कुग्रामांत पत्करणें म्हणजे मरणापेक्षांहि अपमानास्पद असें त्याकाळीं समजलें गेलें असतें. परंतु बाबांनीं (अण्णांच्या वडिलांनीं) तो मार्ग धैर्यानें चोखाळला. आपला पराभव मान्य न करणारा पुनः यशोगिरीवर

चढूं शकत नाहीं हें ओळखून बाबांनीं आपल्या आयुष्यांत माघार घ्यावयाची ठरविलें. परंतु ही माघार तात्पुरती ठरली पाहिजे, एकदोन पिढ्यांमध्यें पुनः ऐश्वर्याचे दिवस आपल्या कुळाला दिसले पाहिजेत असें महत्त्वाकांक्षी ध्येय त्यांनीं स्वतःपुढें ठेवलें. सुदैवानें या नव्या अवघड वाटचालींत आपल्या पत्नीची जोड बाबांना लाभली. पतिपत्नींचीं तोंडें एका दिशेला असलीं तरच संसाराची प्रगति योग्य प्रकारें होऊं शकते. बाबा व आई यांनीं एकमतानें व एकजुटीनें दारिद्र्याशीं दोन हात करण्याचें ठरविलें व त्यामुळेंच गरिबींतहि त्यांच्या कुटुंबांतील आनंद व समाधान लोप पावलें नाहीं.

कांहीं झालें तरी कर्ज काढावयाचें नाहीं असा निश्चय त्यांनीं केला व तो तडीसहि नेला. परंतु त्यामुळें खर्चाबाबत विलक्षण काटकसर करावी लागली. बाबांचा स्वभाव अत्यंत निग्रही तसाच अत्यंत शांत होता. त्यांना राग म्हणून कसा तो यावयाचा नाहीं. सकाळीं उठल्यापासून रात्री निजेपर्यंत ते सारखे कामांत असावयाचे. आळस कसा तो त्यांना माहीत नव्हता. त्यामुळें आपल्या नोकरीच्या कामाव्यतिरिक्त पैसा मिळविण्याचे छोटे छोटे मार्ग ते अंमलांत आणीत. त्याचप्रमाणें पैसा मिळविण्याचा जो एक महत्त्वाचा उपाय म्हणजे काटकसरीनें वागून पैसा वांचविणें त्याची अंमलबजावणीहि बाबा व आई यांनीं अत्यंत कसोशीनें केली. 'थेंबे थेंबे तळें साचे' हा बहुमोल धडा त्यांनीं आचरणांत आणला. बंधूंमध्यें मालमत्तेची व कर्जाची वाटणी झाल्यापासून पंधरावीस वर्षें घरांत त्यांनीं कधीं खऱ्या अर्थानें सण साजरा केला नाहीं. मुलांच्या मुंजी केल्या त्याहि अत्यंत साधेपणानें. इतर लोक हंसतील किंवा नांवें ठेवतील असा खोटया मोठेपणाचा विचार मनांत आणला नाहीं.

असं काटकसरीनं वागत असतांना त्यांनीं आपली गरीबी लोकांपुढें उघडीहि केली नाहीं. त्यांनीं कोणाकडून जसं कर्ज काढलं नाहीं



त्याचप्रमाणें कोणापुढें दीनवाणेपणानें हात पसरून 'दान' किंवा 'दक्षिणा' घेतली नाहीं. कर्वे कुलाचा अभिमान व स्वतःचा स्वाभिमान यांचें त्यांनीं सतत संरक्षण केलें.

आपला कुलाभिमान रक्षण करण्यासाठीं बाबा व आई कसे बाणेदार-पणानें वागत याचें एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. अण्णा लहान असतांना घडलेली ही गोष्ट आहे. बडोद्याच्या महाराजांनीं गांवोगांवच्या ब्राह्मणांना गोप्रदानें देण्याचें जाहीर केलें. महाराजांच्या कुटुंबांतील प्रमुख व्यक्ति निवर्तल्यामुळें प्रत्येक ब्राह्मणाला दहा रुपयांचें दान देण्यांत येणार होतें ( त्यावेळचे दहा रुपये म्हणजे आजचे शंभर दीडशें रुपये ) त्यामुळें गांवोगांवच्या ब्राह्मणांच्या तोंडाला पाणी सुटलें. ज्याची मुंज झाली असेल तो ब्राह्मण अशी 'ब्राह्मण' शब्दाची सोपी व्याख्या होती. अण्णांच्या वडील भावाची म्हणजे दादांची त्यावेळीं मुंज झालेली होती. मुरूड गांवांतील अनेक ब्राह्मणांनीं प्रत्येकीं दहा दहा रुपये मिळविले. तेव्हां दादांनाहि इच्छा झाली व 'मी जाऊन दहा रुपये घेऊन येऊं का?' असें त्यांनीं आईला विचारलें. तेव्हां आई म्हणाली 'बाबारे, दक्षिणेसाठीं हात पसरणाऱ्यांच्या वंशांत तुम्ही जन्माला आलां नाहीं. तुमचे पूर्वज मोठ्या नांवलौकिकाचे होते. तुमचे वडील गरीब असले तरी कुलाभिमान विसरलेले नाहींत. त्यांनीं कोणापासून कधीं दान घेतलें नाहीं. आणि त्यांतून, ज्यांच्याकडे तुमचें लाखों रुपये येणें आहे ( बडोद्याच्या गायकवाडांनीं कर्वे यांजकडून ऐन पेशवाईंत पुष्कळ कर्ज घेतलें होतें व तें गायकवाडांनीं परत केलें नव्हतें अशी कर्वे कुटुंबांतील सर्वांची समजत होती ) त्या बडोदे सरकारचें अवघ्या दहा रुपडयांचें मरतिकाचें दान तुम्ही घेणार? तेव्हां ही गोष्ट तूं स्वप्नांतहि आणूं नकोस.' आईनें असा बाणेदार धडा मुलांना घालून दिल्याचें बाबांना जेव्हां समजलें तेव्हां त्यांना किती आनंद झाला असेल म्हणून सांगावें?

* * *

## प्रकरण तिसरें

* * * * * * * * * * * * *

### शिक्षणाची सुरुवात

ज्या कष्टाळू, प्रेमळ, स्वाभिमानी व निग्रही मातापित्यांच्या शिस्तशीर संसाराचें वर्णन गेल्या प्रकरणांत मीं केलें त्यांच्या पोटीं वैशाख शुद्ध ५ शके १७८० म्हणजे तारीख १८ एप्रिल १८५८ या दिवशीं अण्णांचा जन्म झाला.

अण्णांच्या जन्माच्या वेळीं घरांत एकच मुलगा होता. त्याचें नांव भिकू ऊर्फ दादा. अण्णा जन्मले तेव्हां दादा सुमारें पांच वर्षांचे असतील. दादांच्या पूर्वीं आईला तीन मुलें झालीं होतीं. परंतु तीं अल्पवयांतच निवर्तल्यामुळें आई–बाबा मनांतून दुःखी होते. अशा स्थितींत भिकूच्या पाठीवर मुलगाच झाल्यानें आई व बाबा यांना फार आनंद झाला. परंतु या आपल्या मुलाला दृष्ट लागूं नये म्हणून त्यांनीं त्याचें नांव धोंडू असें ठेवलें. त्याकाळीं भाविक बायकांत अशी समजूत होती कीं मुलाचं नांव भिकू, धोंडू, दगडू असें साधसुधं ठेवलं कीं, कोणाची इडापिडा बाधत नाहीं व मुलं दीर्घकाळ लाभतात. त्यामुळें अण्णांचें नांव ‘ धोंडू ’ असें ठेवण्यांत आलें.

अण्णांचा जन्म त्यांच्या वडिलांच्या मुरूड या गांवीं न होतां शेरवली या आईच्या गांवीं झाला. शेरवली हें गांव मुरूड गांवापासून अवघ्या पंधरा मैलांवर आहे. या गांवच्या परांजपे घराण्यांत अण्णांचें आजोळ होतें. रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे ( पुणें विद्यापीठाचे सध्याचे उपकुलगुरु ) व अण्णा हे आतेमामेभाऊ आहेत. अण्णांची आई ती रँग्लर परांजपे यांची आत्या.

समजायला लागल्यापासून अण्णा मुरूड येथेंच लहानाचे मोठे



झाल्यामुळें मुरूड गांव हीच अण्णांची जन्मभूमि असें नेहमीं मानण्यांत येते. मुरूड हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांत मुंबईच्या दक्षिणेस ९० मैलांवर वसलेला आहे. दापोली तालुक्यांतील एक सुखवस्तु व पुढारलेला गांव म्हणून हा गांव त्याकाळींहि मान्यता पावलेला होता. शिवाय सृष्टि-सौंदर्याच्या दृष्टीनें हा गांव अतिशय सुंदर आहे. समुद्रकाठीं असल्यानें तेथील हवा फार उत्तम आहे. गांवाची आंखणीहि फार नमुनेदार आहे.

वेदविद्येसंबंधानें पूर्वीं या गांवाची फार प्रसिद्धि होती. आधुनिक काळीं विद्येच्या प्रसाराला हा गांव योग्य आहे असें इंग्रजी राज्याच्या सुरुवातीलाच सरकारी अधिकाऱ्यांच्या लक्षांत आलें. त्यामुळें १ ऑगस्ट १८३४ रोजीं मुरूड येथें एक मराठी शाळा सरकारतर्फे स्थापन करण्यांत आली. अण्णांच्या बाळपणींहि या शाळेंतून अनेक विद्यार्थी बाहेर पडून समाजांत प्रसिद्धि पावत होते.

अशा या गांवांत आपल्या मुलांचें बालपण जावें व त्यांच्या विद्येची चांगली सोय व्हावी अशी बाबांची फार इच्छा होती. त्रिवर्गबंधूंनीं वांटप केल्यापासून म्हणजे सन १८४३ पासून बाबांचा मुक्काम बहुशः कोरेगांव या नोकरीच्या खेडेगांवीं असे. कोरेगांव व शेरवली यांत अवघें दोन कोसांचें अंतर होतें. त्यामुळे आईचें बिऱ्हाड त्यांनीं शेरवली येथें ठेवलें होतें. शेरवली येथें माहेरच्या मंडळींची मदतहि अण्णांच्या आईला मिळत असे. बाबा अधूनमधून शेरवलीला येऊन जात. पहिलीं तीन मुलें निवर्तल्यामुळें मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न लवकर निर्माण झाला नाहीं. दादा नऊ वर्षांचे व अण्णा चार वर्षांचे झाले तेव्हां मात्र आपलें बिऱ्हाड शेरवलींतून हलवून मुरुडास ( म्हणजे आपल्या पूर्वजांच्या गांवीं ) नेण्याचें बाबांनीं नक्की केलें.

ही घटना १८६२ किंवा १८६३ सालांतली. यावेळेपर्यंत आई-बाबांची सांपत्तिक परिस्थिति थोडीशी सुधारली होती. गेलीं २० वर्षें

त्यांनीं खूप कष्ट सहन केले होते. थोडीशी शिल्लक बाजूला टाकली होती. त्यांतूनच चारशें रुपये खर्च करून बाबांनीं मुरुडास पूर्वजांच्या ठिकाणावर (त्यावरचें जुनें घर आतां पडून गेलें होतें.) नवीन घर बांधलें आणि त्यांत आईला व मुलांना ठेवलें. या सुमारास अण्णांच्या पाठीवर तीन वर्षांनीं एक बहीण जन्माला आली होती. तिचें नांव अंबाताई.

मुरुडास बिऱ्हाड केल्यानें आईबाबांच्या कष्टांना पुनः सुरुवात झाली. मुरूड गांव शेरवलीपेक्षां कितीतरी मोठा. त्यामुळें दुधदुभतें, धान्य, सरपणफाटा यासाठीं मुरुडास अधिक खर्च येऊं लागला. शिवाय बाबा नेहमीं कोरेगांवला एकटेच रहावयाचे व त्यामुळें त्यांना नेहमीं चुलीची आराधना करावी लागे. परंतु त्या प्रेमळ मातापित्यांनीं आपल्या कष्टांची पर्वा केली नाहीं. मुलें शिकलीं तरच त्यांचा नव्या परिस्थितींत तरणोपाय लागेल हें ध्यानीं घेऊन मुलांच्या शिक्षणाची आबाळ होऊं नये म्हणून त्यांनी आपल्या परीनें कष्टांची पराकाष्ठा चालविली. दिवसभर अखंड उद्योग व शक्य असेल तेथें तेथें काटकसर या दोन व्रतांचा अहर्निश उपयोग करून त्यांनीं मुरुड येथील बिऱ्हाड यशस्वी करण्याची शर्थ चालविली.

अशा प्रकारें, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठीं अहोरात्र धडपड करणाऱ्या प्रेमळ मातापित्यांच्या मार्गदर्शनाखालीं अण्णांच्या शिक्षणाची सुरुवात झाली.

* * *



**प्रकरण चौथें**

* * * * * * * * * * * * * * *

# बालपणांतील कांहीं प्रसंग

वयाला चार वर्षें पूर्ण झाल्यानंतर अण्णा मुरूड गांवीं राहाण्यास आले हें मागील प्रकरणांत आपण पाहिलें आहेच. तसे ते चार वर्षांचे अण्णा तुमच्या डोळ्यापुढें येऊं शकतात काय ?

त्या काळांत फोटो काढायची फारशी पद्धत नव्हती व त्यामुळें अण्णांचा लहानपणचा फोटो उपलब्ध नाहीं. परंतु अण्णांच्या बालपणांतल्या कांहीं गोष्टी सुप्रसिद्ध आहेत व त्या जर मी तुम्हांला सांगितल्या तर अण्णा लहानपणीं म्हणजे आठ-दहा वर्षांचे असतांना स्वभावानें, शरिरानें, मनानें व बुद्धीनें कसे होतें हें तुमच्या लक्षांत येईल व त्यामुळें अण्णांच्या व्यक्तिमत्वासंबंधीं व दिनक्रमासंबंधीं तुम्हीं आपल्या मनश्चक्षूंपुढें एक चित्र रंगवूं शकाल. म्हणून त्यासंबंधीं आतां सांगतो.

लहानपणापासूनच अण्णांची वाणी खणखणीत, शुद्ध व स्पष्ट असे. त्यांचें वाचन फार चांगलें असे. त्यांच्या आजोळीं रामविजय, हरिविजय वगैरे ग्रंथ दररोज रात्रीं वाचण्याचा परिपाठ असे. तोच क्रम मुरुडासहि चालू राहिला. प्रथमतः पोथीपठनाचें काम दादांकडे होतें; नंतर तें अण्णांकडे आले. पुढें अभ्यासासाठीं जेव्हां अण्णा रात्रीं मास्तरांकडे जाऊं लागले, तेव्हां अगोदर पोथी वाचून मगच ते मास्तरांकडे जात. शिवलीलामृताचें सूर्योदयापासून सूर्यास्ताच्या आंत पारायण करणें व गुरुचरित्राचा सप्ताह करणें हें अण्णा व दादा यांच्या परिपाठांतलें झालें होतें. विशेष प्रसंगीं ईश्वराची आराधना करण्याचा तो एक मार्ग झाला होता व अण्णा हें सर्व अत्यंत भक्तिभावानें करीत. जेव्हां दादा सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला (हल्लींची पी. एस्. सी

ही परीक्षा जशी सातव्या इयत्तेंत घेण्यांत येते तसें महत्त्व त्या काव सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला होतें ) रत्नागिरीला गेले, तेव्हां त्यां परीक्षा पास व्हावी म्हणून परीक्षेच्या आरंभाच्या दिवशीं अण्णां शिवलीलामृताचें पारायण केलें. दररोज देवपूजेनंतर लघुगुरुचरित्रा वाचन दादा किंवा अण्णा करीत असत. दररोज संध्याकाळीं दि लागल्यानंतर देवांना फुलें वाहून निरांजन ओवाळून नैवेद्य दाखवा व आरत्या म्हणून सायंकाळचें जेवण व्हावें असा अण्णांच्या घरच नित्यक्रम असे.

त्या काळच्या पद्धतीप्रमाणें अण्णांनीं मुंज होतांच वैश्वदेव, पुरुष सूक्त, सौर, रुद्र व पवमानांतील कांहीं भाग यांचें शिक्षण घेतलें. पु शाळेच्या अभ्यासाची गोडी लागल्यावर ही बाजू अण्णांनीं सोडू दिली. परंतु त्यांच्या घरीं रोज वैश्वदेव होई व तो अण्णाच करीत असत कारण बाबा नेहमीं कोरेगांवला असत. मोठा सण आला कीं आठचा दिवस बाबा मुरुडास येत. त्या वेळीं ते स्वतःच वैश्वदेव करीत.

अण्णांचा आवाज लहानपणापासूनच सुरेल व गोड आहे. आर्य श्लोक, पदें, वगैरे सुरावर म्हणण्याचा नाद त्यांना लहानपणीं असे लग्नमुंजीचे किंवा समारंभाचें जेवण असलें कीं पंक्तीमध्यें श्लोक म्हणण्याचा मान अण्णांच्या वाट्याला येत असे. गायनकलेकडे लक्ष द्यायला अण्णांना फारसा वेळ होत नसे. परंतु मुरुडास किंवा आस-पासच्या गांवांत कीर्तनें झालीं, किंवा तमाशे आले किंवा नाटकें झालीं कीं अण्णा मुद्दाम जात. त्यांतील संगीताकडे त्यांचें विशेष चित्त असे.

नाटकासंबंधीं वाटणाऱ्या ओढीमुळेंच एकदां अण्णा हूडपणानें वागले. त्याची हकीगत अशीः—एका कंपनीचीं नाटकें प्रथम हर्णैला व नंतर दापोलीस होणार होतीं. हर्णैच्या खेळाला अण्णांना पाठ-विण्यांत आलें व दापोलीला दादांनीं जावें असें ठरलें. परंतु अण्णांना



आपलें मन आवरेना. घरीं कांहींच न सांगतां त्यांनीं दापोलीचा रस्ता सुधारला व दुसऱ्या दिवशीं पहांटेपर्यंत नाटक पाहून ते दादांबरोबर मुरुडास परत आले ! अर्थात् नंतर त्यांना बोलणीं खावीं लागलीं.

अण्णा वर्णानें काळे, उंचीनें ठेंगू व अंगलटीनें कृश असे दिसत. या मुलाला कांहीं रोग आहे व त्यामुळें वयाबरोबर याची वाढ नीट झालेली नसावी असें त्यांच्याकडे पाहाणाऱ्याला वाटे. परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. त्यांची अंगकाठीच तशी होती. त्यांना रोग असा कांहीं नसे. ते नित्य व्यायाम करीत, खेळ खेळत. त्यामुळें त्यांची देहयष्टि काटक बनत चालली होती.

खेळांमध्यें गड्डे व आट्यापाट्या हे त्यांच्या आवडीचे खेळ होते. गड्डे हा खेळ कोंकणांतला विशिष्ट खेळ आहे. 'चवारी सुपारी' या नांवाच्या झाडाच्या फळांचा—त्यापासूनच गड्डे तयार करतात—गोट्यांप्रमाणें खेळण्यासाठीं उपयोग करीत असत. आट्यापाट्यांचा खेळहि अण्णांना फार आवडे. अण्णांच्या घरामागच्या वाडींतच या खेळाची एक जागा होती तेथें अण्णा खेळत असत. किंवा भरती ओसरल्यावर समुद्रकांठीं जी ओली वाळू असते त्याचाहि आट्यापाट्यांच्या मैदानासाठीं फार चांगला उपयोग होतो; तेथेंहि अण्णा खेळत असत. उन्हाळ्यांत उन्हाची वेळ टाळण्यासाठीं शाळा दुपारीं तीन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत भरत असे. त्यामुळें दुपारीं जेवणें झाल्यावर मुलें वाळवंटावर जात व ओल्या वाळूवर यथेच्छ विहार करीत किंवा आट्यापाट्या खेळत. उन्हाच्या वेळीं समुद्रकांठचे गार वारे अतिशय आल्हाददायक असतात. निसर्ग-सहवासांतील असा आनंद अण्णांनीं बालपणीं भरपूर लुटला आहे. दुपारचे तीन वाजतां शाळेची वेळ झाल्याबरोबर मुलें खेळ बंद करून शाळेचा रस्ता सुधारत. अर्थात् किती वाजले हें समजण्याकरितां मुलांना उन्हाची सांवली हेंच साधन होतें. अनुभवावर बसविलेलें सांवलीचें

गणित करून अण्णा व त्यांचे सवंगडी मोठ्या नाखुषीनें सागरा
निरोप घेऊन तीन वाजतां शाळेकडे पाय वळवीत.

अण्णांच्या स्वभावाचें चित्र रेखाटण्याला उपयोगी पडतील अ
कांहीं गोष्टी आतां सांगतों. एकादा माणूस पुढील आयुष्यांत कर्तबग
व गुणी निपजला कीं तो बालपणीं सर्वगुणसंपन्न होता असें अतिरे
चित्र रंगविण्याचा मोह पुष्कळांना पडतो. बालपणींहि तो माणू
समजूतदार होता, नेहमीं शहाणपणानें वागावयाचा, कोणाला त्रा
द्यायचा नाहीं, हट्ट करावयाचा नाहीं, फुशारकी मारावयाचा नाह
खोड्या करावयाचा नाहीं, खोटें बोलायचा नाहीं वगैरे वगैरे अतिरे
वर्णन करून आदर्शत्वाचे सर्व गुण त्या व्यक्तीला चिकटविण्या
उद्योग कांहींजण करतात. परंतु असें करण्यानें वस्तुस्थितीचा विपर्य
घडतो. खाणींत सांपडल्याबरोबरच हिऱ्याला पैलू पाडलेले होते अ
कोणी म्हटलें तर त्यावर आपला विश्वास बसेल काय ? एकादें भ
जरी व सुंदर महावस्त्र कपाशीच्या झाडावर आम्हांला सांपडलें अ
कोणी म्हटलें तर आपण त्यावर विश्वास ठेवूं काय ? मुळींच नाहीं
या जगांत अपुरेपणाकडून पुरतेपणाकडे, अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे
चुकीकडून बरोबर असण्याकडे, विषमतेकडून समतेकडून, अविचारी
पणाकडून विचारीपणाकडे चराचरांची एकसारखी प्रगति चाललेल
असते. आदर्शत्व किंवा पूर्णत्व पावलेली वस्तु एकदम कोठेंच सांपड
नाहीं; निदान माणसांच्या व्यवहारांत तरी सांपडत नाहींच नाहीं.

स्वभाव, शील किंवा चारित्र्य घडण्याबाबत इतर सर्व माणसांप्रमाणे
अण्णांनाहि प्रयोगावस्थेंतून जावें लागलें आहे. त्यांच्या बालपणांतील
जे कांहीं प्रसंग आतां मी सांगणार आहे ते वाचून बालपणांत अण्ण
आपल्यासारखे व आपल्या मित्रांसारखेच लहानसहान गुणदोषांनीं भरलेले
होते असें तुमच्या मनांत येईल.



क्षुल्लक बाबींसाठींहि अण्णा लहानपणीं रडून व हट्ट करून
आईला बराच त्रास देत. एकादे वेळीं रडायला लागले कीं, खूप वेळ
त्या बसत व रुसून बसले कीं खूप वेळ रुसून बसत ! अण्णांची समजूत
काढणें आईला कधींकधीं फार कठीण होई. मग त्यावेळीं ती एक उपाय
योजी. तो असा कीं, घरामध्यें 'आत्म्या' या नांवाचा एक चाकर होता.
दिसायला तो कुरूप व उग्र होता. अण्णा फार त्रास देऊं लागले कीं,
आई अण्णांना आत्म्याच्या स्वाधीन करी. आत्म्याचा आवाज खूप मोठा
होता. तो अण्णांना जरब बसवी व गप्प करी; अन् शेकोटीजवळ बसवून
ठेवी. अशा वेळीं अण्णा शेकोटीजवळ तासन् तास मख्खपणें बसून
राहात ! अण्णा तीनचार वर्षांचे असतांनाच्या त्यांच्या हट्टी स्वभावाचा
हा नमुना आहे.

त्यांच्या हट्टीपणाची आणखी एक गोष्ट सांगतों. एके दिवशीं सकाळच्या
जेवणाच्या वेळीं 'कडव्याची उसळ मला घाल' असा हट्ट त्यांनीं आई-
जवळ धरला. अण्णांना कडव्याची (म्हणजेच वालाची) उसळ फार
आवडत असे. परंतु सगळेजण जेवायला बसल्यावर एकदम उसळ कशी
तयार होणार ? एकादा पदार्थ मागणाऱ्यानें तो करून घालणाऱ्याची
सोयहि पहायला नको का ? परंतु असला विचार सहासात वर्षांच्या
अण्णांना कुठला सुचायला ? त्यांनीं जेवण थांबवून आदळआपट करायला
व रडायला सुरुवात केली. अखेरीस आईनें माघार घेतली ! परंतु
रागारागानेंच. तिनें फोडणीच्या पळींत दहावीस कडव्याचे दाणे
भाजल्यासारखे व शिजवल्यासारखे केले आणि अण्णांच्या पानांत
घातले. ते हिरवेकच्चे दाणे मिळाले तेव्हां अण्णांना आपला विजय झाला
असें वाटलें !

प्रौढी किंवा फुशारकी मारण्याचीहि अण्णांना लहानपणीं चटक लागली
होती. इतरांपेक्षां आपण अधिक हुशार आहों व इतरांकडून तसें म्हणवून

घ्यावें असें त्यांना वाटे. एकदां ते आपल्या धाकट्या बहिणीला घेउ
एका ठिकाणीं जेवायला गेले होते. तेथें प्रत्येक मुंज झालेल्या मुलाप
एक पावली दक्षिणा ठेवण्यांत आली व लहान मुलांपुढें एक आ
ठेवण्यांत आला. त्याप्रमाणें अण्णांना चार आणे मिळाले व अंबाताईर
एक आणा मिळाला. जेवण आटोपल्यावर अण्णा व अंबाताई घरीं यायल
निघाले. तेव्हां अण्णांच्या मनांत अशी इच्छा निर्माण झाली कीं
अंबाताईच्या हातांतला एक आणाहि आपल्याजवळ घ्यावा व आईजवळ
एकदम पांच आणे देऊन अप्रत्यक्षपणें आपली हुशारी सिद्ध करावी
परंतु अंबाताई कांहीं कमी पक्की नव्हती. सर्वच लहान मुलांना आपल
कर्तृत्व आपलें स्वतःचें म्हणूनच उठून दिसावें अशी इच्छा असते
नाहीं का ? तशी अंबाताईला होती व त्यामुळें तिनें आपली आणेल
मुठींत घट्ट धरून ठेवली. अण्णांनीं तिला रागावून पाहिलें तरी ते
देईना. अखेरीस त्यांनीं झटापट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां अंबाताई
त्यांच्या हातांतून निसटली व शेजारच्या एका घरांत आसऱ्यासाठीं
शिरली. त्यामुळें अण्णांना एकट्यालाच घरीं जावें लागलें ! प्रौढी
मारण्याचा अनाठायी प्रयत्न करणाऱ्यांना कसें खट्टू व्हावें लागतें याचा
अनुभव अण्णांना आला.

धाडशीपणानें व दांडगेपणानें वागण्याचा अण्णांचा स्वभाव नव्हता.
ते थोडेसे भित्रे व लाजाळू बनले होते. एकाद्या तिऱ्हाइत माणसाला
भेटण्याचा अगर त्याच्याजवळ बोलण्याचा प्रसंग आला तर ते घाबरे
होत. कांहीं मुलें कशीं खूप बोलतात व मोकळेपणानें वागतात, तसे
अण्णा नव्हते. ते थोडेसे मुखदुर्बळ होते. आपल्या आपल्या मनोराज्यांत
ते बरेच दंग राहायचे.

समवयस्क मुलांची एकादी टोळी किंवा गट स्थापन करून त्यांचा
पुढारी म्हणून मिरविणें अण्णांना कधींच जमलें नाहीं. परंतु मुलांची



एकादी टोळी जमली तर मात्र त्यांत ते सामील होत. त्या त्या मोसमांत कैऱ्या पाडणें, बोरें पाडणें, शिमग्याच्या वेळीं लांकडें, गोवऱ्या व गवत, किंवा नारळ, फणस, केळीचे घड वगैरेंच्या लहानसहान चोऱ्या करणें यासारख्या उद्योगांत ते मुकाट्यानें भाग घेत.

पोहणें शिकण्यासंबंधीं अण्णांच्या आयुष्यांत ते आठनऊ वर्षांचे असतांना असा एक चमत्कारिक प्रसंग घडला कीं, त्याचा त्यांच्या स्वभावावर कायमचा वाईट परिणाम झाला असावा. अण्णांना पाण्याची थोडी भीति वाटायची. यामुळें पोहणें शिकण्यासंबंधीं त्यांनीं थोडी टाळाटाळ चालविली होती. परंतु अशा वेळीं कोणातरी मोठ्या व अनुभवी माणसानें चातुर्यानें अण्णांची समजूत काढून व योग्य उपाय योजून त्यांची पाण्याची भीति घालवून पोहण्याची कला त्यांना शिकवायला हवी होती; परंतु तसें घडलें नाहीं. जो उपाय योजण्यांत आला तो अत्यंत वेडेपणाचा व अघोरी. दोघाचौघा शेजारच्या मंडळींनीं एके दिवशीं दुपारीं जेवण आटोपल्यावर अण्णांना बेसावधपणें पकडलें व जबरदस्तीनें त्यांच्या कमेरला एक सुखड ( सुखड म्हणजे न सोललेला व झाडावरच वाळलेला नारळ. हा बांधला कीं, माणूस पाण्यांत तरंगूं शकतो. कोंकणांत पोहणें शिकविण्यासाठीं सुखडीचा भोपळ्याप्रमाणेंच उपयोग करतात ) बांधली व दोघांनीं एकेक हात धरून त्यांना विहिरींत फेकून दिले. अण्णांनीं रडून रडून आक्रोश चालविला असतां ही सर्व मंडळी काठावर गंमत पहात हंसत होती. वाकडेतिकडे हातपाय हालवूं लागल्यानें अण्णा अखेरीस गटांगळ्या खाऊं लागले. तेव्हां एका इसमाने विहिरींत उडी टाकली व त्यांना वर काढले आणि सर्वांनीं भरपूर चेष्टा करून व टोंचून टोंचून अण्णांना अर्धमेले केलें.

यानंतर पोहण्याचें नांव केव्हांहि निघालें कीं, अण्णांच्या उरांत धडकी भरे. वरील प्रसंग घडल्यानंतर एका रविवारीं शेजारची मंडळी

तळ्यावर पोहायला जायला निघाली तेव्हां ते आपल्याला बरोबर नेती अशी भीति वाटून अण्णा घराच्या माळ्यावर जाऊन लपून बसले माळ्यावर अतिशय अंधार होता व दिवसाहि दिवा लावल्याशिवा कोणी तेथें जात नसे. त्यामुळें अण्णा माळ्यावर लपले असतील अश शंकाहि कोणाला आली नाहीं. सर्वांनीं अण्णांचा शोध केला पण सांपडले नाहींत. पुढें तळ्यावरून सर्वजण पोहून परत आल्याव जेवणाचे वेळीं अण्णा माळ्यावरून खालीं आले. अण्णा विहिरींत पडले कीं काय असें वाटून सर्वांना काळजी वाटूं लागली होती; परंतु अण्णा सुखरूप आहेत हें पाहून सर्वांना आनंद झाला. यानंतर पोहण्यासंबंधीं अण्णांच्या वाटेला पुन्हा कोणीं गेलें नाहीं. नंतर कांहीं वर्षांनीं अण्णांची पाण्याची भीति कमी झाली व त्यांना पोहावयास शिकण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें ते पोहण्यास शिकले.

*   *   *

## प्रकरण पांचवें

* * * * * * * * * * * * * * *

# शिक्षणांतील पहिला अडथळा

मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था नीट व्हावी म्हणून अण्णांच्या वडिलांनीं पत्नी व मुलांचें बिऱ्हाड मुरूड येथें ठेवलें ही हकीगत मागील एका प्रकरणांत सांगितली आहेच. मुरूडसारखें सुसंस्कृत गांव व आईचें प्रेमळ मार्गदर्शन या दोन गोष्टींमुळें अण्णांच्या शिक्षणाची सुरुवात उत्तम प्रकारें झाली असेल हें सांगावयास नकोच.

मुरूड गांवांतील मराठी शाळेचा लौकिक त्याकाळीं सर्वत्र पसरलेला होता. शाळा सरकारी होती व शिक्षणखात्याचें त्या शाळेकडे फार लक्ष



असे. त्यामुळें हुशार व दक्ष म्हणून गाजलेल्या शिक्षकांची नेमणूक साधारणतः मुरूडच्या शाळेवर करण्यांत येत असे. त्यामुळेंच शाळेचा निकाल दरवर्षी चांगला लागे. परगांवचीं मुलेंहि शिक्षणासाठीं मुद्दाम मुरूडास येत व या शाळेंत नांव घालीत. अण्णांचे वडीलहि याच शाळेंत शिकले होते.

बालवर्गाचें शिक्षण एका शेणवी पंतोजींच्या खाजगी शाळेंत करून घ्यावें व नंतर सरकारी शाळेंत मुलाचें नांव घालावें अशी त्या काळांत मुरूड येथील वहिवाट होती. त्याप्रमाणें सुमारें सहा महिने अण्णा शेणवी पंतोजींच्या शाळेंत शिकले व नंतर त्यांचें नांव सरकारी शाळेंत घालण्यांत आलें. सकाळीं शाळेंत गेल्यावर एकीकडे कित्ते गिरवावे व दुसरीकडे तोंडानें भूपाळ्या म्हणाव्या असा शेणवी शाळेंतील रोजचा कार्यक्रम असे.

शेणवी शाळेप्रमाणेंच सरकारी शाळेंतहि धूळपाटीवरच शिकवीत असत. लांकडाच्या पाटीवर धुळीचा सारख्या जाडीचा थर पसरून लांकडाच्या बोंथट लेखणीनें त्यावर लिहावयाचें असे. दर रविवारीं प्रत्येक विद्यार्थ्याला आपली पाटी माजवावी लागे. पाटी माजविणें म्हणजे पाटी स्वच्छ धुवून ओल्या मातीचा अगर खडूचा अगदीं पातळ लेप तिच्यावर देणें. हल्लीं स्लेटपाट्या आल्यानें धूळपाटी वापरण्याचा प्रसंग आजच्या विद्यार्थ्यांवर येत नाहीं. परंतु अण्णांचें सर्व प्राथमिक शिक्षण त्या काळच्या पद्धतीप्रमाणें धूळपाटीवरच झालें.

अण्णांची बुद्धि बऱ्यापैकीं होती. पाठांतराची शक्तीहि चांगली होती. त्यामुळें ते क्रमाक्रमानें एकेक इयत्ता पास होत गेले. अण्णांचे वडील बंधु दादा हेहि क्रमाक्रमानें वरच्या वर्गांत जात होतेच. मुलांच्या या प्रगतीमुळें मुरुडाला मुद्दाम बिऱ्हाड करण्याचें सार्थक झालें असें आईबाबांना वाटूं लागलें असल्यास नवल नाहीं.

परंतु बाबा व आई अशा समाधानांत असतांनाच अण्णांनीं त्यां निराशेचा एक धक्का दिला. चौथ्या इयत्तेच्या परीक्षेंत अण्णा नापा झाले!

चौथ्या इयत्तेची परीक्षा ही त्या काळांतील एक कठीण परीक्ष समजली जात असे. ही परीक्षा पास होणाऱ्यांना शिक्षणखात्यातर्फे ए सर्टिफिकेट मिळत असे व या सर्टिफिकेटाच्या जोरावर जरूर त शिक्षकाची किंवा कारकुनाची नोकरीहि मिळत असे. मात्र ही परीक्ष घेण्याची पद्धति जरा कडक होती. त्या त्या जिल्ह्यांतील डेप्युटी एज्यु केशनल इन्स्पेक्टर प्रत्येक शाळेंत जाऊन मुलांची परीक्षा घेत.

१८६९ सालीं अण्णा या परीक्षेला बसले. चौथीची सर्टिफिकेटाच परीक्षा बंद करून त्याऐवजीं सहावीची खास परीक्षा सुरू करावी असा निर्णय सरकारनें त्या वर्षींच घेतला होता. हा निर्णय १८७०च्या सप्टेंबर पासून अंमलांतहि यावयाचा होता. त्यामुळें अण्णांच्या दृष्टीनें चौथीची परीक्षा ही एक अखेरची व बहुमोल संधि होती. ही संधि हुकतां काम नये म्हणून अण्णांनींहि परीक्षेच्या आधीं बरेच कष्ट घेतले होते, परंत त्यांचें दुर्दैव आड आलें व परीक्षेंत ते नापास झाले.

शिक्षणाची गाडी सुरळीतपणें चालण्याबाबत अण्णांचें नशीबच पहिल्यापासून करंटें होतें असें म्हणायला हरकत नाहीं. या करंट्या नशिबाचा पहिला वार वर सांगितल्याप्रमाणें मराठी चौथींतच अण्णांना सहन करावा लागला.

* * *



## करण सहावें

* * * * * * * * * * * * *

# अडचणींचें स्वरूप

मराठी चौथ्या इयत्तेंत नापास झाल्यामुळें अण्णांच्या शिक्षणांत एक भीर अडथळा अनपेक्षितपणें निर्माण झाला. त्याचें कारण मागील करणांत थोडक्यांत सांगितलें आहेच. वास्तविक, एकाद्या इयत्तेंत नापास णानें फार तर एक वर्ष फुकट जातें व त्यामुळें त्या अडचणीचें भीर्य बेताचेंच असतें. परंतु १८६९ सालीं अण्णा चौथ्या इयत्तेच्या रीक्षेस बसले व त्याच वर्षापासून सरकारनें नवा अभ्यासक्रम अंमलांत णून सर्टिफिकेटाची चौथीची परीक्षा रद्द करून त्याऐवजीं सहावीची रीक्षा घेण्याचें ठरवलें. या घटनेमुळें अण्णांच्या शिक्षणांत एक गंभीर अडथळा कसा निर्माण झाला, हें आतां पाहूं.

सरकारच्या या नव्या निर्णयामध्यें अण्णांच्या दृष्टीनें तीन गोष्टी प्रतिकूल होत्या. पहिली अशी कीं, नव्या योजनेनुसार जो अभ्यासक्रम अंमलांत येणार होता तो पूर्वींपेक्षां कितीतरी वेगळा व कठीण होणार होता. गणित व मोडी अक्षर या दोन विषयांवर पूर्वी प्रामुख्यानें भर असे. त्याबरोबर आतां भाषाविषयालाहि बरेंच महत्त्व देण्यांत येणार होतें. पद्याकडे म्हणजे कवितेकडे पूर्वी मुळींच लक्ष नसे, पण आतां तें देण्यांत येणार होतें. त्याकरितां वाचनाचीं नवीं पुस्तकें तयार करण्यांत आलीं होतीं. त्यांत खूप कठीण कविता दिलेल्या होत्या. अण्णांनीं आतां-पर्यंत भाषाविषयाकडे फारसें लक्ष दिलेलें नव्हतें. नवीन अभ्यासक्रमामुळें त्यांच्यापुढें अभ्यासाचा डोंगर उभा राहिला व त्यामुळें ते गांगरून गेले असल्यास नवल नाहीं.

सहाव्या इयत्तेची परीक्षा सुरू होण्यामुळें आणखी एक गोष्ट अण्णांच्या

दृष्टीनें प्रतिकूल ठरणार होती. ती अशी कीं, विद्यार्थ्यांच्या वयाला सत
वर्षे पूर्ण झाल्याशिवाय त्याला सहावीच्या सरकारी परीक्षेला बसतां या
याचें नाहीं असा सक्त नियम सरकारनें जाहीर केला होता. अण्णांच
दृष्टीनें हा नियम फार जाचक ठरण्यासारखा होता. कारण १८६९ म
ते चौथींत होते (नापास झालेले होते) व यापुढें कोणत्याहि वर्ग
नापास न होतां ते पुढे गेले तर १८७२ मध्यें सहावीच्या वर्गा
त्यांचा अभ्यास पुरा होणार होता. परंतु १८७२ मध्यें अण्णांचें व
फक्त चौदा वर्षें होणार होतें ! याचा अर्थ पुढील दोन तीन वर्षें अण्णां
काय करावयाचें ?

समजा, जर अण्णा पुण्यासारख्या मोठ्या गांवीं शिकत असते त
सतरा वर्षांच्या नवीन बंधनामुळें त्यांचा प्रश्न इतका बिकट झाल
नसता. कारण चौथीनंतर ते लगेच इंग्रजी शिक्षण देणाऱ्या हाय
स्कुलांत नांव घालूं शकले असते. अर्थात् आपण ज्या सालांतील ह
गोष्ट बोलत आहों—म्हणजे १८६९–१८७० मधील—त्या काळीं
इंग्रजी हायस्कुलें फारच थोड्या मोठ्या गांवीं होतीं. शिवाय तीं फ
सरकारी होतीं व त्यांत फारच थोड्या मुलांना प्रवेश मिळत असे
चिपळूणकर–टिळक–आगरकर या त्रयीनें न्यू इंग्लिश स्कूल काढले
त्यामुळें महाराष्ट्रांत खाजगी शाळांची संख्या झपाट्यानें वाढली
गरीब मुलांना इंग्रजी शिक्षण घेणें कसें शक्य झालें याची हकीग
तुम्हांला माहीत असेलच. परंतु १८६९–१८७० मध्यें न्यू इंग्लि
स्कूलची स्थापना झालेली नव्हती. ती पुढें दहा वर्षांनीं म्हणज
१८८० मध्यें झाली. म्हणजे अण्णांच्या काळीं इंग्रजी शिक्षण घेण्याच
संधि किती दुर्लभ होती हें वाचकांच्या लक्षांत येऊं शकेल. सुदैवान
१८६९ च्या सुमारास मुरुडापासून सहा मैलांवर दापोली या ताल
क्याच्या गांवीं सरकारतर्फे एक इंग्रजी शाळा सुरू झाली होती



अण्णांच्या दृष्टीनें ही संधि अपूर्व होती. परंतु तिचा लाभ त्यांना मिळण्याचा योग नव्हता. दादांची चौथी इयत्ता संपल्यानें त्यांना त्या शाळेंत घालण्यांत आलें होतें व पाठोपाठ पुढील वर्षीं अण्णांनीं तिकडे जावें असें ठरलेंहि होतें. इतक्यांत सरकारनें ती शाळा बंद केली! कोंकणांतील मध्यम स्थितींतल्या व गोरगरिबांच्या मुलांना मुंबईस जाऊन इंग्रजी शिक्षण घेणें परवडत नसे. ही अडचण ध्यानीं घेऊन सरकारनें दापोलीची शाळा प्रयोग म्हणून उघडली होती. परंतु ती शाळा चालविण्यास अद्यापि अनुकूल काळ आलेला नाहीं असें ठरवून सरकारनें ती शाळा एका वर्षांतच बंद केली. परंतु त्यामुळें चौथीनंतर इंग्रजी शिक्षण घेण्याचा अण्णांपुढील मार्ग बंद झाला होता.

जी तिसरी गोष्ट सरकारी निर्णयामुळें अण्णांच्या दृष्टीनें प्रतिकूल ठरली ती अशी : सहावीची परीक्षा चौथीच्या परीक्षेप्रमाणें डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर शाळांमध्यें जाऊन गांवोगांवीं घेणार नव्हते; तर नव्या योजनेप्रमाणें फक्त जिल्ह्याच्या कांहीं मोठ्या ठिकाणीं परीक्षेचीं केंद्रें उघडण्यांत येऊन तेथें लांबलांबून विद्यार्थ्यांना जावें लागणार होतें. मुरूडच्या विद्यार्थ्यांना रत्नागिरी, मुंबई किंवा सातारा यांपैकीं एकादें केंद्र निवडणें भाग पडणार होतें. परंतु, परीक्षेचा महिना सप्टेंबर ठरविण्यांत आला होता. त्या महिन्यांत पावसामुळें समुद्राचा प्रवास सोयीचा नसतो व त्यामुळें रत्नागिरी किंवा मुंबई येथें जाणें अवघड ठरणारें होतें. पण साताराला जावयाचें म्हणजे सह्याद्रीचा घाट ओलांडून सर्व प्रवास पायीं करणें आवश्यक होतें. कारण त्या काळांत मोटारी नव्हत्या, मोटारींचे किंवा बैलगाडीचे चांगले रस्तेहि नव्हते. जे रस्ते असत ते पावसाळ्यांत सुस्थितींत नसत. म्हणजे मुरूड ते सातारा हा मोठा प्रवास ऐन पावसाळ्यांत पायीं करणें एवढा एकच मार्ग मुरूडच्या विद्यार्थ्यांना मोकळा होता.

असो. सरकारी निर्णयामुळें अण्णांच्या वाटेंत कोणकोणत्या अडचण निर्माण झाल्या व त्यामुळें त्यांच्या शिक्षणांत कशा प्रकारचा गंभीर अड थळा निर्माण झाला हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल. जर अण्णा १८६९ सालीं चौथींत नापास झाले नसते त त्या वर्षींच त्यांची सर्टिफिकेटाची परीक्षा पदरांत पडली असती कदाचित्, त्यांच्या वडील बंधूप्रमाणें कांहीं महिने दापोलीच्या शाळेंत घालवून नंतर ती शाळा बंद झाल्यावर त्यांच्या बंधूप्रमाणेंच त्यांनी एखाद्या प्राथमिक शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली असती. चौथीची परीक्षा पास झाल्यानें १८६९ सालीं अण्णांना त्या वेळच्या नियमा प्रमाणें शिक्षक होतां आलें असतें व खरोखरीच तसें झालें असतें त कर्वे हे 'महर्षि' या पदास पोचलेहि नसते! त्यांच्या जीवनाची उत्क्रांति कांहीं एका वेगळ्या वाटेनें झाली असती. असो. माणसाचें जीवन हें योगायोगांनीं, बऱ्यावाईट योगायोगांनीं, घडत असतें हेंच खरें. अण्णा मराठी चौथींत नापास झाले व नेमके १८६९ सालीं नापास झाले ही घटना त्यांच्या जीवनविकासाच्या दृष्टीनें अत्यंत अर्थ-पूर्ण ठरली हें मात्र निश्चित.

* * *



प्रकरण सातवें

* * * * * * * * * * * * * *

## सोमण गुरुजी

चौथ्या इयत्तेंत नापास झाल्यामुळें निर्माण झालेल्या अडचणींचे स्वरूप पाहून अण्णांचें मन निराशेनें किती भरून गेलें असेल याची वाचकांनीं कल्पनाच केलेली बरी. परंतु अशा वेळीं त्यांचें सुदैव त्यांच्या मदतीस धांवून आलें. त्यांच्या शाळेंत एका नवीन गृहस्थांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली व कां कोणाला ठाऊक, अण्णांवर त्यांची फार मर्जी बसली. लाजाळू, कृश व ठेंगू परंतु धार्मिक वृत्तीचा, प्रेमळ स्वभावाचा बऱ्या बुद्धीचा अण्णांसारखा मुलगा पाहून त्या गृहस्थांनीं अण्णांना पाशीं धरावयाचें ठरविलें.

अण्णांवर असा लोभ करण्यास प्रवृत्त झालेल्या गृहस्थांचें नांव श्रीयुत विनायक लक्ष्मण सोमण असें होतें.

आपली नोकरी बरी कीं आपण बरे अशा स्वभावाचे सोमण हे गृहस्थ नव्हते. शिक्षकाचा व्यवसाय हा समाजांतील अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय आहे व आपल्या मार्गदर्शनाखालीं कांहीं होतकरू विद्या-र्थ्यांचा उत्कृष्ट प्रकारें विकास करून तद्वारें आपण समाजाच्या उपयोगी पडावयाचें अशी सोमण गुरुजींची महत्त्वाकांक्षा होती. ते स्वतः बुद्धीनें अत्यंत कुशाग्र होते. त्यांच्या गौरवर्ण चेहऱ्यावर बुद्धीचें तेज नेहमीं झळके, यामुळें ते तरतरीत दिसत. विद्यार्थ्यांना ते फार आवडत.

पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांतून पहिल्या प्रतीचें सर्टिफिकेट मिळवून १८७० सालीं ते जे बाहेर पडले ते नोकरीसाठीं मुरुडासच आले. त्यावेळीं ते अवघे वीसएकवीस वर्षांचे होते. शाळेबाहेरहि समाज-

सेवेचीं अनेक कामें करण्याचा उरक त्यांच्यामध्यें होता. त्यामुळें थोड्या महिन्यांत मुरूड गांवांत त्यांनीं मानाचें स्थान मिळविलें.

चांगला गुरु भेटणें ही माणसाच्या आयुष्यांतील एक अपूर्व घट असते. आणीबाणीच्या वेळीं अण्णांच्या आयुष्यांत सोमण गुरु अवतीर्ण झाले. वाचनाच्या, लेखनाच्या, पाठांतराच्या व इतर अने चांगल्या सवयी अण्णांना लागाव्या म्हणून त्यांना सकाळसंध्याका सोमण गुरुजींनीं आपल्या घरीं राहाण्यास ठेवून घेतलें. त्यामुळें अण्णां अभ्यास पुष्कळच सुधारला. शिवाय सोमण गुरुजींच्या सहवासामु व प्रेमळ मार्गदर्शनामुळें त्यांना समाजसेवेचे धडेहि गिरवावयास मिळा (समाजसेवेच्या क्षेत्रांत सोमण गुरुजींनीं अण्णांना कसें बाळकडूं पाज याची हकीगत पुढील एका प्रकरणांत सांगण्यांत येईल.) असो. त एवढेंच सांगावयाचें आहे कीं, सोमण गुरुजींनीं अण्णांच्या जीवना इतक्या नाट्यपूर्ण रीतीनें प्रवेश केला कीं त्यांच्या सहवासामुळें अण्णांच् बहिरंगांत व अंतरंगांत कायापालट होण्यास झपाट्यानें सुरुवात झाला.

* * *

**प्रकरण आठवें**

* * * * * * * * * * * * *

## शिक्षणांतील दुसरा अडथळ

उत्साही व श्रद्धाळू विद्यार्थ्याला कुशल व प्रेमळ गुरु भेटला क काय चमत्कार दिसूं लागतो याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सोमण गुरुजींच्या मार्गदर्शनाखालीं अण्णांनीं झपाट्यानें केलेली प्रगति ह होय. समाजसेवेच्या कांहीं कामांमुळें (ज्यासंबंधींची माहिति पुढील एका प्रकरणांत सांगण्यांत येणार आहे त्यामुळें) सोमणगुरुजी व अण्ण



या गुरुशिष्यांची जोडी मुरूड गांवांत लोकांना इतकी माहीत झाली व त्यांच्याविषयीं गांवांत इतका आदर वाढूं लागला कीं, या जोडीला गांवामध्यें रामदास-कल्याण या नांवानें ओळखण्यांत येऊं लागलें. प्रसंगविशेषीं एकमेकांशीं केलेल्या पत्रव्यवहारांतहि ते या नव्या नांवांनींच सह्या करूं लागले !

गुरुजींच्या मार्गदर्शनाखालीं अण्णांनीं पांचवी व सहावी इयत्ता क्रमानें पुरी केली. परंतु वयाला सतरा वर्षें पूर्ण होईपर्यंत सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला बसणें शक्य नव्हतें, म्हणून दोन वर्षें त्यांनीं गांवांतच काढलीं. गुरुजींचें मार्गदर्शन असल्यामुळें त्यांनीं या काळांत आपला वेळ वाया न दवडतां समाजसेवेचीं कामें, संस्कृत भाषेचें अध्ययन इत्यादि कार्यां-साठीं त्याचा उपयोग केला.

१८७५ च्या एप्रिलमध्यें वयाला सतरा वर्षें पूर्ण होतांच अण्णा सहावीच्या परीक्षेला बसण्यास मोकळे झाले. त्यांचें मन अतिशय उल्हसित झालें. भविष्यकाळाचीं सुंदर सुंदर स्वप्नें त्यांना पडूं लागलीं. आपल्या आयुष्यांतील निरर्थकपणें चाललेला काळ संपत आलेला पाहून त्यांची मनःस्थिति फार सुधारली. ते जोरानें अभ्यास करूं लागले. गुरुजींनीं त्यांना उत्तेजन दिलें.

सप्टेंबर महिना उजाडला. परीक्षेचा दिवस जवळ आला. पावसा-ळ्यांतील प्रवासाचे विलक्षण कष्ट सहन करून आपल्या मित्रांसह अण्णा आदल्या दिवशीं सातार्‍यास जाऊन दाखल झाले. परीक्षेच्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां अण्णा व त्यांचे चार मित्र परीक्षेच्या केंद्रावर नांवें नोंदण्यासाठीं गेले. इतर चौघांचीं नांवें नोंदून घेण्यांत आलीं. परंतु... परंतु, अण्णांचें नांव नोंदून घेण्यास परीक्षकांनीं नकार दिला. ' तूं सतरा वर्षांचा नाहींस, आम्हांला फसवूं नकोस ' असें ते अण्णांना म्हणाले.

परीक्षकांचे हे शब्द ऐकून अण्णांची मनःस्थिति किती केविलवाणी

झाली असेल याचा विचार ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं करावा.
नकारामुळें त्यांच्या सुखस्वप्नांचा चुराडा झाला होता. ज्या परीक्षे
आपण दोन वर्षें वाट पाहिली ती परीक्षा आपल्या हातांत पडत ना
हें पाहून ते अतिशय हिरमुसले झाले. 'आपलें नशीबच करंटें
'आपणच दुर्दैवी, त्याला इतर माणसें काय करणार? दैवाच्य
मनांत दिसत नाहीं आपण पुढें शिकावें म्हणून!' असें कांहींत
निराशेनें पुटपुटत ते दुसऱ्या दिवशीं साताऱ्याहून परत फिरले.

अशा प्रकारें अण्णांच्या शिक्षणाची गाडी दैवानें दुसऱ्यांदा क्रूरप
थांबविली.

* * *

## प्रकरण नववें

* * * * * * * * * * * * * * *

# प्रवासाचें अपूर्व साहस

साताऱ्च्या परीक्षकांनीं अण्णांवर जो अन्याय केला तो जितक
संतापजनक तितकाच अण्णांनीं परीक्षेकरितां मुरूडहून सातारला वेळेव
पोंचण्यासाठीं जो साहसी प्रवास केला तो अत्यंत स्फूर्तिदायक आहे
मुरूड ते सातारा प्रवास हा अण्णांच्या चरित्रांतील एक अत्यंत उज्ज्व
व रोमांचकारी प्रसंग आहे. अशा अद्भुत व स्फूर्तिदायक प्रसंगांन
अण्णांचें जीवन नटलें असल्यानेंच त्यांत नाट्य निर्माण झालें आहे.

तब्बल ब्यायशीं-त्र्यायशीं वर्षांपूर्वीं त्यांनीं केलेल्या या प्रवासाच
हकीगत आतां सांगतों. वाचकांना एवढीच विनंती कीं, ही हकीग
वाचत असतांना त्यांनीं ब्यायशीं-त्र्यायशीं वर्षांपूर्वींचे रस्ते व प्रवासाच



इतर प्रतिकूल परिस्थिति पार्श्वभूमीसारखी सतत आपल्या मनांत जागती ठेवावी.

सप्टेंबर महिना. पाऊस धो धो कोसळत होता. कोंकणांतला पाऊस सरासरीनें वर्षाला शंभर इंचांवर पडणारा. त्यामुळें एव्हांना सर्व खाड्या, नाले, रस्ते पाण्यानें भरून गेले होते. मध्येंच उघडीक आली कीं, माणसांची व गलबतांची येजा सुरू व्हायची. बाकी सर्वत्र सामसूम. ठरलेल्या दिवशीं कोणी गलबत हाकारूं शकेल अशी खात्री नसे. त्यामुळें मुरूडहून रत्नागिरीला किंवा मुंबईला जाणें, ठराविक दिवशीं पोंचण्याच्या दृष्टीनें जाणें, अशक्य कोटींतलें होतें.

परंतु, योगायोगानें आपलें नशीब बलवत्तर ठरलें तर पहावें अशा हेतूनें अण्णा व त्यांचे चार मित्र गलबताच्या शोधांत राहिले. हल्लीं-प्रमाणें त्या काळीं मोठाल्या अगडबंब बोटी नव्हत्या. छोटीं गलबतें होतीं. मुरूडजवळच असलेल्या आंजर्लें गांवच्या खाडींतून एक गलबत मुंब-ईला जाणार आहे असें समजल्यावरून ते पांच विद्यार्थी मोठ्या आशेनें गलबत पकडण्यासाठीं आंजर्लें येथें गेले. तें गलबत त्यांना मिळालें असतें तर मुंबईच्या परीक्षेसाठीं ते विद्यार्थी वेळेवर पोंचले असते. म्हणून नांगरलेल्या गलबताकडे पहात व देवाची आराधना करीत मध्यरात्रीं-पर्यंत ते सर्वजण खाडीच्या जवळच असलेल्या एका धर्मशाळेंत बसून राहिले. परंतु एकाएकीं पाऊस अधिकच वाढला व तो थांबण्याचीं चिन्हें मुळींच दिसेनात. त्यामुळें गलबत निघूं शकलें नाहीं व पुढील तीनचार दिवसांत निघेल असें वाटेना. म्हणून आपल्या नशिबाला बोल लावीत, अण्णा व त्यांचे चार मित्र मोठ्या कष्टानें मुरुडास परतले.

आतां त्यांच्यापुढें एकच वाट मोकळी होती. आणि ती खुष्कीच्या म्हणजे जमिनीवरच्या प्रवासाची. पायरस्त्यानें मुंबईला अगर रत्नागिरीला जाणें पावसाळ्यामुळें अशक्यच होतें. कारण वाटेंत अनेक भरलेल्या

खाड्या लागत व त्या ओलांडणें गलबतांशिवाय शक्य नव्हतें. आ
अशा पावसांत गलबतवाला मिळणेंहि मुष्कील होतें. तेव्हां आतां राहा
राहिली एकच आशा. ती म्हणजे पायवाटेनें सातारा गांठण्याची.

पायवाटेनें सातारा ! साताऱ्च्या परीक्षेला अवघे चार दिवस शिल्ल
होते. एवढ्या अवधींत या अननुभवी मुलांना साताऱची मजल मार
येईल हें अशक्य कोटींतलें होतें. त्यामुळें अण्णांच्या अगर इतर मुलांच्य
घरची मंडळी त्यांना प्रवासाची परवानगी देईनात.

परंतु मुलांचा उत्साह अपूर्व होता. परीक्षा हें एक आव्हान व प्रवा
हें दुसरें आव्हान. या दोन आव्हानांमुळें त्यांच्या वीरवृत्ति जागृत झाल्य
ते हटून बसले. आम्ही जातों, आम्हांला परवानगी द्या अशी भुणभु
त्यांनीं लावली. अखेरीस नातेवाइकांना अशी भीति वाटली कीं, यां
परवानगी दिली नाहीं तर हीं मुलें रात्रीच्या वेळीं गुपचूप पसार होतील
त्यापेक्षां आपणच परवानगी दिलेली काय वाईट ? म्हणून, मुलांच्य
काळजीनें अंतःकरण जड झालें असतांहि त्यांनीं नाइलाजानें मुलां
बाडबिस्तरे बांधून दिले व गांवाच्या वेशीपर्यंत ते त्यांच्याबरोबर गेले
' हीं मुलं पुनः आपल्याला सुखरूप दिसलीं म्हणजे मिळवलं ' अस
आपल्या मनांत वारंवार येणारा काळजीचा विचार त्यांनी आपल्य
मनांतच दाबला. अतिशय करुण प्रसंग निर्माण झाला. सर्वांन
आपले अश्रु कसे तरी आवरले व देवाचें नांव घेऊन त्या धाडसी वीरांन
त्यांनीं निरोप दिला.

पाठीवर बोजा मारून झपाझपा पावलें उचलणारी ती बालसेन
वाचकांनीं आपल्या मनश्चक्षूंसमोर आणण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्य
जवळ सामान अगदीं थोडें होतें. शक्यतोंवर आपल्या पाठीवर उचलत
येईल इतकेंच गाठोडें लहान होतें. त्यांत दोन धोतरें, सोवळें ( मुकटा
तांब्यापंचपात्रीं, अभ्यासाचीं पुस्तकें, फराळासाठीं तीन चार दिव



पुरतील इतके पोहे, दशम्या, थालीपीठें, फोडणीच्या मिरच्या, लोणचें वगैरे जिन्नस होते.

पाऊस असला कीं घोंगडीची खोळ करून ते अंगावर घेत. रात्रीं तीच ओली घोंगडी ते आंथरीत. डोक्याला बांधायचा रुमाल ( त्यावेळीं हल्लींप्रमाणें मुलें टोप्या वापरीत नसत. मोठ्या माणसांप्रमाणें डोक्याला रुमालच बांधीत ) रात्रीं पांघरायला वापरीत.

मुरूडहून निघाल्यानंतर दुपारचे जेवणासाठीं सहा कोसांवरील कुंभें या गांवीं मुलांनीं पहिला मुक्काम केला. तेथें जेवण आटोपून मुळींच वेळ न घालवितां ते पुढें चालू लागले. आठ कोस चालून गेल्यावर एका गरीबाच्या झोंपडींत त्यांनीं रात्रीची वस्ती केली व पहांटे उठून दोन तीन तासांत चिपळूण गांठलें. चिपळूणपासून पाटण अठरा कोस व पाटणहून सातारा अठरा कोस, अशी एकूण छत्तीस कोसांची मजल आतां उरली होती व अवकाश काय तो दीड दिवस व दोन रात्री इतकाच होता !

सुदैवानें, चिपळूण येथें मुलांचा पाहुणचार फार चांगला झाला. मुरूडचेच एक गृहस्थ तेथें फौजदार होते व या मुलांना ते ओळखत होते. त्यामुळें स्नान, जेवण व विश्रांति याबाबत मुलांची उत्कृष्ट सोय झाली. शिवाय फौजदारसाहेबांनीं योग्य भाड्यांत मुलांच्या सामानासाठीं एक घोडें ठरवून दिलें. चिपळूणनंतर कुंभार्ली घाट लागणार होता व सामानासह तो चढून शिवाय पुढें सातारपर्यंत मजल मारावयाची म्हणजे मुलांच्या दृष्टीनें तें विलक्षण त्रासाचें ठरणार हें त्या दयाळू फौजदारसाहेबांनीं ओळखलें व घोड्यावर सामान लादून तुम्ही झपाझप पावलें उचला असा मुलांना आग्रह केला. त्याप्रमाणें घोड्यावर ओझें, त्या सोबत घोड्याचा मालक आणि थोडेसें पुढें चालणारे पांच विद्यार्थी-वीर असा हा तांडा चिपळूणाहून पुढें जाण्यास सज्ज झाला.

दुपारचीं जेवणें आटोपल्यावर थोडी विश्रांति घेऊन चिपळूणा निघालेल्या या सेनेनें पहिला मुक्काम कुंभार्ली घाटाच्या पायथ्या केला व रात्रीची चारपांच तास झोंप घेऊन पहांटेला दोन वाजतां घ चढण्यास आरंभ केला. मुलांचे पाय थकूं लागले. पण पाटण के गांठूं असें त्यांना झालें होतें. अखेरीस दुपारीं एक वाजतां त्यांनीं क बसें पाटण गांठलें !

मुलांचे पाय भरून आले होते. अंग जड झालें होतें. आ साताऱ्यापर्यंतचा उरलेला अठरा कोसांचा प्रवास आपल्या हातून हो कीं नाहीं या काळजीनें त्यांचीं मनें अस्वस्थ झालीं. एका खाणावळी स्नान व जेवणखाण आटोपून पुढें केव्हां निघावयाचें याचा विचार सर्वजण करूं लागले.

एव्हाना दुपारचे तीन साडेतीन वाजले होते. दुसऱ्या दिव दुपारीं दहा वाजतां त्यांना परीक्षेसाठीं सातारला हजर व्हावयाचें होते व दमलेल्या भागलेल्या पायांनीं अठरा कोसांचें अंतर काटावयाचें होते हें कसें होणार ? यांतून कांहीं तोड निघणार नाहीं का ? असा विचा ते करीत होते. इतक्यांत आपल्या गांवीं मुरुडहून कांहीं विद्यार्थी पाय आले आहेत असें ऐकून पाटणमधील कांहीं शिक्षक मुलांना भेटण्या आले. सातारला उद्यां सकाळीं परीक्षेसाठीं पोंचणें आवश्यक असलें त मुलांनीं मोठ्या रस्त्यानें न जातां धनगरसड्यापर्यंत खिंडींतून पाय वाटेनें जावें व त्याप्रमाणें गेल्यास सुमारें सहा कोसांचा हिसका वाचेल असें त्यांनीं सुचविलें. मुलांना ही कल्पना फार आवडली. परं शिक्षकांनीं मुलांना एवढेंच बजावून सांगितलें कीं, त्यांनीं शक्य तितक जलदी करून काळोख पडण्यापूर्वीं खिंड ओलांडून धनगरसड्याल पोंचलेंच पाहिजे आणि पहांटे उठून सातारचा रस्ता धरला पाहिजे.

परंतु जें घडून आलें तें अत्यंत निराळें. कोणत्या मुहूर्तावर ही मंडळ



निघाली कोणास ठाऊक ! गांव सोडून दोनतीन मैल झाले असतील नसतील तोंच घोड्यानें 'बैठा संप' सुरू केला. वास्तविक, पाटणहून निघतांनाच घोडेवाला नाखूष होता. घोडें फार दमलें आहे व मलाहि चिपळूणास लवकर परत जायचें आहे असें तो म्हणत होता. परंतु मुलांनीं ऐकलें नाहीं. त्याला खूप आग्रह केला व चिपळूणच्या फौजदार-साहेबांना सांगू असा दमहि भरला. त्यामुळें नाइलाजानें घोडा घेऊन तो मुलांबरोबर निघाला होता. परंतु शरीर थकल्यावर घोडा तरी कसा चालणार ? खरें म्हणजे आतांपर्यंतच्या प्रवासानें सगळेजणच थकले होते. परंतु मुलांचीं मनें थकलेलीं नव्हतीं. परीक्षेच्या ओढीनें तीं शरीरांना ओढत होतीं. पण घोडा किंवा घोडेवाला यांचीं शरीरेंहि थकलीं होतीं व मनेंहि थकलीं होतीं.

एक काठी मारली कीं, त्या घोड्यानें चार पावलें चालावें व पुनः थबकून उभें राहावें असा क्रम सुरू झाला. आपल्या सर्व शक्ति एकवटून घोड्याला लगामानें पुढें ओढावें किंवा काठीनें पाठीवर हाणावें असें प्रत्येक मुलानें करून पाहिलें. पण व्यर्थ ! घोडा थोडा हाले व पुनः थांबे. यामुळें प्रवासाचा वेग फार कमी झाला व मंडळी अर्ध्या खिंडींत पोंचली न पोंचली तोंच अंधार पडला. आतां काय करायचें ! वास्तविक, अंधार पडण्यापूर्वी खिंड ओलांडून धनगरसड्याला पोंचणें आवश्यक होतें. पण तें कसें जमणार ? पहांट होईपर्यंत खिंडींत थांबावें तर हिंस्र पशूंची भीति काळजाला घरें पाडीत होती. अखेरीस, जीव मुठींत धरून ते सर्वजण हळूहळू चालत राहिले.

एका बाजूला उंच कडा व दुसऱ्या बाजूला खोल दरी आणि मध्यें एक दोन हातांची अरुंद वाट व जिकडे तिकडे किर्र झाडी ! अशा भयंकर अडचणींतून अण्णा व त्यांचे मित्र चालले होते.

इतक्यांत आणखी एक संकट निर्माण झालें. बरोबरचें घोडें एकदम

खालींच बसलें ! किती मारलें तरी तें उठेना. आतां एकच मार्ग शिल्ल
होता. तो म्हणजे घोड्याला तेथेंच सोडून पुढें जाणें !

घोडेवाला चांगला माणूस होता म्हणून निभावलें, नाहींतर संतापू
त्यानें खिंडींतच मुलांना रात्र काढायला भाग पाडलें असतें किंवा इतरी
दगाफटका केला असता. परंतु रात्रभर खिंडींत राहाणें धोक्याचें होई
हें जाणून ' सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ' ( म्हणजे सर्वस्वाच
नाश होण्याची वेळ आली तर शहाणे लोक अर्धें सोडून देण्यास तया
होतात ) या उक्तीप्रमाणें तो घोडेवाला आपलें घोडें खिंडींतच सोडू
द्यायला तयार झाला. अर्थात् या निर्णयामुळें मुलांनाहि वाईट वाट
असणार हें उघड आहे. परंतु प्राप्त परिस्थितींत त्यांना इतर कांह
सुचलें नाहीं.

मुलांनीं ओझीं पाठोंगळीला मारलीं व घोडेवाल्याच्या पाठीमागून
चालू लागले. घोडेवाला माहीतगार माणूस होता. परंतु अंधारामुळे
पायाखालची वाट बिलकूल दिसत नव्हती. पांचपंचवीस पावलें
चालल्यानंतर मधून एखाद्या वेळीं आकाश दिसे व पुनः झाडीमध्ये
लपून जाई. अशा परिस्थितींत जीव मुठींत धरून मुलें चाललीं होतीं

अखेरीस मध्यरात्रीच्या सुमारास धनगरसड्याच्या माळावर सर्वजण
येऊन पोंचले ! तेथें धनगरांच्या चारपांच झोंपड्या होत्या. त्यांच्य
शेजारीं माळावर घोंगडी अंथरून सर्वांनीं अंग टाकलें व देवाच्या दयेने
मोठ्या संकटांतून आपण वांचलों म्हणून कृतज्ञतेचे निःश्वास सोडले.

ध्रुवताऱ्याप्रमाणें मुलांना सातारा डोळ्यापुढें सतत दिसत होत
त्यामुळें थोडी विश्रांति घेऊन ते पुढे जाण्याच्या गोष्टी बोलूं लागले. प
पुढचा रस्ता कोणालाच माहीत नव्हता व तो घोडेवाला पैशाचें आमि
दाखवूनहि पुढें यायला तयार होईना. त्यामुळें पहांट होऊन दिसूं लागे
पर्यंत मुलांना त्या माळावरच मुक्काम करावा लागला. पहांटेला वार



अतिशय सुटला व मुलें थंडीनें कुडकुडून गेलीं. पण साताऱ्याच्या आठवणींनें त्यांच्या अंतःकरणांत महत्त्वाकांक्षेची ऊब निर्माण केली. त्यामुळें ते उठले व रस्ता चालू लागले. तो घोडेवाला तेथूनच मागें फिरला. बिचारा घोडेवाला ! आणि त्यापेक्षांहि तें दुर्दैवी घोडें ! त्या खिंडींत रात्रभर तें जिवंत राहिलें का अतिश्रमानें कुडकुडून मेलें का हिंस्र पशूंच्या भक्षस्थानीं पडलें, देव जाणे !

सकाळीं दहा वाजण्यापूर्वीं आपण सातारला पोंचावें म्हणून मुलांनीं शर्थ केली, पण व्यर्थ ! मुलें सातारला पोंचलीं तेव्हां सायंकाळचे पांच वाजले होते ! ! एवढा खटाटोप करून आपली परीक्षा हुकली म्हणून ते अतिशय निराश झाले. परंतु चौकशी केल्यावर त्यांना असें आढळून आलें कीं, त्या दिवशीं परीक्षा सुरू झाली नव्हती. परीक्षेला आलेल्या मुलांचीं नांवें नोंदण्याचा कार्यक्रम चालू होता व दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां उरलेलीं नांवें नोंदून घेऊन अकरा वाजतां परीक्षा सुरू होणार होती.

रात्रभर विश्रांति घेऊन सकाळीं दहा वाजतां मुलें मोठ्या उत्साहानें केंद्रावर हजर झालीं. परीक्षकांची एक कमिटी होती. त्या कमिटीपुढें एकेक मुलगा जाऊन उभा राहिला व कमिटी त्याचें नांव नोंदून घेऊं लागली. त्याप्रमाणें अण्णा कमिटीपुढें जाऊन अदबीनें नमस्कार करून उभे राहिले. अण्णांची लहान मूर्ति पाहून कमिटीचे अध्यक्ष गरजले, ' आम्हांला फसवतोस होय ? सतरा वर्षांचा आहेस ? किती लहान दिसतोस ! जा. घरीं जा अन् दोन वर्षांनीं ये. '

परीक्षकांच्या तोंडचे हे अनपेक्षित व अत्यंत कठोर शब्द ऐकतांच अण्णांचें धैर्य खचलें व त्यांची जीभ लुळी पडली. त्यांची ही अवस्था पाहून हा मुलगा आपलें वय खोटेंच सांगत आहे अशी परीक्षकांची

खात्री पटली. व ' तुला परीक्षेला घेत नाहीं ' असें अण्णांना ठास
सांगून परीक्षकांनीं आपला पुढील उद्योग सुरू केला.

अण्णांच्या आयुष्यांतील हा प्रसंग अतिशय केविलवाणा आ
त्यांच्या बरोबरच्या ज्या इतर चार मुलांना परीक्षेला बसण्याची परवान
मिळाली ते पहिल्या दिवशीच्या अंकगणिताच्या पेपरांत नाप
झाल्यानें अण्णांच्या निराशेंत अधिकच भर पडली. त्यामुळें साता
शहर व आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें पाहाण्याच्या नादाला न लाग
ते सर्वजण आल्या वाटेनें परत फिरले. ऐन दिवसाउजेडीं त्यांनीं खिंडींत
प्रवास केला. पण त्यावेळीं आदल्या दोन दिवसांपूर्वींचा रात्रीचा भयंक
प्रवास त्यांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभा राहिला असेल, यांत काय नवल

असो. आपल्या आयुष्यांतील एक अत्यंत साहसी प्रवास निष्फळ ठरल्या
मुळें खट्टू होऊन अण्णांनीं व त्या मुलांनीं मुरूड गांवाच्या हद्दींत जेव्ह
प्रवेश केला असेल त्यावेळी तीं मनानें किती खचून गेलीं असतील याच
वाचकांनीं स्वतःशीं कल्पना करावी. विशेषतः आपणावर खोटेपणाच
आरोप आल्यामुळें व स्वतःजवळ शाळेच्या हेडमास्तरांचा वयासंबंधींच
दाखला असूनहि तो दाखविण्याचें धैर्य आपल्याला न झाल्यामुळे
अण्णांना किती मनस्ताप झाला असेल बरें! अण्णांच्या जागीं ज
एकादा धीट मुलगा असतां तर त्यानें परीक्षकांच्या कमिटीला आपले
नांव नोंदायला भाग पाडलें असतें. अण्णांची मूर्ति लहान व कृश दिसत
असल्यामुळें परीक्षकांनीं आपल्या घाईंत अण्णांवर एक घोर अन्याय
केला होता. समजा, त्या परीक्षकांपैकीं एकाद्याला अण्णांनीं पुढील
आयुष्यांत केलेलें भरीव समाजकार्य माहीत झालें असेल तर लहानपणीं
या थोर पुरुषावर आपल्या घाईंत आपण केवढा अन्याय केला होता हें
समजून त्यांना अतिशय दुःख झालें असेल. परंतु आपल्यावर ज्यांनीं
एवढा अन्याय केला व आपल्या शिक्षणाची गाडी ज्यांनीं क्रूरपणें



बविली त्यांच्यासंबंधीं अण्णांनीं मात्र आपल्या आत्मचरित्रांत एक अक्षरहि
वगें लिहिलेलें नाहीं. सर्व दोष त्यांनीं आपल्या भित्र्या स्वभावाकडे
तला आहे. अण्णांच्या स्वभावाचा हा थोरपणा खास अनुकरणीय आहे.

* * *

## प्रकरण दहावें

* * * * * * * * * * * * * * *

## इंग्रजी शिकण्याची संधि

सतरावें वर्ष पूर्ण होऊनहि सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी न मिळाल्यामुळें अण्णांच्या शिक्षणाची गाडी दैवानें क्रूरपणें दुसऱ्यांदा कशी थांबविली याची हकीगत मागील प्रकरणांत सांगितलीच आहे. पण त्याच दैवानें अण्णांच्या शिक्षणाच्या गाडीला वेगळ्याच फाट्यावर नेण्यासाठीं एकाएकीं 'सिग्नल' दिला व हिरवें निशाण दाखविलें! माणसाच्या आयुष्यांत दैव कसा बरावाईट खेळ खेळत असतें याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अंधाराची परिसीमा झाल्यानंतर प्रकाशाची तिरिप दाखवून आशेची ज्योत जागती राखण्यांत दैव मोठें कुशल असतें हेंच खरें.

अण्णा साताऱ्याहून परत आल्यानंतर सुमारें दोन महिन्यांनीं खुद्द मुरूड गांवांतच एक लहानशी इंग्रजी शाळा सुरू झाली. ही फार अनपेक्षित घटना होती. इंग्रजी शिकण्याविषयीं अण्णांच्या मनांत जबरदस्त इच्छा असूनहि तो योग आतांपर्यंत जमून आला नव्हता व यापुढें तो येईल अशी पुसटशी आशाहि न उरल्यानें अण्णा मनांतून अतिशय निराश झालेले होते. मराठी शिक्षणाच्या रूळांवरूनच आपल्या शिक्षणाची गाडी ढकलत ढकलत, प्रसंगीं थांबत थांबत,

जास्तींत जास्त म्हणजे मराठी ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षकाचें सर्टि फिकेट घेण्याच्या टप्प्यापर्यंत जाईल असा आडाखा अण्णांनीं नाइलाजा आपल्या मनाशीं बांधला होता. इंग्रजी शिक्षण घेणें ही अण्णांच्या काळां एक अत्यंत दुर्मिळ गोष्ट समजली जात असे व ती संधि आपल्य भाग्यांत येईल अशी आशाहि अण्णांनी एव्हांना सोडून दिली होती.

अण्णा अशा मनःस्थितींत असतांनाच मुरूड गांवांतच इंग्रज शिकण्याची सोय उपलब्ध झाली. गांवांतील एक सधन गृहस्थ पांडुरं दाजी बाळ यांचा अण्णांहून दोनतीन वर्षांनीं लहान असा एक मुलग होता. त्याची मराठी पांचवी इयत्ता पूर्ण झाल्यामुळें त्याला इंग्रज शिकविण्यासाठीं काय करावें या विचारांत ते होते. त्यावेळीं सोमण गुरु जींनीं त्यांना अशी युक्ति सुचविली कीं, इंग्रजी शिकविणारा एकाद शिक्षक मुरुडांत आणल्यास दुसऱ्या कित्येक मुलांनाहि इंग्रजी शिक ण्याची संधि मिळेल. हा विचार त्यांना पटला. शिक्षकानें पांडुरं दाजींच्या घरींच राहावें, जेवावें आणि इतर मुलांकडून एक एक रुपय प्रमाणें जी फी मिळेल ती शिक्षकानें पगार म्हणून घ्यावी अश योजना ठरली. त्याप्रमाणें मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकलेले एक गृहस् पांडुरंग दाजींनीं मुंबईहून आणविले. शाळेसाठीं जागा शोधण्याचा प्रश्न हल्लींप्रमाणें निर्माण झाला नाहीं. कारण विशिष्ट आकाराच्या मापाच्या खिडक्यादारें असलेल्या आणि विशिष्ट उंचीच्या व लांबी रुंदीच्या डेस्कादि फर्निचरनें सजविलेल्या अशा सुसज्ज इमारतींमध्येंच शाळा सुरू कराव्यात असा शिक्षणखात्याचा नियम त्यावेळीं नसे. शिक्षक व विद्यार्थी यांची विद्येसंबंधींची तळमळ व उत्कटता हेंच त्यावेळीं एकाद शाळा सुरू करण्याला आवश्यक असें मुख्य भांडवल असे. त्यामुळें मुरु डांतील ही नवी इंग्रजी शाळा एका घरांतील गोठ्याच्या माडीवर सुरू झाल यांत आश्चर्य काय ? खालच्या मजल्यावर गाईम्हशींचे विशिष्ट आवाज



आणि वरच्या मजल्यावर एका परकीय भाषेचीं मुळाक्षरें शिकण्या-करितां आतुर झालेल्या मुलांची घोकंपट्टी हा योग किती विचित्र होता !

अशा या वातावरणांत वयाला साडेसतरा वर्षें पूर्ण झालेले अण्णा ए, बी, सी, शिकूं लागले. आपल्या जीवनांत ही एक अपूर्व संधि निर्माण झाली आहे हें ओळखून अण्णांनीं इंग्रजीच्या अभ्यासाला मनापासून सुरुवात केली. सोमण गुरुजींचा पाठिंबा त्यांना सतत होताच. त्यामुळें थोड्या महिन्यांतच त्यांनीं इंग्रजी पहिलीचा अभ्यास पुरा केला. इंग्रजी दुसरीचा अभ्यास चालू असतांना मध्येंच ते मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेसाठीं कोल्हापुरास गेले. आदल्या वर्षीं सातारा येथें वाईट अनुभव आल्यामुळें यंदा त्यांनीं कोल्हापूर येथें जाण्याचें ठरविलें. सुदैवानें त्यांना प्रवासासाठीं सोबत म्हणून त्यांचे चुलत बंधु श्री. गंगाधरपंत कर्वे हे लाभले. हे गृहस्थ अण्णांपेक्षां बाराचौदा वर्षांनीं वडील होते व शिक्ष-काच्या आपल्या नोकरींत बढती मिळावी या हेतूनें सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला बसण्यास ते उद्युक्त झाले होते. गंगाधरपंतांच्या साहचर्यामुळें प्रवास चांगला झाला आणि अण्णांच्या कृश अंगलटीमुळें व भित्र्या स्वभावामुळें पूर्वीप्रमाणें वयाची अडचण उपस्थित न होतां परीक्षेला बसण्याची परवानगीहि सहज मिळाली. कोल्हापूरच्या या परीक्षेंत अण्णा चांगल्या प्रकारें पास झाले हें सांगावयास नकोच.

कोल्हापूराहून परत आल्यानंतर 'पुढें काय ?' हा प्रश्न अण्णांपुढे आ वासून उभा नव्हता. कारण त्यांचें इंग्रजी शिक्षण चालूंच होतें. त्यामुळें कोल्हापूरची वारी आटोपतांच अण्णांनीं इंग्रजीच्या अभ्यासावर जोर दिला. पुढील पांचसहा महिन्यांत अण्णांनीं इंग्रजी दुसरीचा व तिसरीचाहि अभ्यास पूर्ण केला. अशा प्रकारें साताऱ्याहून परत आल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत इंग्रजीच्या तीन इयत्ता त्यांच्या पदरांत पडल्या आणि आनंद, उत्साह व आशा यांनीं अण्णांचें मन मोहरून गेलें.

* * *

## प्रकरण अकरावें

* * * * * * * * * * * * * *

# शिक्षणांतील तिसरा अडथळा

आलेल्या संधीचा अण्णांनीं पुरेपूर फायदा करून घेतला व गांवांतल्या गांवांतच इंग्रजी शिक्षणाबाबत उत्तम प्रगति केली हें पाहून त्यांचे आई-वडील व सोमणगुरुजी यांना फार आनंद झाला आणि अण्णांच्या पुढील शिक्षणासंबंधीं काय करावें याबाबत त्यांनीं आपापसांत विचार सुरू केला. एव्हांना अण्णा एकोणीस साडेएकोणीस वर्षें वयाचे झाले होते व वास्तविक या वयाच्या मुलानें उदरनिर्वाहासाठीं नोकरी धरणें कुटुंबाची सांपत्तिक परिस्थिति विचारांत घेतां योग्य दिसलें असतें. शिवाय त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पंधरावें वर्ष लागतांच अण्णांचें लग्नहि उरकण्यांत आलें होतें ! त्यांची पत्नी लग्नाच्या वेळीं अवघी नऊ वर्षांची होती व शेजारीं राहणाऱ्या एका गृहस्थांचीच मुलगी असल्यानें प्रथमपासून अण्णांच्या ओळखीचीहि होती. अशा प्रकारें संसाराची जबाबदारीहि अण्णांवर पडली असल्यानें त्यांनीं कांहीं न मिळवितां अधिक शिकत राहावें व तेंहि इतकें वय वाढल्यावर हें कोणालाहि सहजीं पटण्यासारखें नव्हतें.

परंतु अण्णांचे वडील फार महत्त्वाकांक्षी गृहस्थ होते. आपल्या एकाद्या तरी मुलानें खूप शिकावें असें त्यांना वाटत होतें. कुटुंबाचें दारिद्र्य जावें व आपल्या कुटुंबाला पूर्वींप्रमाणें समाजांत मानमान्यता मिळावी याकरितां आपल्या धाकट्या मुलानें शिक्षणाच्या द्वारां नशीब काढणें हा एकच हुकमी मार्ग त्यांना दिसत होता. सुदैवानें इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांना त्या काळीं सहजीं चांगली नोकरी मिळत असे. कॉलेजांत जाऊन बी. ए. होणारे फारच थोडे असत. मोठ्या पगाराच्या नोकऱ्या त्यांची वाटच



पहात असत. त्या दृष्टीनें आपल्या धाकट्या मुलाला जास्तींत जास्त वाव देणें. अंतिम दृष्टीनें फायद्याचें ठरेल असा हिशोब बाबांनीं मनाशीं बांधला होता. या विचारसरणीस सोमणगुरुजींचा पाठिंबा होता. अण्णांमध्यें अनेक गुण सुप्तपणें वावरत आहेत व योग्य वातावरण मिळाल्यास त्यांचा उत्कृष्ट प्रकारें विकास होईल असें सोमणगुरुजींना वाटत होतें. अण्णांनीं पदवीपर्यंतचें शिक्षण पूर्ण केल्यास ते कुटुंबाला चांगले दिवस तर आणतीलच परंतु त्याबरोबरच थोडीफार समाजसेवाहि करूं शकतील अशी खात्री सोमणगुरुजींना वाटत होती.

अण्णांच्या वडील बंधूंचे म्हणजे दादांचें इंग्रजी शिक्षण अर्धवटच झालें होतें व एव्हांना ते मराठी शाळेंतील शिक्षकाच्या पेशांत रमून गेले होते. त्याचप्रमाणें यावेळेपर्यंत अंबाताईचेंहि लग्न झालें होतें. त्यामुळें अण्णा हेच काय ते घरांत उरले होते. रात्रंदिवस कष्ट व काटकसर करून का होईना परंतु बाबा–आईचा संसार सुखानें चालला होता. तेव्हां आतां अण्णांच्या शिक्षणावर सर्व लक्ष व आशा केंद्रित करण्यांत त्या प्रेमळ व महत्त्वाकांक्षी मातापित्यांना जीवनांतील सर्वोच्च सुख होऊं लागलें. अशा या मनःस्थितींत असल्यामुळेंच बाबा–आईनीं एक महत्त्वाचा निर्णय घेतला.

तो निर्णय असा कीं, अण्णांना पुढील शिक्षणासाठीं रत्नागिरीला पाठविणें.

रत्नागिरीला हायस्कूल होतें. तेव्हां पुढील चार वर्षें अण्णांनीं रत्नागिरीला राहून मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पूर्ण करावी असें चित्र त्यांनीं डोळ्यापुढें रंगविलें. त्याकरितां जरूर तर अण्णांच्या मामांजवळून कर्ज काढावयाचें, परंतु कांहीं झालें तरी पैशाच्या दृष्टीनें अण्णांना काळजींत ठेवावयाचें नाहीं असा निश्चय बाबांनीं केला.

त्याप्रमाणें १८७७ च्या ऑगस्ट महिन्यांत अण्णा रत्नागिरीस रवाना

झाले. तेथें त्यांची सुरुवातहि फार चांगली झाली. अवघ्या दोन म
न्यांत तिसऱ्या इयत्तेची वार्षिक परीक्षा पास होऊन ऑक्टोबरपा
ते चौथींत बसले. तिसरीच्या परीक्षेंत त्यांचा नंबर पांचाच्या अ
आला व महिना दोन रुपयांची एक स्कॉलरशिपहि त्यांना मिळाली.

अण्णांचें हें सुयश ऐकून मुरुडांत सर्वांना आनंद झाला. आ
पुढील चार वर्षें हां हां म्हणतां जातील व अण्णा मॅट्रिक्युलेशन परीक्ष
उत्तम प्रकारें पास होऊन कॉलेजशिक्षणासाठीं मुंबईकडे पाय वळवती
याबद्दल कोणाच्याहि मनांत संशय उरला नाहीं.

इतक्यांत, अण्णांचें नेहमींचें दुर्दैव आड आलें! चौथ्या इयत्ते
जाऊन त्यांना दोनतीन महिने झाले तोंच त्यांना ताप येऊं लागल
त्यामुळें विश्रांतीसाठीं व उपचारांसाठीं ते मुरुडास घरीं आले. पर
येथें नवीनच प्रकारचा ताप सुरू झाला. या तापाची तऱ्हा मोठी विचि
होती. तीन दिवस बरें वाटावें व चौथ्या दिवशीं नेमक्या वेळीं ता
यावा असें सुरू झालें. या तापाचें नांव ' चातुर्थिक ज्वर ' ( चवथ्य
दिवशीं येणारा ताप ) असेंच होतें.

या तापानें अण्णांना फार त्रास दिला. त्यांचीं हाडें खिळखिळ
केलीं. हा मुलगा या तापांतून जगतो का मरतो अशी भीति बाबा
आईंच्या मनांत निर्माण झाली. त्यामुळें रत्नागिरीला पुन्हा परतून
अभ्यास सुरू करणें हा विचार मागेंच पडला. वर्षसहा महिने अण्णांनीं
मुरुडास राहून पूर्ण विश्रांति घेतली पाहिजे असा सल्ला वैद्यानें दिला.

अशा प्रकारें, अण्णांच्या शिक्षणाची गाडी त्यांच्या तऱ्हेवाईक दैवानें
तिसऱ्यांदा क्रूरपणें थांबविली.

* * *



प्रकरण बारावें

* * * * * * * * * * * * * * *

## मुंबई

ज्या ज्वरानें अण्णांचीं हाडें खिळखिळीं केलीं त्या चातुर्थिक ज्वराला अण्णांचें मन दुर्बल करतां आलें नाहीं. दुःख, अडचणी, अपयश व निराशा सोसण्याची अण्णांच्या मनाला गेल्या कांहीं वर्षांत खूपच संवय झाली होती. त्यांचें मन सतत खूप लांबवर पहात होतें. त्यामुळें तें निर्भय झालें होतें. रात्रीच्या काळोख्या अंधारानंतर निसर्गक्रमाप्रमाणे प्रकाशाचे हंसरे किरण अवतीर्ण होणारच याबद्दल त्यांच्या मनाला खात्री वाटत होती.

त्यामुळेंच, चातुर्थिक ज्वर अण्णांचें मन खचवूं शकला नाहीं. उलट, त्याचें आव्हान स्वीकारल्यामुळें अण्णांचें मन चौपटीपेक्षां अधिकच सशक्त व प्रबळ झालें. त्यामुळेंच मुरूडला आल्यावरहि त्यांनीं आपला अभ्यास पूर्णपणें बंद पडूं दिला नाहीं. रत्नागिरीच्या शाळेंत असतांना विकत घेतलेलीं चौथीचीं पुस्तकें त्यांच्याजवळ होतीं. त्या पुस्तकांचा अभ्यास करणें त्यांनीं कायम ठेवलें. अंगांत ताप असतांनाच नाइलाजानें अभ्यास बंद राही. पण इतर वेळीं चालू होई.

अण्णांची ही चिकाटी पाहून अण्णांचें आडमुठें दैव त्यांच्या बाजूला थोडेसें कललें. इंग्रजी चौथीच्या अभ्यासाबाबत मदत मिळण्याची व्यवस्था अनपेक्षितपणें जमून आली.

त्याची हकीगत अशी : प्रकृति बिघडल्यामुळें अण्णा जसे मुरुडास विश्रांतीसाठीं आले होते त्याचप्रमाणें धोंडोपंत मंडलिक हे गृहस्थहि प्रकृति नीट नसल्यामुळें मुरुडास घरीं आले होते. धोंडोपंत मंडलिक हे मुंबईला बी. ए.च्या वर्गांत होते व त्यामुळें चौथीच्या पुस्तकांचा

8719

अभ्यास करणाऱ्या अण्णांना मार्गदर्शन करणें म्हणजे त्यांच्या हात
मळ होता.

अण्णांच्या आतांपर्यंतच्या शिक्षणाची हकीगत समजल्यावर धों
पंतांना अण्णांविषयीं सहानुभूति वाटली व अण्णांना मदत करण्यास
आनंदानें तयार झाले. ज्या दिवशीं बरें वाटत असेल त्यावेळीं अण्
मंडलिकांकडे जात व पुढील धडे समजावून घेत.

हळूहळू अण्णांची प्रकृति सुधारत गेली. तापहि थांबला. गावांतल
मराठी शाळेंत एका शिक्षकाची जागा तात्पुरती रिकामी पडली होत
ती अण्णांना मिळाली. अण्णा मराठी शाळेंतले शिक्षक झाले ! अश
नोकरी करण्यामुळें जे पैसे मिळतील ते साठवावे व पुढील शिक्षणासाठ
त्यांचा उपयोग करावा अशी महत्त्वाकांक्षा अण्णांच्या मनांत होती.

या सुमारास सोमणगुरुजींची बदली झाल्यामुळें ते मुरूड सोडून
गुहागर येथें गेले होते. आपल्या लाडक्या शिष्याच्या इंग्रजी शिक्षणांत
खंड पडलेला पाहून त्यांना अतिशय दुःख होत होतें. मध्यंतरी त्यांनी
बाबांना कळविलें कीं, पैशाची गरज असेल तर मी पाठवितों; पण
अण्णांचें शिक्षण पूर्ण होईल असें कराच करा.

सोमणगुरुजींनीं अण्णांनाहि असा आग्रह चालविला कीं 'कांहीं
झालें तरी तूं मुरुडास राहूं नकोस; बाहेर पड. रत्नागिरी मानवली
नाहीं तर आतां मुंबईस जा. पण इंग्रजी शीक, मॅट्रिक पास हो. कॉले-
जांत जा, पदवीधर हो. स्वतः मोठा हो व समाजाच्या उपयोगी पड.'

१७७८ चा ऑक्टोबर महिना उजाडतांच अण्णांनीं मुंबईला
जायची उचल केली. त्यावेळीं ऑक्टोबर महिन्यांत शाळांचें नवें वर्ष
सुरू होत असे. त्यांची प्रकृति आतां ठीक झाली होती. धोंडोपंत
मंडलिकांच्या सहवासामुळें मुंबईच्या शाळा-कॉलेजांसंबंधीं व मुंबईंतील
राहाणीसंबंधीं अण्णांना पुष्कळ माहिती मिळाली होती. कारकुनाची



किंवा इतर नोकरी शोधण्यासाठीं मुरुडची अनेक मंडळी नुकतीच मुंबईकडे पाय वळवूं लागली होती. पेशवाईच्या काळांत कोंकणांतील लोक नशीब काढण्यासाठीं पुण्याकडे पहात; परंतु इंग्रजी अमदानी सुरू झाल्यापासून पुण्याचें महत्त्व कमी होत चाललें होतें. त्याऐवजीं मुंबईचें महत्त्व वाढलें होतें. मुंबई हें प्रांताच्या राजधानीचें शहर झाल्यानें तेथें नोकरीधंद्याला लहानमोठ्यांना वाव मिळत असे. ह्या कालमानानुसार मुरूड गावांतील अनेक तरुण मंडळी नोकरीच्या शोधार्थ मुंबईस जात असत व नोकरी मिळविण्यांत यशस्वीहि होत असत. यामुळें एका दृष्टीनें रत्नागिरीच्या हायस्कूलांत जाण्यापेक्षां मुंबईच्या हायस्कूलांत जाणें अण्णांना अधिक सोयीचें वाटलें. शिवाय रत्नागिरीची हवा त्यांना मानवली नव्हतीच. तेव्हां आतां पुन्हां एकदां इंग्रजी शिक्षण पूर्ण करण्याचा निकराचा प्रयत्न करून पहावा या हेतूनें अण्णांनीं मुंबईच्या हायस्कूलांत जाण्यासंबंधीं आई-वडिलांजवळ विषय काढला. अण्णांची शिक्षणासंबंधींची आतुरता पाहून त्या प्रेमळ मातापित्यांना अण्णांचें मन मोडवेना. 'तुझ्या शिक्षणासाठीं मी जरूर तर कर्ज काढीन, परंतु तूं काळजी न करतां अभ्यास कर. मुख्यतः प्रकृतीस जप' असें बाबांनीं अण्णांना सांगितलें.

धन्य अण्णांची व धन्य अण्णांच्या मातापित्यांची !

* * *

प्रकरण तेरावें


★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

## रॉबर्ट मनी स्कू


मुंबईंतील शाळेंत नांव घातल्यामुळें अण्णांच्या डोळ्यापुढें एक
विश्व उमलूं लागलें. मुरूडपेक्षां मुंबईंतील जीवन फारच वेगळें ह
गरीब-श्रीमंतीची जशी दोन आत्यंतिक टोंकें मुंबईंत दिसत त्याचप्रम
ज्ञान-अज्ञान, सुख-दु:ख, आरोग्य-रोगराई ह्यांचीहि विचित्र सरमिस
झालेली दिसत असे. मानवी जीवनाच्या गुंतागुंतीचें हें दर्शन अण्णा
अभिनव होतें. एकंदर विश्वाच्या पसाऱ्याच्या मानानें आपण कि
क्षुद्र म्हणजे कमी महत्त्वाचें आहोंत असा तुलनात्मक विचार मनांत ये
लागल्यामुळें अण्णा मुंबईंत आल्यापासून आपल्या वैयक्तिक जीवनांत
अडीअडचणींकडे वेगळ्या दृष्टिकोनांतून पाहूं लागले.

सुदैवानें, अण्णांचें शाळेंमधील बस्तान हळूहळू ठीक बसूं लागल
' रॉबर्ट मनी स्कूल ' ही शाळा त्या काळीं एक चांगल्यापैकीं शा
म्हणून सुविख्यात होती. त्या शाळेंत अण्णांनीं हळूहळू आपलें बस्त
बसविलें. जेव्हां ते मुंबईस आले तेव्हां चौथ्या इयत्तेचा अभ्यास घरीं
पूर्ण करून आले होते. रॉबर्ट मनी स्कूलमध्यें पांचवीच्या प्रवेशासाठीं ज
चांचणी-परीक्षा घेण्यांत आली त्यांत ते चांगल्या रीतीनें यशस्वी झाले
त्यामुळें त्यांना पांचव्या इयत्तेंत बसण्याची परवानगी मिळाली.

रॉबर्ट मनी स्कूलांत जाणारे एकवीस वर्षांचे अण्णा वाचकां
आपल्या डोळ्यांपुढें आणून पाहावे. एकविसाव्या वर्षीं तेराचौदा व
वयाच्या इतर विद्यार्थ्यांबरोबर एकाच वर्गांत शिकणें हें अण्णांना निश्चितप
अवघड जात असेल. विशेषतः शिक्षकांकडून एकादे वेळीं रागाव



मैं भी एक बच्चा हूं । अण्णासाहेब को पूछो ।



मुलांकडून अभिनंदन



घेण्याचा किंवा शिक्षा भोगण्याचा प्रसंग जेव्हां अण्णांवर आला असेल तेव्हां त्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील बरें !

अण्णांच्या मनाला सोसाव्या लागलेल्या चमत्कारिक यातनांची कल्पना यावी म्हणून एक घडलेली गोष्ट उदाहरणादाखल सांगतों. मुलांनीं रोज इंग्रजी कॉपी काढून आणावी असा अण्णा ज्या वर्गांत होते त्या पांचवीच्या शिक्षकांचा नियम होता. मुलांचें अक्षर सुधारावें म्हणूनच कॉपीसंबंधीं शिक्षकांचा आग्रह असे. कॉपीला मिळणारे गुण सहामाही व वार्षिक परीक्षांच्या निकालांत धरण्यांत येत असल्यामुळें व त्या गुणांवर कुणाला स्कॉलर्शिप मिळणार हें ठरणार असल्यामुळें कॉपीकडे विद्यार्थीहि नेटानें लक्ष पुरवीत. आपल्याला स्कॉलर्शिप मिळावी म्हणून अण्णांचीहि सुरुवातीपासून धडपड होती. म्हणून अण्णा कॉपी नीट काढण्याबाबत अधिक लक्ष पुरवूं लागले व त्यामुळें त्यांचें इंग्रजी अक्षरहि सुधारूं लागलें. कोणतीहि गोष्ट हातीं घेतली कीं, ती मनापासून करावयाची असा अण्णांचा स्वभावच बनला होता. यामुळें पांचवींत आल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत अण्णांची कॉपी इतर मुलांपेक्षां अधिक चांगली ठरूं लागली. अण्णांचें हें यश पाहून वर्गांतील मत्सरी स्वभावाच्या कांहीं मुलांना असा संशय आला कीं, अण्णा आपली कॉपी स्वतः काढीत नसून ती वर्गांतील दामले या विद्यार्थ्याकडून काढून घेत असावेत. त्याप्रमाणें त्या विद्यार्थ्यांनीं शिक्षकांकडे (त्यांचें नांव जॅक्सन असें होतें) तक्रार केली. त्यामुळें अण्णा व दामले अशा दोघांच्या कॉप्या जॅक्सनसाहेबांनीं ताडून पाहिल्या. जॅक्सनसाहेब हे शिस्तीसंबंधीं फार कडक गृहस्थ होते. दुर्दैवानें त्यांनाहि अण्णांचा संशय आला. त्यांनीं अण्णा व दामले अशा दोघांना आपल्या टेबलापाशीं बोलावलें. 'तूं याला कॉपी काढून दिलीस का ?' असें त्यांनीं दामलेला विचारलें. दामलेनें नकार दिला; तथापि जॅक्सनसाहेबांना तें खरें वाटेना.

**त्यांची उग्र मुद्रा पाहून** अणणा फार घाबरून गेले व त्यामुळें त्यां
तोंडांतून शब्द निघेना. जॅक्सनसाहेबांनीं एका मुलाला ऑफिस
पाठवून वेताची छडी आणली; व अतिशय रागानें अण्णांना ज
बोलावून हात पुढें करण्यास सांगितलें. हा प्रसंग अण्णांच्या दृष्टीनें अ
अपमानास्पद होता. खोटें बोलल्याबद्दल शिक्षा आणि ती अण्णांना! अण्ण
ओळखणारा कुणीहि माणूस स्वप्नांतहि अण्णा खोटें बोलतील
म्हणाला नसता. पण येथें त्यांना कुणी ओळखत नव्हतें. हें मुरूड न
ही मुंबई होती. येथें लोकांच्या पोटांत विश्वासापेक्षां अविश्वा
अधिक होता. जो तो स्पर्धेसाठीं येथें आला होता. अण्णांना स्कॉलि
मिळूं नये व ती आपल्याला मिळावी याकरितां त्यांच्यावर अ
घेणारे ते विद्यार्थी मुंबईच्या संस्कृतींत पूर्ण मुरलेले होते.

पण अण्णांच्या अंतःकरणांत काहूर उठले. त्यांचीं कानशिलें ग
झालीं. त्यांचे डोळे पाण्यानें डबडबले. छड्या घेण्यासाठीं जो उज
हात त्यांनीं वर उचलला तो एकाएकीं अभावितपणें त्यांनीं कपाळा
नेला. ‘ हाय माझ्या दैवा ! ’ असें कांहींतरी ते पुटपुटले. अण्णांच्या
अंगविक्षेपाकडे शिक्षकांचें लक्ष गेलें व हा मुलगा कदाचित् निरपरा
असेल अशी त्यांना शंका आली. अण्णांच्या मदतीला देवच धां
आला, दुसरें काय ?

जॅक्सनसाहेबांनीं विचारलें, ‘ तूं पुन्हां कॉपी काढून दाखविते
काय ? ’ हा प्रश्न ऐकून अण्णांना आनंद झाला. ते ‘ होय ’ अ
म्हणाले. तेव्हां लागलीच अण्णांना कॉपी काढण्यास बसविण्यांत आ
वास्तविक, ‘मी कॉपी पुन्हां काढून दाखवितों’ असें अण्णांना स्वतःला
म्हणतां आलें असतें. जॅक्सनसाहेबांनीं जेव्हां प्रथम चौकशी सुरू के
तेव्हां अण्णांचा चेहेरा जर घाबरलेला दिसला नसता तर छडी आणण्य
पर्यंत मजल गेलीच नसती. पण अण्णा म्हणजे कमालीचे भित्रे. त्यां



जॅक्सनसाहेबांशीं इंग्रजींतून बोलावें लागे व त्यामुळें अण्णा अधिकच घाबरून गेले होते. असो. अण्णांनीं पुन्हां काढून दाखविलेली कॉपी पूर्वीच्या कॉपीइतकीच चांगली ठरली व त्यामुळें वर्गांतील मुलांचा अण्णांविषयींचा आदरभाव वाढला. जॅक्सनसाहेबांचेंहि अण्णांसंबंधीं अनुकूल मत झालें.

अशा प्रकारचे कांहीं चमत्कारिक प्रसंग अण्णांच्या मुंबईंतील शालेय जीवनांत जरी अधून मधून घडत होते तरी एकंदरीनें अण्णांच्या शिक्षणाची गाडी मुंबईस आल्यापासून पुष्कळच सुरळीतपणें चालू लागली. पांचवीच्या सहामाही परीक्षेंत अण्णांचा नंबर बराच वर आला व त्यांना स्कॉलर्शिप मिळूं लागली.

* * *

## प्रकरण चौदावें

* * * * * * * * * * * * * * *

## एक अनपेक्षित संकट

अण्णांना स्कॉलर्शिप मिळाल्याची बातमी त्यांच्या आईवडिलांना जेव्हां समजली असेल तेव्हां त्यांना आपल्या मुलाच्या हुषारीबद्दल किती अभिमान वाटला असेल ! खेडेगांवांतील लहान शाळेंतून शहरां-तील मोठ्या शाळेंत येणारीं मुलें अभ्यासांत मागें पडण्याचा संभवच अधिक असतो. परंतु अण्णांनीं आपल्या हुषारीच्या जोरावर मुंबईंतील रॉबर्ट मनी स्कूलसारख्या प्रख्यात शाळेंतही चमक दाखविली हें विशेषच होतें.

त्याकाळीं पोस्टखातें नुकतेंच सुरू झालें असल्यानें मुरूडहून मुंबईला टपाल वारंवार जात नसे. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत पत्रें फारच

उशीरां मिळायचीं. त्यामुळें घरून आलेलें पत्र हें अण्णांच्या मुंबईंती
एकाकी जीवनांत एक फार मोठें आशेचें स्थान बनूं लागलें होतें. वाचक
पैकीं ज्यांना विद्याभ्यासासाठीं अगर इतर कारणांसाठीं आई–बापांपासू
दूर राहावें लागलें असेल त्यांना घरून आलेल्या पत्रासंबंधीं अण्णां
किती विलक्षण उत्सुकता वाटत असेल याची अचूक कल्पना करत
येऊं शकेल.

पण एके दिवशीं अशा एका पत्रानेंच, अण्णांच्या कधीं स्वप्नांत
आली नसती, अशी अत्यंत दुःखद वार्ता आणली.

पावसाळ्याचे दिवस नुकतेच सुरू झाले होते. मुंबईला येऊन
अण्णांना सातआठ महिने झाले होते. मुंबईचा पहिलाच पावसाळा
अनुभवीत होते. आज सकाळपासूनच विशेष जोरानें पाऊस पडत
होता. दोनतीन दिवसांत सूर्यदर्शन न झाल्यानें अण्णांना मनांतून कसे
सेंच वाटत होतें. अशा निरुत्साही स्थितींत ते शाळेला निघण्याच्य
गर्दींत होते, तोंच पोस्टमननें त्यांच्या हातीं एक बंद पाकीट दिलें.

थरथरत्या हातानेंच अण्णांनीं तें पाकीट फोडलें. पहिल्या दोन ओळ
वाचल्यावर त्यांना पुढलि ओळी वाचवेनात.

अवघ्या पंधरा दिवसांचा ताप येऊन बाबा हें जग सोडून गेले
होते. होय, बाबा हें जग सोडून गेले होते !

काय, झालें तरी काय ? असें एकदम कसें झालें ? मला कां नाहीं
मुरूडला बोलावलें ? निदान माझी शेवटची भेट तरी कां होऊं शकली
नाहीं ? अशा शेंकडों विचारांनीं अण्णांचें डोकें बधिर झालें.

त्या दिवशीं अण्णा किती वेळ तरी घरांतच बसून राहिले. आज
पर्यंत त्यांनीं आपल्या शिक्षणासंबंधीं अनेक बिकट अडचणींना तोंड
दिलें होतें. पण आजचें हें संकट फार वेगळें होतें; फार अनपेक्षित
होतें. आतां बाबा पुन्हां दिसणार नव्हते. मुलानें मुंबईला जाऊन



शिकावें व मोठें व्हावें, कर्वे घराण्याचें नांव उज्ज्वल करावें व मुरूड गांवाची कीर्ति वाढवावी असें ज्या प्रेमळ, निग्रही व महत्त्वाकांक्षी पित्याला वाटत होतें तो आतां कोठें होता ? त्याच्या प्रेमळ छत्राविना अण्णांच्या शिक्षणाचे तारूं आतां योग्य दिशेनें जाऊं शकेल का ?

* * *

## प्रकरण पंधरावें

* * * * * * * * * * * * * *

# अडचणींवर यशस्वी मात

अडचणी संपल्या असें वाटावें तेव्हांच एखाद्या नवीन संकटानें दत्त म्हणून अकस्मात् येऊन उभें ठाकावें असा जणूं अण्णांच्या जीवनांतील विलक्षण योगायोग होता. अण्णा मुंबईला आल्यानंतर अवघ्या सात-आठ महिन्यांनींच बाबांचा मृत्यू घडावा यापरतें दुर्भाग्य कोणतें ? परंतु अडचणींना तोंड देण्याची अण्णांची शक्तीहि एव्हांना खूपच वाढली होती. माणसाचें मन ही एक अद्भुत चीज आहे, हेंच खरें ! संकटें, अडचणी, निराशा, दुःखें यांना तोंड देण्याची त्याची शक्ति जितकी वाढवावी तितकी ती वाढूं शकते.

'बाबांच्या आकस्मिक मृत्यूमुळें आईला झालेलें दुःख आपल्यापेक्षांहि मोठें नसेल का ? आतां ह्यापुढचें जीवन तिनें कुणासाठीं जगायचें ? आपल्यासाठींच ना ? बाबांच्या मृत्यूनंतर मुलगा म्हणून आपली जबाबदारी अधिकच वाढली, नाहीं का ? मृत्यूचें दुःख करीत राहून आपल्या शिक्षणांत खंड पडूं देणें बाबांच्या आत्म्याला आवडेल का ? आपल्या पाठीमागें आपला मुलगा गर्भगळित होऊन स्वस्थ बसला असें पाहून बाबांच्या आत्म्याला अपरंपार दुःखच होईल ! त्यापेक्षां, दुर्दैवाचा हा वार

धैर्यानें सहन करून प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यानेंच बाबांचें ऋण खऱ्या अर्थानें फेडल्यासारखें होईल, नाहीं का ?'...... अशासारखा विवे अण्णांनीं आपल्या मनाशीं करून आईला एक सांत्वनपर पत्र लिहिलें व मुंबईंतील आपल्या जीवनक्रमाला पुन्हां सुरुवात केली.

मुंबईंतील अण्णांच्या जीवनक्रमांत अडचणी अनेक होत्या. आतां पर्यंतचें त्यांचें इंग्रजी शिक्षण पद्धतशीर न झाल्यामुळें त्यांचें इंग्रज कच्चें राहिलें होतें ही एक अडचण होती. पैशाची अडचण ही त प्रमुखच होती. अण्णांच्या वडिलांनीं अण्णांच्या मामांकडून थोडें क काढून त्यांतून अण्णांच्या पैशाची व्यवस्था चालविली होती. परं कर्जाचे पैसे अधिक वाढूं नयेत अशी विवंचना अण्णांना नेहमीं लागलेली असे. राहण्याची जागा व जेवण्याची व्यवस्था याबाबत अडचणी होत्याच. शिवाय मुरूडचें वातावरण मुंबईंत नसल्या अण्णांचें मन वारंवार अस्वस्थ होत असे. सोमण गुरुजींप्रमाणें कु जिव्हाळ्याचा मार्गदर्शक मुंबईंत त्यांच्या पाठीमागें उभा नव्हता.

परंतु या अडचणींनीं नाउमेद न होतां कांहीं झालें तरी आपण मॅट्रि व्हावयाचेंच असा अण्णांनीं निश्चय केला होता. बाबा वारले तेव्हां पांचवींत होते. सहावी व सातवी अशीं आणखी दोन वर्षें त्यांच्यापु होतीं. या काळांत कांहीं झालें तरी माघार घ्यावयाची नाहीं व पडती ते सर्व कष्ट सोसावयाचे अशी प्रतिज्ञा अण्णांनीं केली. बाबांच आकस्मिक मृत्यू अण्णांचें मन खचवूं शकला नाहीं; उलट त्या आप त्तीनें त्यांच्यापुढें एक नवें जबरदस्त आव्हान उभें केलें व त्यांचें म अडचणी सहन करण्याकरितां पोलादाप्रमाणें घट्ट बनविलें.

शाळा व घरचा अभ्यास संभाळून पैसे मिळविण्यासाठीं अण्णांनीं जी धडपड केली त्यांत खालच्या वर्गांतील मुलांच्या शिकवण्या कर हा एक महत्त्वाचा उपाय त्यांना सांपडला. शिकवणी करण्याची वा



त्यांना थोडीशी योगायोगानेच सांपडली. त्याचें असें झालें कीं, ते पांचव्या इयत्तेंत असतांना त्यांच्याच वर्गांतील एका मुलानें 'तूं माझ्या धाकट्या भावाला शिकवशील काय ?' असें अण्णांना विचारलें. हा प्रश्न अगदीं अनपेक्षित होता. परंतु अण्णांनीं पूर्वी रत्नागिरीहून आजारी पडून आल्यानंतरच्या विश्रांतीच्या काळांत आपल्या गांवांतील मराठी शाळेंत तीनचार महिने शिक्षकाची तात्पुरती नोकरी केल्यामुळें मुलांना शिकवण्यासंबंधीं त्यांच्याजवळ थोडाफार अनुभव जमला होता. त्यामुळें अण्णांनीं एकदम 'हो' म्हटलें व पगारासंबंधीं कांहीं एक बोलणें न करतां दुसऱ्या दिवसापासून रोज एक तास याप्रमाणें शिकवण्यास सुरुवात केली. या कामाबद्दल आपल्याला निदान दोन रुपये दरमहा मिळतील असा अण्णांचा अंदाज होता. परंतु महिना झाल्यानंतर अण्णांच्या हातावर फक्त एक रुपया ठेवण्यांत आला ! तेव्हां अण्णांचा थोडासा विरस झाला. तथापि मुंबईस आल्यानंतर स्वतःच्या कष्टान मिळविलेला हा पहिला रुपया होता व त्यामुळें अण्णांच्या जीवनांतील त्याचें महत्त्व अपूर्व होतें ! परंतु फार कमी वेतन मिळत असल्यानें अण्णांनीं ती शिकवणी दुसऱ्या दिवसापासूनच सोडली. अर्थात् ती शिकवणी सोडतांना अण्णांनीं कोणतीहि तक्रार किंवा भांडण केलें नाहीं. आपला जेवढा वेळ व श्रम खर्च होतात त्या मानानें महिन्याला एक रुपया फार कमी होतो असें त्यांनीं नम्रपणें सांगितलें. त्या मुलाच्या वडिलांना अधिक पैसे देणें शक्य नसल्यानें अण्णांची ही पहिली शिकवणी तेथेंच संपली.

परंतु ह्या अर्थयशस्वी व्यवहारापासून अण्णांचा एक मोठाच लाभ झाला. तो लाभ असा कीं, शिकवण्या करण्याची कल्पना त्यांच्या मनांत पूर्णपणें रुजली. आपल्या प्रवृत्तीशीं जमणारा असा हा एक उद्योग आहे असेंहि त्यांच्या मनानें घेतलें. त्यामुळें पहिली शिकवणी संपल्याबरोबर

ते इतर शिकवण्यांच्या शोधांत राहिले. सुदैवानें तशी संधि लवकर आली व जी दुसरी शिकवणी त्यांना लाभली ती ते मॅट्रिक्युलेशन पा होईपर्यंत टिकली. अधूनमधून आणखीहि एकदोन शिकवण्या त्यांना मिळत प्रत्येक शिकवणीचे दोन अगर तीन रुपये पदरांत पडत. शिकवण्यां व्यतिरिक्त आणखीहि एक काम अण्णांना मिळालें होतें. प्रत्येक रविवारी एका गृहस्थांकडे जाऊन त्यांच्याबरोबर एक तास 'नवनीत' य पुस्तकांतील कांहीं भाग अण्णांना वाचावा लागे. या कामाबद्दल अण्णांना दर खेपेला दोन आणे मिळत असत. अशा रीतीनें महिन्याचे आ आणेच मिळत. पण या अल्प मिळकतीबद्दलहि अण्णांना फा आनंद होई.

शिकवण्यांप्रमाणेंच अण्णांच्या मिळकतींत जी दुसरी भर पडत असे ती म्हणजे त्यांना मिळणाऱ्या स्कॉलर्शिपांच्या पैशांची होय. अण्णांच इंग्रजी विषय कच्चा होता व इतिहास हा त्यांच्या फार आवडीचा विषय नव्हता. त्यामुळें या दोन विषयांत त्यांना कमी मार्क पडत. परंतु उरलेल्या विषयांवर बरीच मेहनत घेऊन अण्णा इंग्रजी–इतिहासाची कमतरता तिकडे भरून काढीत. त्यामुळें पांचव्या व सहाव्या इयत्तेंत अण्णांना नेहमीं पहिली स्कॉलर्शिप मिळत गेली. सातव्या इयत्तेंतहि त्यांची स्कॉलर्शिप टिकली, परंतु पहिली स्कॉलर्शिप मिळाली नाहीं.

स्कॉलर्शिप कायम राखून व शिकवण्या करून पैसे मिळविणें हा जसा पैशाची अडचण सोडविण्याचा एक मार्ग होता त्याप्रमाणेंच काट-कसरीचा अवलंब करणें हाहि अत्यंत हुकमी मार्ग होता. 'पैसे वांचविणें हें पैसे मिळविण्यासारखें असतें' असें जें सुभाषित आहे तें अण्णांनी आईबापांचें उदाहरण पाहून संपूर्णपणें आत्मसात् केलें होतें. त्यामुळें शक्य तेथें तेथें काटकसर करणें अशी अण्णांनीं स्वतःला संवय लावून घेतली होती. राहाण्याची व्यवस्था, जेवणखाण, कपडे वगैरे सर्व गरजां-



बाबत ते शक्य तितके काटकसरीनें वागत. मुगभाटांतील आंग्र्यांच्या चाळींतील दामले या मुरूडच्या एका मित्राच्या घरीं ते राहात असत. त्याच्या घरीं जागा थोडी व माणसें खूप अशी परिस्थिति होती. त्यामुळें अण्णांचा मुक्काम नेहमीं ग्यालरींत असे ! जेवणासंबंधीं खाणावळ महाग पडते म्हणून अण्णांनीं एक वर्षभर हातानें स्वयंपाक करण्याचा प्रयोग करून पाहिला. कपड्यांबाबत तर ते फारच साधेपणानें वागत. शहरी जीवनांतील ज्या चैनीच्या संवयी असतात त्यांचा उपसर्ग त्यांनीं स्वतःला बिलकुल होऊं दिला नाहीं. शाळांना ज्या सुट्या पडत त्यांत प्रत्येक वेळीं गांवीं जाण्यानें खर्च वाढेल असा विचार करून ते शक्यतोंवर मुंबईसच राहात व त्या काळांत एकादें बारीकसारीक काम मिळाल्यास तें करून पैसे मिळवीत. एका सुटींत (१८८१ सालच्या सुटींत) त्यांना खानेसुमारीच्या वेळीं गणतीदाराचें (माणसांची नोंद करणा-ऱ्याचें) काम मिळालें. दररोज एक रुपया याप्रमाणें बारा दिवसांत त्यांना बारा रुपये मिळाले !

गरीब व महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यानें आपल्या अडचणींशी कशी झुंज द्यावी याचा एक आदर्श नमुना बाबांच्या मृत्यूनंतर अण्णांच्या जीवनांत दिसूं लागला होता. आपल्या जीवनांत निर्माण झालेल्या असंख्य अडचणी अण्णांना नामोहरम करूं शकल्या नाहींत. उलट अण्णांनीं त्यांच्यावर यशस्वीपणें मात केली.

* * *

## प्रकरण सोळावें

* * * * * * * * * * * * *

# एक मि

अण्णांचा स्वभाव असा होता कीं, ते आपणहून कुणाशीं मैत्र वाढवावयाला धजत नसत. त्यांच्या स्वभावांतला हा मूळचा भित्रेपण परिस्थितीमुळें अधिकच वाढला होता. त्यामुळें रॉबर्ट मनी स्कूलमध्ये तीन वर्षें घालवूनहि त्यांना आपणहून एकहि चांगला मित्र जोडत आला नाहीं. परंतु मित्र मिळण्याबाबत अण्णांचें नशीब बलवत्तर ठरलें ते आपणहून मैत्री करण्याकरितां जरी पुढें सरसावले नाहींत तरी एक विद्यार्थी त्यांची मैत्री जोडण्याकरितां आपणहून पुढें झाला. एकाद्या लहान भावाला जसें जवळ करावें तसें वडीलकीच्या नात्यानें या विद्यार्थ्यानें अण्णांना आपल्याजवळ ओढून घेतलें.

अण्णांवर असें भ्रातृवत् प्रेम करणाऱ्या विद्यार्थ्याचें नांव नरहर बाळकृष्ण जोशी. अण्णांच्या व या गृहस्थांच्या स्वभावांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. परंतु मैत्री ही एक अत्यंत विलक्षण योगायोगाची घटना असते. स्वभावानें, प्रकृतीनें, बुद्धीनें, सांपत्तिक परिस्थितीनें, कौटुंबिक वातावरणानें किंवा धार्मिक संस्कारांनीं अगदीं वेगवेगळे वाढलेले दोन कोंवळे जीव मैत्रीच्या सुंदर वेलीवर आपलें घरटें आरामशीरपणें बांधूं शकतात. दुरून पाहाणाऱ्यांना याचें मोठें आश्चर्य वाटतें. या जीवांचें कसें पटत असेल अशी शंका त्यांना येते. पण मैत्री हें मानवी हृदयांचें मीलन असतें. त्याची भाषा, त्याचे नियम, त्याचे संकेत स्वाभाविक अपेक्षांचे किंवा मर्यादांचे बंध ओळखीत नसतात.

एकमेकांसंबंधीं आत्यंतिक आकर्षण वाटल्यानें, दोन जीवांनीं एकमेकांना किती बिलगावें याचा आदर्श नमुना म्हणजे अण्णा व नरहरपंत



यांची मैत्री ! नरहरपंत भेटेपर्यंत अण्णांचें जीवन एकाकी होतें; आणि नरहरपंतांची त्यांची जी गांठ पडली ती देखील विलक्षण योगायोगानेंच पडली. अण्णा ज्यावर्षीं सातवी इयत्तेंत गेले त्यावर्षींच नरहरपंत त्यांना प्रथम भेटले. नरहरपंत हे त्यावर्षीं मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें सातव्या इयत्तेंत मागें राहिले होते. नरहरपंत मॅट्रिक्युलेशनची परीक्षा कां नापास झाले याची हकीगत ऐकून अण्णांना फार वाईट वाटलें. नरहरपंतांचा इंग्रजीचा पेपर परीक्षकांच्या हलगर्जीपणामुळें हरवला होता व त्यामुळें त्यांना नापास व्हावें लागलें होतें! त्यांच्याप्रमाणेंच आणखी तीन विद्यार्थ्यांचे पेपर हरवले होते व त्या सर्वांना विद्यापीठानें नापास ठरविलें होतें. आपणावरील अन्याय दूर व्हावा म्हणून नरहरपंतांनी बरीच खटपट केली, पण ती फुकट गेली होती.

नरहरपंतांकडून वरील हकीगत ऐकून अण्णांना फार वाईट वाटलें. योगायोगांमुळें विद्यार्थ्यांचें कसें नुकसान होतें याचा अनुभव अण्णांनीं आतांपर्यंत अनेकदां घेतला होता. त्यामुळें नरहरपंतांची हकीगत ऐकून त्यांना विशेषच सहानुभूति वाटली. नरहरपंताच्या आतांपर्यंतच्या शिक्षणाची हकीगत ऐकूनहि शिक्षणासाठीं आपणाप्रमाणेंच धडपडणारा एक जोडीदार भेटल्याचा आनंद अण्णांना झाला. एकाद्या निबिड अरण्यांत आपला मार्ग कष्टानें शोधीत असतांना दुसरा एकादा आपणाप्रमाणेंच चांचपडणारा वाटसरू भेटला कीं त्या उभयतांना जसा आनंद होतो असा अपूर्व आनंद अण्णा व नरहरपंतांना झाला.

नरहरपंतांच्या शिक्षणाची हकीगत अतिशय स्फूर्तिदायक होती. पहिल्या इयत्तेपासून मराठी सहाव्या इयत्तेपर्यंत त्यांनीं आपला पहिला नंबर कधीं सोडला नव्हता. सहाव्या इयत्तेनंतर इंग्रजी शिक्षण घेण्याकरितां मुंबईला जावें अशी जबरदस्त इच्छा त्यांच्या मनांत निर्माण झाली. घरची फार गरिबी असल्यामुळें नरहरपंतांनीं अधिक न

शिकतां लवकर नोकरी धरावी असें त्यांच्या आईवडिलांचें मत हो
पण नरहरपंत फार करारी. एकादी गोष्ट मनांत घेतली कीं प्राण गे
तरी त्यांत बदल होऊं द्यावयाचा नाहीं असा त्यांचा स्वभाव हो
आपल्या बुद्धीचें व इतर गुणांचें त्यांना चांगलें पाठबळ होतें. त्यांच
स्वभावहि धीट व धडपड्या होता. अमुक गोष्ट मिळत नाहीं म्हणू
'हरि' 'हरि' म्हणत स्वस्थ बसावें असें त्यांच्या स्वभावांत नव्हतें. 'ला
मारीन तेथें पाणी काढीन' अशी त्यांची वृत्ति होती. त्यांचा आपल्य
मनावर ताबाहि खूप होता. त्यामुळें सहावीची परीक्षा झाल्यानंतर ए
दिवशीं त्यांनीं आपल्या गांवाला रामराम ठोकला व अशी घोर प्रतिज्ञ
केली कीं, मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होईपर्यंत पुन्हां घर
परतणार नाहीं.

मुंबईस आल्यानंतर नरहरपंतांनीं खूप हाल काढले. आपल्य
गांवच्या एका ओळखीच्या गृहस्थांकडे सर्व प्रकारचीं कामें–स्वयंपाक
बाजारहाट वगैरे–करून नरहरपंतांनीं हळूहळू आपलें बस्तान बसविलें
शाळेंतील अभ्यासांत त्यांचा नंबर फार वर येत असल्यामुळें रॉबर्ट
मनी स्कूलमधील शिक्षकवर्ग नरहरपंतांना कोणतीहि मदत करण्यास
तत्पर असे. त्यामुळें नरहरपंतांना सातव्या इयत्तेच्या परीक्षेकरित
पुन्हां बसण्याची वेळ जेव्हां आली तेव्हां शाळेतील खास ख्रिस्ती
मुलांसाठीं असलेल्या वसतिगृहांत अभ्यासासाठीं व निजण्यासाठीं
स्वतंत्र खोली त्यांना देण्यांत आली.

अण्णांशीं ओळख झाल्यावर नरहरपंतांनीं अण्णांना अभ्यासासाठीं
वसतिगृहाचे प्रमुख रेव्हरंड जानीअळी यांची खास परवानगी काढून
आपल्या खोलींत बोलाविलें. अण्णांकरितां एक खुर्चीटेबल व पलंग
मिळविला. त्यामुळें रोज सकाळीं व रात्रीं बराच वेळ अण्णा व नरहरपंत
एकत्र अभ्यास करूं लागले.



नरहरपंतांच्या सहवासामुळें अण्णांच्या स्वभावांत व विचारांत बराच फरक पडूं लागला. अर्थात् स्वभावापेक्षां विचारांत अधिक फरक पडला. अण्णांचा मूळचा संकोचीपणा, भिडस्तपणा व भित्रेपणा फारसा कमी झाला नाहीं; पण विचार बदलण्याच्या दृष्टीनें आणि बुद्धीला प्रौढपणा, विवेचकता व चिकित्सकपणा येण्याच्या दृष्टीनें अण्णांना नरहरपंतांकडून भरपूर लाभ झाला. अण्णांनीं पुढें जीं सामाजिक सुधारणेचीं कामें हातीं घेतलीं त्याचें बीजारोपण पूर्वीं सोमण गुरुजींनीं केलें होतें असें जर मानलें तर नरहरपंतांनीं खतपाणी घालून त्याचें संवर्धन केलें असें म्हणावें लागेल. याबाबतची अधिक हकीगत पुढील एका प्रकरणांत येणारच आहे.

एवढें मात्र नक्की कीं, आयुष्याच्या एका अत्यंत महत्त्वाच्या काळांत अण्णांना नरहरपंतांसारखा एक तेजस्वी व गुणी मित्र मिळाला व त्यामुळें त्यांचें मुंबईंतील जीवन अधिक यशस्वी होऊं शकलें. मॅट्रिकच्या परीक्षेला दोघेजण बरोबर बसले व दोघेहि चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले. नरहरपंतांना जगन्नाथ शंकरशेटची दुसरी स्कॉलर्शिप मिळून त्यांचा नंबर सर्व विद्यार्थ्यांत तिसरा आला व अण्णांचा सोळावा आला. अशा प्रकारें दोघांचे नंबर बरेच वर आल्यानें कॉलेजांत स्कॉलर्शिप मिळण्याची शक्यता निर्माण झाली.

* * *

## प्रकरण सतरावें

* * * * * * * * * * * * * *

### कॉलेज-जी

अण्णा व नरहरपंत या दोघांनीं ज्या दिवशीं विल्सन कॉलेजांत
घातलें तो दिवस त्या दोघांच्या जीवनांतील एक अतिशय मंगल दि
होता. त्या दोघांचे नंबर मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत बरेच वर आल्
त्यांना कॉलेजांत स्कॉलरशिपहि मिळाली. नरहरपंतांना दरमहा द
रुपये व अण्णांना दरमहा आठ रुपये याप्रमाणें स्कॉलरशिपची र
मिळूं लागली.

पैशासंबंधानें त्या दोघा मित्रांची काळजी आतां पुष्कळच क
झाली होती. स्कॉलरशिपच्या पैशाव्यतिरिक्त नरहरपंतांना क्वचित् एक
शिकवणी धरावी लागे. अण्णांना कधीं दोन, तर कधीं तीन अ
शिकवण्या करून जरूर तेवढे पैसे मिळत. हायस्कूल शिक्षणासा
अण्णांना आपल्या मामांकडून (म्हणजे रँ. परांजपे यांच्या वडिल
कडून) दोनशें रुपये कर्जाऊ घ्यावे लागले होते. हें कर्ज जितक
लवकर फिटेल तेवढें फेडावें असा निश्चय अण्णांनीं केला होत
त्यामुळें शक्य तितकी काटकसर करून दरमहा थोडेतरी पैसे ते माम
कडे पाठवीत.

कॉलेजांत आल्यापासून अण्णांची राहाण्याची व्यवस्था पूर्वीपेक्ष
बरीच चांगली होऊं शकली. याचें कारण या सुमारास नरहरपंतांन
स्वतंत्र जागा घेऊन आपलें बिऱ्हाड थाटलें. 'मॅट्रिक्युलेशन झाल्या
शिवाय मी गांवाचें तोंड पाहाणार नाहीं' अशी नरहरपंतांनीं चा
वर्षांपूर्वीं गांव सोडतांना प्रतिज्ञा केली होती व या वर्षीं त्यांनीं त
खरीहि करून दाखविली होती. त्यांचें लग्न लहानपणींच झालें हो



परंतु मुंबईस आल्यापासून त्यांनीं आपल्या पत्नीचें तोंडहि पाहिलें नव्हतें. 'एकदां तरी घरीं येऊन जा' असा आग्रह नरहरपंतांच्या वडिलांनीं त्यांना वारंवार केला होता, परंतु त्यांनीं आपला निश्चय एकदांहि ढळूं दिला नव्हता. परंतु आतां मॅट्रिक झाल्यामुळें ते आपल्या गांवीं जाऊन सर्व मंडळींची भेट घेऊं शकले व परत येतांना आपल्या पत्नीला बरोबर घेऊन आले. त्यांची पत्नी आतां मोठी झाली होती व त्यामुळें स्वतंत्र बिऱ्हाड सांभाळण्याची हिंमत तिच्यांत आली होती. एकदां एकादा बेत ठरला कीं, नरहरपंतांचा उत्साह उतूं जाऊं लागे व प्रत्येक गोष्ट चांगल्या प्रकारें करण्याविषयीं ते आटोकाट प्रयत्न करीत. त्यामुळें नवें बिऱ्हाड मांडतांना नरहरपंतांनीं सर्व गोष्टी झटपट केल्या. आंग्र्याच्या वाडीसमोर गोपीनाथ खत्र्याच्या चाळींत अगदीं वरच्या मजल्यावर दरमहा पावणेचार रुपयांची जागा त्यांनीं घेतली.

आपल्या जिवलग मित्रानें आपल्या घरीं राहावयास यावें असा आग्रह नरहरपंतांनीं स्वाभाविकपणेंच धरला. त्याप्रमाणें दामल्यांकडचें बिऱ्हाड सोडून अण्णा नव्या बिऱ्हाडीं दाखल झाले. कॉलेजांतील तीन वर्षें पूर्ण होईपर्यंत अण्णा तेथेंच राहिले.

या बिऱ्हाडाचा खर्च अतिशय काटकसरीनें केला जाई. जिन्नस विकत घेण्याच्या कामांत नरहरपंत तरबेज असत. स्वस्तांत पण चांगला माल ते आणीत. सर्व बाजार तेच करीत. अण्णा जमाखर्च ठेवीत. माणशीं दरमहा चार रुपयांत त्यांचा अन्नखर्च भागत असे.

कॉलेजचें पहिलें वर्ष कसें भुरकन उडून गेलें हें त्या दोघांना समजलेंच नाहीं. कॉलेजजीवनाची विशेष गंमत ती हीच असते. भोंवतालचें सर्व नवें नवें असतें व त्यामुळें विद्यार्थ्यांच्या हृदयांत एक प्रकारचें संगीत सुरू होतें. हें वाचूं का तें वाचूं, हें करूं का तें करूं असा गोड संभ्रम विद्यार्थ्यांच्या मनांत उत्पन्न होतो. आजच्या काळापेक्षां अण्णांच्या

वेळीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा आपल्या प्राध्यापकांशीं अधिक निकट संबंध येई. हल्लीं कॉलेजांत गर्दी फार. त्यामानानें प्राध्यापकांची सं अपुरी. त्यामुळें गुरुशिष्यांचे प्रेमाचे संबंध निर्माण होणें हल्लीं कठ होतें. पण प्रेम, जिव्हाळा किंवा आपुलकी नसली तर गुरु आपल शिष्याला काय देऊं शकणार ? ग्रंथांतून जी माहिती असते तीच गु मुखांतून यांत्रिकीपणानें आली तर त्यामुळें विद्यार्थी कॉलेजांत रम नाहींत. रेडिओवरून होणाऱ्या भाषणांप्रमाणें कॉलेजांतील व्याख्या निर्जीव वाटतात. परंतु अण्णांच्या काळीं गुरुशिष्यांचे संबंध पुष्क वाढूं शकत. त्यामुळें अण्णा कॉलेजांत पूर्णपणें रमले.

पहिल्या वर्षीच्या परीक्षेंत अण्णा व नरहरपंत या दोघांनाहि सेकं क्लास मिळाला. गणित व पदार्थविज्ञान या दोन विषयांच्या मार्कांच बेरीज करून त्यांत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याला विल्सन कॉलेजा जें बक्षिस ठेवलें होतें तें अण्णांना मिळालें.

त्या काळीं पहिल्या वर्षाच्या परीक्षेला प्रीव्हियसची परीक्षा अ म्हणत. आणि त्या परीक्षेनंतर फर्स्ट बी. ए. व सेकंड बी. ए. अश पुढच्या दोन परीक्षा असत. असा एकूण तीन वर्षांचा अभ्यासक्र पुरा केला कीं, विद्यार्थी बी. ए. होत असे.

विल्सन कॉलेजांत प्रीव्हियसची परीक्षा पास झाल्यानंतर अण्णा नरहरपंत यांनीं आपलें कॉलेज बदललें व एल्फिन्स्टन कॉलेजांत नां घातलें. या एल्फिन्स्टन कॉलेजांत वर्डस्वर्थ या नांवाचे फार चांगल प्रिन्सिपॉल होते. वर्डस्वर्थसाहेबांचे शिकविणें अप्रतिम असे. त्याचा फायदा घेण्यासाठींच अण्णा व नरहरपंत यांनीं कॉलेज बदललें होतें.

एल्फिन्स्टन कॉलेज त्या काळीं राणीच्या बागेसमोर होतें. गिरगांवां- तून कॉलेजांत जाणाऱ्याला चर्नीरोडपासून रेल्वेचा पास काढून मह



लक्ष्मी स्टेशनपर्यन्त जावें लागे. हा खर्च वांचवावा म्हणून कित्येक महिने अण्णा कॉलेजांत पायींच जात असत.

फर्स्ट बी. ए.च्या परीक्षेंत अण्णांना चांगले मार्क मिळाले. एल्फि- न्स्टन कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांत गणित विषयांत त्यांचा पहिला नंबर आला.

सेकंड बी. ए.च्या परीक्षेच्या वेळीं अण्णांनीं सपाटून अभ्यास केला. गणित हाच त्यांचा मुख्य विषय होता. १८८४ सालच्या परीक्षेला ते बसले व दुसऱ्या वर्गांत उत्तम प्रकारें पास झाले.

अण्णा बी. ए. झाले ही सुवार्ता जेव्हां मुरुडास पोंचली असेल तेव्हां त्यांच्या आईला व वडील बंधूंना किती आनंद झाला असेल बरें !

* * *

## प्रकरण अठरावें

* * * * * * * * * * * * * *

## विद्यादानाकडे वळले

बी. ए. ची परीक्षा पास झाल्याचें समजल्याबरोबर अण्णांच्या मनाला एकादा अवघड किल्ला सर केल्याइतका अपूर्व आनंद झाला. आपल्या ह्या आनंदांत सहभागी व्हायला आपले वडील हयात नाहींत म्हणून त्यांना वाईट वाटलें. परंतु माणसाच्या जीवनांतील सुख व समाधान हें केव्हांच निर्भेळ किंवा शंभर टक्के नसतें असा विवेक आपल्या मनाशीं करून अण्णा ' आतां पुढें काय करावें ? ' या प्रश्नाचें उत्तर शोधण्या- कडे वळले.

शिक्षण पूर्ण होणें हा माणसाच्या जीवनांतील एक महत्त्वाचा टप्पा असतो. तो टप्पा पूर्ण होण्याकरितां प्रत्येक मनुष्य जे कष्ट घेतो त्यामुळें

पुढील जीवन सुखाचें व्हावें व आपल्याला वैभवाचे दिवस यावेत अ
त्याला वाटत असतें. अण्णांचें वय एव्हांना सत्तावीस वर्षांचें झालें हो
आतांपर्यंतच्या काळांत शिक्षणाकरितां त्यांनीं फार कष्ट सोसले होते
सुदैवानें बी. ए. पर्यंतचें शिक्षण पूर्ण झाल्यामुळें त्यांच्यापुढील प्र
आतां सोपे होऊं लागले होते.

अण्णांपुढें मुख्यतः दोन प्रश्न होते. आयुष्यभर कायमचा उद्यो
म्हणून कोणत्या प्रकारच्या व्यवसायांत पडायचें हा पहिला व थोडास
पैसा मिळवून घरची परिस्थिति सुधारावी हा दुसरा. असे ते दोन प्र
होते.

त्या काळांत (म्हणजे अण्णा १८८४ सालीं बी. ए. झाले त्य
काळांत) बी. ए. पर्यंत शिकलेल्या माणसाला एकाद्या सरकारी कचेरीं
किंवा परदेशी कंपनीच्या ऑफिसांत चांगल्या पगाराची नोकरी मिळ
सहज शक्य होतें. परंतु अशी नोकरी आपल्या स्वभावाशीं जुळणा
नाहीं अशी भीति अण्णांना वाटत होती. अण्णांना शिकवण्य
करण्याचा अनुभव बराच होता. आतांपर्यंत सतत सहा वर्षे त्यांनी
शिकवण्या केल्या होत्या. त्यामुळें शिक्षकाचा पेशा आपल्या स्वभावाशी
व प्रवृत्तींशीं उत्तम प्रकारें जुळेल असें अण्णांना वाटूं लागलें होतें
त्यामुळेंच आपण शिक्षक व्हावें असें अण्णांच्या मनानें घेतलें व त्यांनी
शिक्षकाची नोकरी शोधण्याला सुरवात केली.

अण्णांचा विषय गणित हा होता व गणित शिकवण्यासंबंधीं त्यांचा
लौकिकहि, ते करीत असलेल्या शिकवण्यांमुळें, मुंबईमध्यें पसरला
होता. सुदैवानें, एल्फिन्स्टन कॉलेजांतील त्यांचे प्राध्यापक मि. हाथार्न-
थ्वेट यांची अण्णांवर मर्जी होती. त्यामुळें त्यांच्या मध्यस्थीनें मुंबईच्या
एल्फिन्स्टन हायस्कुलांतील शिक्षकाची तात्पुरती नोकरी बी. ए. चा
निकाल लागल्यानंतर कांहीं महिन्यांतच अण्णांना मिळाली.



एक वर्षभर अण्णांनीं ही नोकरी केली. ज्यांच्या बदली अण्णांची नेमणूक झाली होती ते गृहस्थ परत आल्यानें अण्णांची नोकरी सुटली. परंतु अण्णांच्या कामासंबंधीं शाळेचे प्रिन्सिपल मोडक यांचें फार चांगलें मत झालें होतें. त्यामुळें अण्णांना एल्फिन्स्टन हायस्कुलांतील शिक्षकाची कायमची जागा मिळवून द्यावी म्हणून सरकारी शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांकडे प्रयत्न करण्याचें त्यांनीं ठरविलें.

अण्णांना जेव्हां हें समजलें तेव्हां अण्णा अस्वस्थ झाले. आपण सरकारी नोकरी कायमची करूं नये असें त्यांना जें अलीकडे वाटूं लागलें होतें तें त्यांनीं प्रिन्सिपल मोडक यांच्या कानांवर घातलें. वास्तविक, सरकारी नोकरींत पगार बऱ्यापैकीं मिळाला असता व तो हळूहळू वाढत गेला असता. अण्णांना पैशाची गरजच होती. मुरुडाला त्यांना दरमहा पैसे पाठवावे लागत. तेथें त्यांची आई व बंधू होते. शिवाय अण्णांनीं नुकतेंच मुंबईंत आपलें बिऱ्हाडहि थाटलें होतें. त्याचा खर्च होताच.

वरील सर्व कारणांसाठीं चांगल्या पगाराची व कायमची नोकरी अण्णांनीं लवकर धरणें फार आवश्यक होतें. शिक्षकाशिवाय अन्य पेशांतील नोकरी, अधिक पगार मिळत असला तरी, मला नको असें ज अण्णा म्हणत होते त्याचा अर्थ त्यांच्या नातेवाईकांना व मित्रमंडळींना समजूं शकला. कारण ज्यानें त्यानें आपल्या प्रवृत्तीप्रमाणें व आवडीप्रमाणेंच आपला पेशा निवडणें हें नेहमीं हितकर ठरतें. परंतु शिक्षकाची नोकरी करण्याबाबत ती सरकारी शाळेंतलि नको असें जें अण्णा म्हणूं लागले होते तें ऐकून त्यांचे आप्तेष्ट बुचकळ्यांत पडूं लागले होते.

शिक्षणाचा किल्ला सर केल्यानंतर हातीं गवसणारें सुखासीनतेचें व निष्काळजीपणाचें जीवन अण्णांना नको होतें काय ? आतांपर्यंतच्या

त्यांच्या आयुष्यांतील कष्ट त्यांना दमवूं शकले नव्हते काय? एक कायम नोकरी धरावी असें अण्णांना वाटत नव्हते का? अशा ना विध शंका इतरांच्या मनांत येत होत्या.

अण्णांच्या मनांत चालणारे विचारहि अद्यापि पूर्णपणें स्पष्ट झा नव्हते. एखादी कायम व तीहि सरकारी नोकरी स्वीकारण्यानें आपल जीवनांतील प्रगति खुंटेल असें त्यांना वाटत होतें हें मात्र खरें. विद्यार्थिद संपली कीं संसारसुखांत पूर्णतः रममाण झाल्यामुळें माणसांची भ प्रगति खुंटते असें जें शंभरांतील नव्याण्णव व्यक्तींच्या बाबतींत ह तें आपल्या जीवनांत होऊं नये असें अण्णांना मनापासून वाटत हो परंतु या अडचणींतून आपण मार्ग कसा काढावा याचें उत्तर त्या सुचत नव्हतें; त्यांच्या डोळ्यापुढें प्रकाश दिसत नव्हता.

त्यामुळें १८८४ सालापासून पुढील सात वर्षें अण्णांनीं मुंबईम अस्थिरतेंत काढलीं. पांच सहा निरनिराळ्या शाळांमध्यें त्यांनीं शि वून पाहिलें. कांहीं शिकवण्याहि धरल्या. पहांटेपासून रात्रीं दहा वा पर्यंतचा सर्व वेळ विद्यादानाच्या कार्यांत घालविला. पुण्याच्या इंग्लिश स्कूलच्या धर्तीवर कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं 'मराठा हायस्कूल' चालविलें होतें त्यांतहि कमी पगार घेऊन स्वा त्यागपूर्वक काम केलें. या शाळेंत अण्णांनीं आजीव सेवक व्हावें अ भागवतांचा प्रयत्न होता व अण्णांनाहि कांहीं प्रमाणांत तसें वाटूं लाग होतें. परंतु आपल्या आवडीची शाळा किंवा शिक्षणसंस्था व आपल आवडीचें ध्येय आपल्याला सांपडलें असें समाधान अण्णांना लाभले नव्हतें. असो. अशा प्रकारें बी. ए. झाल्यानंतर सात वर्षें होत आल तरी अण्णांच्या जीवनाची घडी मुंबईमध्यें बसूं शकली नव्हती.

* * *

## प्रकरण एकोणिसावें

* * * * * * * * * * * * * *

## समाज-ऋण कसें फेडूं ?

अण्णांच्या जीवनांतील ज्या मानसिक अस्वस्थतेसंबंधीं मी गेल्या प्रकरणांत थोडेसें सांगितलें त्याचा अधिक खुलासा या प्रकरणांत कर- ण्याचें योजिलें आहे.

अडचणींतून वर येणाऱ्या माणसांना आपल्या जीवनांतील अडचणी संपल्या कीं आपल्याप्रमाणेंच अडचणींत असलेल्या व आपल्या पाठी- मागून येणाऱ्या इतर दुर्दैवी माणसांचा सर्वसामान्यतः विसर पडतो. पण तसा अण्णांना पडलेला नव्हता. उलटपक्षीं त्यांचें मन इतरांच्या अडचणींकडे व दुःखांकडे अधिकच सहानुभूतीनें पाहूं लागलें होतें. त्रयस्थपणानें स्वतःच्या जीवनाची तपासणी केल्यानंतर, अण्णांना आतां असें वाटूं लागलें होतें कीं, या जगांतील इतर लाखों जीवांपेक्षां आपलें जीवन पुष्कळ सुखी व यशस्वी झालें आहे. राहाण्याच्या, जेवणा- खाण्याच्या व इतर सर्व आवश्यक वस्तूंच्या गरजा आपण आतां स्वाभिमानानें भागवूं लागलों आहोंत. आपण आपल्या पायांवर संपूर्णपणें उभे आहोंत. अशा वेळीं आपल्या समाजांतील ज्या अभागी माणसांच्या जीवनांत आपल्यापेक्षां कितीतरी पटींनीं कमी सुख आहे त्यांच्यासाठीं आपण कांहीं करूं नये का? स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबांतील व्यक्तींचें सुख पाहाणें एवढाच आपल्या भावी आयुष्यांतील पुरुषार्थ आहे असें आपण समजावें काय?

बी. ए. झाल्यानंतरच्या काळांत अण्णांच्या मनांत वर सांगितल्या- सारखे विचार वारंवार येऊं लागले. योगायोग असा कीं, या काळां- तील महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत कांहीं तेजस्वी तारे आपल्या

बुद्धिवैभवानें व स्वार्थत्यागानें तळपत होते. अशांपैकीं प्रमुख म्हण न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक व प्रिन्सिपल आगरकर. यांच्यासार अनेक नररत्नांच्या तेजस्वी उदाहरणांमुळें स्वार्थत्यागपूर्वक देशकार्य हा घेण्याविषयीं अण्णांचें मन उत्सुक बनूं लागलें होतें. प्रत्येक सुशिक्षि माणसानें आपल्या समाजाचें ऋण फेडलेंच पाहिजे असा जो कळ कळीचा विचार रानडे, टिळक, आगरकर इत्यादि देशभक्त तरुणांपु मांडीत होते त्यामुळें अण्णांच्याहि विचारांत परिवर्तन घडूं लागलें.

आपल्या बुद्धीला झेपेल व स्वभावाला आवडेल असें देशकार्या क्षेत्र सुदैवानें अण्णांना सांपडलें होतें. तें कार्यक्षेत्र म्हणजे शिक्षणाचें खाजगी शिक्षणसंस्था चालवून देशप्रेमाचें बीज विद्यार्थ्यांच्या हृदयां रोवावें असा जो कार्यक्रम ' न्यू इंग्लिश स्कूल'च्या उदाहरणानें महा राष्ट्रांत अत्यंत निकडीचा ठरला होता त्यांत सामील होणें अण्णांन जमलें असतें व आवडलेंहि असतें. त्यामुळेंच अण्णांनीं शिक्षका सरकारी नोकरी धरावयाची नाहीं असें स्पष्टपणें ठरवून योग्य संधीच वाट पाहाणें चालविलें होतें.

अडचण होती ती आईला व वडील बंधूंना आपला विचार पटवून देण्याची. अण्णांनीं शक्य तितके जास्त पैसे मिळवावे व कर्वे कुटुंबाल सांपत्तिक दृष्ट्या खूप वर आणावें असें त्या दोघांना वाटत असलें तर त्यांत अस्वाभाविक काय होतें ? परंतु आगरकरांनीं आपल्या आईला 'मी केवळ तुझेंच पांग फेडीन असें समजूं नकोस. मोठ्या आईची म्हणजे राष्ट्राची हांक मला ऐकूं येत आहे ' या अर्थाचें पत्र लिहिलें तसेंच स्पष्टपणें कळविण्याचा प्रसंग अण्णांवरहि आला. अण्णा एकदां मुरुडांस गेले असतांना आई व दादा यांच्यापुढें त्यांनीं समाजऋण फेडण्याचे आपले विचार मांडले. ते म्हणाले, 'कुटुंबाला सालोसाल सारखी मदत करीत राहाणें माझ्या हातून होणार नाहीं. साधल्यास कांहीं द्रव्य



मिळवून त्याचा अगर कांहीं समाजकार्य हातीं घेऊन आपल्या आयुष्याचा समाजासाठीं सदुपयोग करावा असें माझ्या मनांत आहे. तरी कांहीं वर्षें मदत केली म्हणजे पुढें मदत करण्याची वेळ येऊं नये अशी कांहींतरी योजना करा. ' सुदैवानें, आईनें व दादांनीं अण्णांना विरोध केला नाहीं. हायस्कूल शिक्षणाकरितां आपल्या मामां-कडून काढलेलें दोनशें रुपयांचें कर्ज कॉलेज-शिक्षण चालू असतांना केलेल्या शिकवण्यांमधूनच अण्णांनीं फेडलें होतें. आतां आई व दादा यांच्या तरतुदीचाच प्रश्न उरला होता. त्यानिमित्त अण्णांनीं एकूण अठराशें रुपये द्यावे अशी योजना ठरविण्यांत आली. ही रक्कम देण्यास अण्णांना कांहीं वर्षें लागतील हें उघड होतें. परंतु त्यानंतर आपलें कुटुंबऋण संपलें असें होणार हें नक्की झाल्यानें अण्णांना बरें वाटलें. सामाजिक ऋण फेडण्याची तळमळ बाळगणाऱ्या तरुणानें आपल्या कुटुंबऋणाची फेड करण्याबाबत चुकारपणा करूं नये असें अण्णांचें मत होतें. परंतु कुटुंबऋण फेडण्याची जबाबदारी तारतम्य बुद्धि वापरून मर्यादित राखणें हेंहि आवश्यक असते. त्यासंबंधीं अण्णांनीं योग्य ती मर्यादा आपल्यापुढें घालून घेतली व उरलेली सर्व शक्ति सामाजिक ऋण फेडण्यासाठीं वेंचावयाची असा निश्चय केला. आधीं स्वतःचें व कुटुंबाचें पाहूं आणि नंतर कांहीं वर्षांनीं समाजाकडे पाहूं असाहि विचार अण्णांनीं केला नाहीं. स्वतःच्या व कुटुंबाच्या सुखांना मर्यादा घालून तरुणपणापासून समाजसेवेकडे लक्ष द्यावयाचें असें अण्णांनीं ठरविलें.

* * *

**प्रकरण विसावें**

* * * * * * * * * * * * *

## समाजसेवेचे कांहीं प्रयोग

समाज–ऋण फेडण्यासंबंधीं अण्णांच्या मनांत कशी तळमळ निर्माण झाली होती हें आपण गेल्या प्रकरणांत पाहिलें. अण्णांच्या मनांतील ह्या तळमळीचा उगम सोमण गुरुजींनीं त्यांच्या मनावर केलेल्या संस्कारांत होता हें आपण विसरतां कामा नये.

सोमण गुरुजींचे व अण्णांचे संबंध कसे होते याची हकीकत सातव्या प्रकरणांत पूर्वीं आलीच आहे. रामदास–कल्याण ह्या नांवानेंच ही गुरुशिष्यांची जोडी मुरुडांत सुप्रसिद्ध होती ! होतकरू व हुषार विद्यार्थ्यांना हाताशीं धरून त्यांच्यांतून कर्तृत्ववान् व महत्त्वाकांक्षी नागरिक तयार करण्याची जी संधि प्रत्येक शिक्षकाला लाभत असते त्याचा जास्तींत जास्त उपयोग करण्याची सद्‌बुद्धि सोमण गुरुजींच्या हृदयांत होती. शिवाय शिक्षकाचा पेशा हा समाजसेवकाचाच असतो अशी त्यांच्या मनाची धारणा होती. त्यामुळें मुरूड गांवांतील नोकरी चालू असतांना त्यांनीं गांवामध्यें कांहीं सार्वजनिक कार्य सुरू केलें व त्यांत आपल्या कांहीं आवडत्या विद्यार्थ्यांना गुंतविलें.

सोमण गुरुजींनीं सुरू केलेल्या लोकसेवेच्या कार्यांत अण्णा त्यांचे उजवे हात होते. गुरुजींवर अण्णांची श्रद्धा फार. ते सांगतील तें करायला अण्णा तयार असत. जें पहिलें काम गुरुजींनीं अण्णांना सांगितलें तें म्हणजे श्रीदुर्गादेवीच्या देवालयांत संध्याकाळच्या वेळीं वर्तमानपत्रें घेऊन मोठ्यानें वाचीत बसणें. त्या काळांत वर्तमानपत्र ही एक अपूर्व चीज होती. गांवांतील फार तर एकदोन व्यक्तीच मुंबई-पुण्याचीं वर्तमानपत्रें मागवीत.



त्यामुळें वर्तमानपत्रांत काय आलें आहे हें गांवकऱ्यांच्या कानावर घालणें ही एक समाजसेवाच होती. सायंकाळीं पांच वाजेपासून दिवेलागणीची वेळ होईपर्यंत अण्णा वर्तमानपत्रें घेऊन देवळांत बसत. दर्शनासाठीं येणारे जाणारे थोडा वेळ बसून त्यांचें वाचन ऐकत. हा क्रम कांहीं महिनेच चालला; परंतु सार्वजनिक कामांतील अण्णांचा हा पहिला धडा होता.

दुसरा धडा जो सोमणगुरुजींनीं अण्णांकडून गिरवून घेतला तो म्हणजे सहकारी पद्धतीवर सुरू झालेल्या एका दुकानांतील काम करून घेण्याचा होय. या कामांत अण्णांना कांहीं चांगले व कांहीं वाईट अनुभव आले. परंतु याचा लाभ असा झाला कीं, लोकसेवेच्या बुद्धीनें लोकांच्या उपयोगी पडावें हा जो सोमण गुरुजींच्या मनाचा धर्म होता तो त्यांच्या निकट सहवासांत कांहीं वर्षें राहायला मिळाल्यामुळें अण्णांनींहि आत्मसात् केला होता. त्यामुळें मुंबईस आल्यावर अण्णांना जेव्हां स्कॉलरशिपचे व शिकवण्यांचे पैसे मिळूं लागले तेव्हां परोपकार किंवा धर्मादाय करण्यासाठीं त्यांतील थोडीशी रक्कम बाजूला काढून ठेवावयाची अशी प्रेरणा अण्णांना झाली. दर रुपयाला एक पैसा हें प्रमाण अण्णांनीं ठरविलें होतें. अशा रीतीनें एका वर्षभरानंतर अण्णांजवळ तीन रुपये जमले. या पैशाचा कसा सदुपयोग करावा याबद्दल अण्णांनीं कांहींच ठरविलें नव्हतें. परंतु एक दिवस ते नागोपंत दातार या गृहस्थांच्या समाचारास गेले होते. हे गृहस्थ मुरूडचे होते व आतां क्षयानें आजारी होते. नागोपंतांची आर्थिक परिस्थिति फार हलाखीची होती. ती पाहून अण्णांनीं आपल्याजवळील तीन रुपये त्यांच्यापुढें ठेवले. अण्णांसारख्या विद्यार्थ्याची ही मदत पाहून नागोपंतांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. परोपकार करण्याची अण्णांची ही पहिली वेळ होती व

परोपकार करणाऱ्या माणसाला किती उच्च आनंद व समाधान लाभत असतें याचा थोडासा अनुभव अण्णांना त्या दिवशीं आला.

सोमण गुरुजींप्रमाणेंच आपणहि मुरूड गांवाची थोडीफार सेव करावी असें अण्णांच्या मनांत येई. ग्राम-ऋण फेडण्याची त्यांना इच्छ होती. म्हणून त्यांनीं मुंबईंतील कांहीं मुरूडकर मित्रांबरोबर कांहीं योजन आंखून त्याकरितां स्वतःहि सांपत्तिक धस सोसली.

त्याचप्रमाणें सोमण गुरुजींप्रमाणें 'कांहीं होतकरू विद्यार्थ्यांना आपल्य घरीं ठेवून त्यांची विद्या आपण पूर्ण करावी' असा विचार त्यांच्य मनांत आला. त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं नातेवाईकांच्या व स्नेह्यांच्य मुलांना आपल्या घरीं आणलें. यांतच पुणें विद्यापीठाचे सध्याचे उप कुलगुरु रँग्लर परांजपे हे होते. स्वतःची अडचण सोसूनहि या विद्या र्थ्यांना मार्गदर्शन करणें हा सामाजिक ऋण फेडण्याचाच एक प्रकार आहे असें अण्णांना वाटत असे. एकाद्या चांगल्या खाजगी शाळेंत शिक्षक व्हावें व विद्यार्थ्यांसाठीं एखादें बोर्डिंग काढून तें चालवावें आणि अशा प्रकारें विद्यादानाच्या रूपानें आपल्या समाजाचें ऋण फेडावें असा विचार १८९१ च्या सुमारास अण्णांच्या मनांत नक्की होत चालला होता. यापुढील आपलें सर्व आयुष्य मुंबईंतच जाणार याबद्दलहि त्यांना खात्री वाटूं लागली होती.

* * *



## प्रकरण एकविसावें

* * * * * * * * * * * * * * *

## एक सांसारिक आपत्ति

सुदैवानें अण्णांच्या विचारांना साथ देणारी अशीच पत्नी त्यांना लाभली होती. अण्णांच्या पत्नीचें नांव राधाबाई असें होतें. अण्णा पंधरा वर्षांचे असतांना व राधाबाई आठ वर्षांची असतांना त्या उभयतांचें लग्न झाले होतें असा उल्लेख अकराव्या प्रकरणांत आलाच आहे. अण्णा बी. ए. च्या शेवटच्या वर्षांत असतांना अण्णांनीं राधाबाईंना मुंबईला आणून नरहरपंतांच्या खोलींतच बिऱ्हाड थाटलें होतें. एल्फिन्स्टन हायस्कुलांतील नोकरी सुरू झाल्यानंतर अण्णांनीं नरहरपंतांच्या शेजारचीच खोली भाड्यानें घेतली व आपल्या आणि नरहरपंतांच्या कुटुंबांचें एक संयुक्त कुटुंब सुरू केलें. अण्णांचें मुंबईंतील जीवन फार कष्टाचें होतें. दोनतीन शाळांतून शिकविणें व शहरांतील वेगवेगळ्या भागांतील मुलांच्या घरीं जाऊन कांहीं शिकवण्या करणें असा त्यांचा दिवसभराचा भरगच्च कार्यक्रम असे. असे असूनहि राधाबाईंच्या शिक्षणाकडे थोडेफार लक्ष देण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. अण्णांच्या मदतीनें राधाबाई चांगलें लिहायला व वाचायला शिकल्या होत्या. इंग्रजी तिसरीच्या पुस्तकापर्यंत त्यांनीं मजल मारली होती.

आपल्या घरांत विद्यार्थी ठेवण्याच्या कल्पनेमुळें त्यांचें घर नेहमीं गजबजलेलें असे. त्यामुळें निवांतपणा अगदीं मिळत नसे. परंतु राधाबाई सर्व जबाबदारी हौसेनें उचलीत.

ज्यावेळीं अण्णा विल्सन कॉलेजांत दाखल झाले त्या सुमारास राधाबाईंना पहिला मुलगा झाला होता. त्याचें नांव रघुनाथ असें होतें.

रघुनाथाची प्रगति चांगली चालली होती. त्यामुळें राधाबाई समाधानांत असे.

अशा वेळीं दुर्दैवानें डोळे वटारले. अण्णांचें संसारिक सुख त्याला पाहवलें नाहीं. विद्येसाठीं एवढे अपार कष्ट घेतलेल्या माणसाला दैवानें आतां तरी सुखांत राहूं द्यायला हवें होतें, पण नाहीं! दैवाची योजना वेगळी होती. त्याला अण्णांची कठोर परीक्षा पाहावयाची होती.

राधाबाईंना मुंबईची हवा मानवली नाहीं. त्यांची प्रकृति क्षीण होऊं लागली. हवापालट व्हावा म्हणून अण्णांनीं त्यांना मुरुडाला पाठविलें व त्यांना उत्साह वाटावा म्हणून उत्तेजनपर पत्रें लिहिण्यास सुरुवात केली. अखेरीस ह्या दुखण्यांतून राधाबाई उठत नाहींत असें जेव्हां अण्णांना समजलें तेव्हां त्यांनीं परमार्थपर पत्रें लिहून राधाबाईंचें मन मरणाला तयार केलें. याप्रमाणेंच तो आघात सहन करण्याची स्वतःच्या मनाची तयारी करण्यासहि त्यांनीं सुरवात केली.

राधाबाईंच्या मरणाचा प्रसंग बाबांच्या मृत्यूप्रमाणेंच पावसाळ्यांत आल्यामुळें व पावसाळ्यांत कोंकणचा प्रवास गैरसोयीचा असल्यामुळें त्यांच्या भेटीस अण्णांना जातां आलें नाहीं. त्यांच्या मरणाची वार्ता एके दिवशीं अण्णा नित्याप्रमाणें संध्याकाळीं बाहेरून आले तेव्हां दादांच्या पत्रावरून त्यांना समजली. ही गोष्ट १८९१ सालच्या पावसाळ्यांतील आहे. तरुणपणीं पत्नी मरणें यासारखें कमनशिब कोणतें! परंतु या वेळीं अण्णांनीं मन घट्ट केलें व आल्या प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें. या वेळच्या आपल्या वर्तनासंबंधीं अण्णा आपल्या 'आत्मवृत्तां'त पुढीलप्रमाणें सांगतातः—

"ज्या सायंकाळीं राधाबाईंच्या मृत्यूची वार्ता मला समजली त्या रात्रीचा कांहीं भाग विचारांत गेला, पण मी पहांटेला रोजच्याप्रमाणें कार्यक्रम सुरू केला व संध्याकाळीं घरीं आलों. जणूं कांहीं विशेष घडलेलेंच नव्हतें. असल्या प्रसंगीं मनुष्यें निरुद्योगी होऊन बसतात व समाचाराला येणाऱ्या आप्तांशीं त्याच त्या गोष्टीची चर्चा करीत राहातात. यामुळें त्यांना निष्कारण कितीतरी त्रास होतो. नित्यकृत्यांत व्यग्र होऊन जाणें यासारखा असल्या गोष्टींचा विसर पाडायला दुसरा उपाय नाहीं."



अण्णांचे हे विचार सर्वांनीं लक्षपूर्वक ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. कारण मरणाचें दुःख हें सर्वांच्याच वांट्याला येत असतें. परंतु त्या वेळीं खचून न जातां प्राप्त परिस्थितीला धैर्यानें तोंड देणें यांतच माणसाची कसोटी आहे.

* * *

## प्रकरण बाविसावें

* * * * * * * * * * * * * * *

### पत्र कीं स्वप्न ?

१८९१ सालच्या पावसाळ्यांत ज्या पोस्टमननें राधाबाईंच्या मरणाची बातमी असणारें दुःखद पत्र अण्णांना आणून दिलें त्याच पोस्टमननें अवघ्या दीड महिन्यानें एका सकाळीं आणखी एक महत्त्वाचें पत्र अण्णांच्या हातांत दिलें.

या पत्रांतील मजकूर वाचून अण्णांना असें वाटलें कीं, आपण जें वाचीत आहोंत तें खरोखरचें पत्र आहे का स्वप्नांतलें पत्र आहे!

पोस्टमन ही या जगांतली एक अजब व्यक्ति आहे. पत्रांचा बटवडा करतांना कोणाला तो हसवत असतो, कोणाला रडवत असतो. कोणाच्या आयुष्यांत अनपेक्षितपणें दुःखाचा प्रसंग निर्माण करतो, तर कोणापुढें अकल्पितपणें भाग्याचें ताट वाढून आणतो.

आज पोस्टमननें अण्णांवर मेहेरबानी केली होती; अकल्पित भाग्याचें ताट त्यांच्यापुढें वाढून आणलें होतें.

आज जें पत्र अण्णा वाचीत होते तें पुण्याच्या एका मित्राचें होतें. या मित्राचें नांव गोपाळ कृष्ण गोखले. हे गोखले म्हणजे भारताच्या राजकारणांत पुढें प्रसिद्धि पावलेले नामदार गोखले होत. गोखले व अण्णा एल्फिन्स्टन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत बरोबर होते. शिक्षण पूर्ण केल्यावर अण्णा मुंबईत राहिले, परंतु गोखले पुण्यास येऊन टिळक-आगरकरांच्या फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक झाले होते.

आजच्या पत्रांत गोखले यांनीं 'आमच्या फर्ग्युसन कॉलेजांतील गणिताच्या प्राध्यापकाची एक जागा रिकामी झाली आहे. तरी त्या ठिकाणीं तुम्हीं येतां का ?' असें विचारलें होतें. हा मजकूर वाचूनच अण्णांना आपण वाचतों हें पत्र कीं स्वप्न असें वाटूं लागलें. फर्ग्युसन कॉलेज-सारख्या सुप्रसिद्ध संस्थेंत काम करावयास मिळणें ही एक अपूर्व संधि होती. सेवा, स्वार्थत्याग व देशभक्ति या तीन तत्त्वांची ती एक आदर्श मूर्ति होती. सुप्रसिद्ध सुधारकाग्रणी आगरकर हे त्या कॉलेजांतच काम करीत होते. अशीं नानाविध आकर्षणें डोळ्यांपुढें दिसूं लागल्यानें अण्णांना गोखल्यांचें पत्र वाचून अतिशय आनंद झाला.

राधाबाईंच्या मरणानें अण्णांच्या मुंबईंतील जीवनाची घडी विस्कळित झाली होती. त्यामुळेंहि पुण्याला जाण्यासंबंधीं अण्णांचें मन साहजिकच थोडें उत्सुक बनलें. नव्या गांवीं गेल्यावर आपल्या जीवनाची कांहीं नवीन घडी बसूं शकेल अशी आशाहि अण्णांच्या मनांत निर्माण झाली. या सर्व कारणांमुळें अण्णांनीं गोखल्यांना आपला होकार कळविला.

* * *



## प्रकरण तेविसावें

* * * * * * * * * * * * * * *

# विवाह कोणाशीं ?—विधवेशींच

१५ नोव्हेंबर १८९१ रोजीं पुण्यांतील नव्या कामावर अण्णा रुजूं झाले. प्रारंभीं असें ठरलें होतें कीं, दोन वर्षें त्यांचें काम पाहून नंतर त्यांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आजीव सेवक ( लाईफ मेंबर ) करून घेण्यांत यावें. परंतु अण्णांच्या कामाचा जम लवकर बसला व अवघ्या साडेचार महिन्यांनीं म्हणजे १८९२ सालच्या एप्रिलांत त्यांना आजीव सेवक करून घेण्यांत आलें.

अण्णांच्या नोकरीचा जम चांगला बसलेला पाहून त्यांनीं आतां दुसरें लग्न लवकर करावें असा आग्रह अण्णांचे नातेवाईक त्यांना करूं लागले. घरच्या कामांकडे लक्ष देणें व शिवाय कॉलेजांत शिकवणें अशी दुहेरी दगदग अण्णांनाहि नकोशी वाटूं लागली होती. मुंबई-प्रमाणेंच पुण्यासहि त्यांच्या घरांत चारसहा विद्यार्थी शिक्षणाकरितां असत. त्यामुळें पुन्हां लग्न करावें असा विचार अण्णांच्या मनांतहि येऊं लागला यांत आश्चर्य नाहीं.

परंतु अण्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या विचारांत एका बाबतींत मतभेद होता. अण्णांचे नातेवाईक म्हणत होते कीं, "तूं एका कुमारिकेशीं लग्न कर." आणि अण्णांनीं मनाशीं निश्चय केला कीं, कांहीं झालें तरी पोरवयाच्या कुमारिकेशीं विवाह करावयाचा नाहीं.

मग अण्णा कोणाशीं विवाह करणार होते ?

अण्णा म्हणत होते कीं, मी विधवेशीं विवाह करीन.

अण्णांना असें वाटे कीं, माझें जर दुसऱ्यांदा लग्न व्हायचें आहे तर ज्या स्त्रीचें दुसऱ्यांदांच लग्न व्हायचें आहे तिच्याशींच मी विवाह करणें न्यायाचें ठरेल.

ज्या काळांत अण्णा हा विचार करीत होते त्या काळांत मुलामुलीं लग्नें फार लवकर होत असत. विशेषतः मुलींच्याबद्दल समाजांत अ कडक चाल होती कीं, तिच्या वयाला सुमारें आठदहा वर्षें, फार तर बा वर्षें पूर्ण व्हायच्या आंतच तिचें लग्न व्हावें. शिवाय सध्यां ज आपल्या आसपास वीस, पंचवीस, तीस किंवा त्यापेक्षांहि अधिक व ओलांडलेल्या अविवाहित स्त्रिया दिसतात तशी त्या काळीं एकादी स्त्री नसे. अशा परिस्थितीमुळें ज्या पुरुषाची पहिली स्त्री मृत्यु पावे त्य पुरुषाला जेव्हां वधू निवडण्याची वेळ येई तेव्हां आठ-दहा किंवा बा वर्षांची एखादी अल्पवयी मुलगीच त्याला निवडावी लागे.

या अशा पद्धतीमुळें कुमारिकांवर किती भयंकर अन्याय होत होत याची वाचकांनीं स्वतःशीं कल्पना करून पाहावी. कै. देवल यांनी लिहिलेल्या 'शारदा' नाटकांत जरठ-कुमारी विवाहावर (म्हणजे म्हाताऱ्या माणसानें अल्पवयी मुलीशीं केलेल्या विवाहावर) खूप टीक करण्यांत आली आहे. हें नाटक मराठी रंगभूमीवरील एक अप्रति नाटक आहे. ज्या वाचकांनीं अद्याप हें नाटक पाहिलें नसेल त्यांनी तें संधि सांपडतांच अवश्य पाहावें.

आपला आजोबा किंवा पिता शोभेल इतका वयानें मोठा अस णारा पुरुष आपला पति म्हणून निवडण्याची सक्ति जी दुष्ट व वेडग सामाजिक रूढी लहान मुलींवर करीत असे त्या रूढीविरुद्ध वाग ण्याचें धैर्य सुशिक्षित माणसांनाहि त्या काळीं होत नव्हतें. अरेरे किती हीन अवस्थेला आपला समाज त्याकाळीं पोंचलेला होता जगांतील सर्व सुधारलेल्या देशांतील पुरुष, पहिली पत्नी निवर्तल्या नंतर आठदहा वर्षांच्या मुलीशीं विवाह करीत नव्हते. परं विवाहासंबंधींच्या सुधारणांबाबत त्याकाळचा हिंदु समाज भ्याडपणा वागत होता.



(स्त्रीच्या जातीला जन्माला येणें ही त्या काळच्या हिंदु समाजांतील क अत्यंत दुर्दैवी गोष्ट होती. वर सांगितल्याप्रमाणें आठव्या-दहाव्या वर्षी हणजे ज्या वेळीं बाहुली घेऊन लुटुपुटीच्या संसाराचा खेळ खेळण्याचें य असतें त्या वेळीं, खरोखरच्या संसारांत स्त्रियांना अडकावें लागे आणि त्यापेक्षांहि वाईट म्हणजे आपल्यापेक्षां वयानें पांचपंचवीस किंवा अधिक वर्षांनीं मोठ्या असलेल्या बिजवराशीं (बिजवर म्हणजे ज्याची पहिली पत्नी वारली आहे असा पुरुष) लग्न करावें लागे.)

(या पहिल्या अन्यायावर कडी करणारा आणखी एक भयंकर अन्याय हिंदु स्त्रियांच्या वांटयाला त्या काळीं येत असे. तो अन्याय असा कीं, जिचा पति एकदां मरेल तिला पुन्हां लग्न करतां येत नसे.) प्रत्येक विधवेनें आपला पुढील सर्व जन्म वैधव्यावस्थेंतच काढला पाहिजे अशी त्या काळच्या हिंदु समाजांतील रूढी किंवा पद्धत असे. समजा, एकाद्या मुलीचें लग्न तिच्या आठव्या वर्षीं झालें असेल व पुढील एक दोन वर्षांत तिचा पति वारला असेल तर त्या मुलीला या जन्मीं पुन्हां लग्न करण्याची परवानगी मिळत नसे! संपूर्णपणें उमलण्यापूर्वीच कलिकांना पायदळीं तुडविणारी ही रूढी किती दुष्ट व अन्यायाची होती, नाहीं का?

अशा या रूढीमुळें लहानपणींच विधवा झालेल्या कितीतरी मुली आपला पुढील सर्व जन्म वैधव्यावस्थेंत काढावा लागणार या विचारानें निराश होऊन जात. वय लहान असतांनाच ज्यांचा पति निधन पावे त्यांना 'बालविधवा' असें नांव देण्यांत येई. अण्णांच्या काळांत अशा बालविधवा पुष्कळ असत. कारण त्या काळांत प्लेग किंवा इतर सांथी यांवर चांगलीं प्रतिबंधक औषधें सांपडलेलीं नव्हतीं. यामुळें पुष्कळ तरुण मुलें विद्यार्थिदशेंतच आपल्या प्राणाला मुकत. अशा वेळीं त्यांच्या आठदहा वर्षांच्या पत्नीनें काय करायचें? 'वाईट पायगुणाची' असें

समजून सासरीं तिला कमी लेखत. माहेरीं जावें तर तेथेंहि सुस्थि नसली तर आपल्या पोषणाचा भार विनाकारण इतरांवर पडत आ या विचारानें तिला जन्मभर अवघडल्यासारखें होई. सर्व बाजूंनी बालविधवांचें जिणें अत्यंत कष्टप्रद असे. क्वचित् एकादा अपवाद क दिसून येई. आपलें चारित्र्य शुद्ध राखण्याबाबत सुद्धां विधवेवर कमाली संकटें येत, कारण बालविधवा म्हणजे त्या काळच्या समाजांतील बेवारशी वस्तु समजली जाई.

बालविधवांच्या या हालांमध्यें भर घालणारी आणखी एक महाभयं गोष्ट होती. ती म्हणजे नवरा मेल्यानंतर त्यांचें केशवपन करण्याची चा आजच्या पिढींतील वाचकांना 'सोंवळी बाई' क्वचितच पाहावयास मि असेल आणि सामान्यतः ती बाई प्रौढवयाची किंवा म्हातारीच असे गेल्या साठसत्तर वर्षांत केशवपनाच्या चालीविरुद्ध समाजसुधारकां जो प्रखर हल्ला चढविला त्यामुळें ती बंद होण्यास बरेंच यश आले दिसते. नवरा मेला म्हणून केशपवन करणारी स्त्री पुढील पिढींत औषधाला सुद्धां सांपडणार नाहीं ! परंतु केशवपनाच्या चाल अण्णांच्या काळांत धुमाकूळ मांडलेला होता. पतिनिधनानंतर थोड्या दिवसांत प्रत्येक विधवा स्त्रीला न्हाव्याच्या पुढें बसविण्यांत येई. हाय हाय ! या भयंकर, गलिच्छ व बेडगळ प्रकाराची नुसती कल्पना के तरीहि आपल्या अंगावर आज शहारे येतात. पण त्यावेळचा स हिंदुसमाज डोळ्यांवर कातडें ओढून केशवपनाच्या निर्दय चालील संमति देत होता !

अण्णा जेव्हां विधुर झाले तेव्हां त्यांचें वय ३३ वर्षांचें होतें एवढ्या वाढलेल्या वयांत एकाद्या आठदहा वर्षांच्या कुमारिकेशीं ल करणें म्हणजे त्या मुलीवर भयंकर अन्याय करण्यासारखें होईल अ अण्णांना मनापासून वाटत होतें. एकादी वीस पंचवीस वर्षांची प्रौ



कुमारिका मिळाली असती तरी तिच्याशीं विवाह करण्यांत अण्णांना फारसें गैर वाटलें नसतें. परंतु त्या काळांत जास्तींत जास्त म्हणजे बारा-तेरा वयापर्यंतच्या अविवाहित मुली मिळूं शकत. स्त्रीशिक्षणाची सुरुवात झाली नसल्यानें शिक्षणासाठीं जसें हल्लीं मुलीचें लग्न लांबतें तसें त्या काळीं लांबत नसे. त्यामुळें, आपल्या द्वितीय विवाहाबद्दल सर्व बाजूंनीं व सारासार बुद्धीनें विचार केल्यानंतर अण्णांच्या मनांत एकच विचार कायम झाला आणि तो म्हणजे 'मी पुन्हां लग्न करीन तर विधवेशींच करीन' हा होय.

* * *

## प्रकरण चोविसावें

## ' माझे अश्रू पूस '

केशवपनाच्या चालीमुळें व दुसरें लग्न करावयाचें नाहीं या बंधनामुळें आपल्या समाजांतील विधवांवर किती भयंकर अन्याय होत असे यासंबंधीं अण्णांच्या मनांत ते लहान असल्यापासूनच विचार येऊं लागले होते. त्यांचे गुरुजी श्री. सोमण व मुरूड येथील त्यावेळचे एक वजनदार नागरिक श्री. पांडुरंग दाजी बाळ यांच्या, विधवांच्या परिस्थितीसंबंधानें आपआपसांत ज्या चर्चा चालत त्या अण्णांनीं लहानपणीं लक्षपूर्वक ऐकल्या होत्या. विष्णुशास्त्री पंडित यांनीं विधवांच्या उन्नतीकरितां चालविलेल्या प्रयत्नांची हकीगतहि अण्णांनीं सोमण गुरुजींकडून ऐकली होती. विष्णुशास्त्री पंडितांनीं लिहिलेलें कांहीं लेखहि अण्णांच्या वाचनांत आले होते. १८६७ सालीं महाराष्ट्रांत जो विधवाविवाह घडून आला त्यामुळें मुरूड गांवांत जी खळबळ

उडाली तींत बाळ व सोमण गुरुजी यांनीं विधवाविवाहाचें कसें सम
केलें हें अण्णांनीं पाहिलें होतें.

विधवांच्या परिस्थितीसंबंधानें अण्णांच्या अंतःकरणांत विशे
कळवळा व सहानुभूति निर्माण झाली ती मात्र मुंबईस आल्यावर ते
त्यांनीं नरहरपंतांच्या वडील बहिणीची जी दुर्दशा व छळणूक पाहिले
त्यामुळें होय. नरहरपंतांची वडील बहीण—हिला आक्का म्हणत—
अत्यंत गुणी स्त्री होती. परंतु दुर्दैवानें वैधव्य नशिबीं आल्यानें तिल
फार मानहानी सोसावी लागली. इच्छा नसतांना तिला केशवप
करून घ्यावें लागलें. या प्रसंगानंतर तिनें अंधारी खोली फारश
सोडली नाहीं. कधींहि गोड खाल्लें नाहीं. अखेरीस अन्न तोडलें
आजारांत औषध घेतलें नाहीं. सुमारें सहासात वर्षे तिनें
यमयातना भोगली. परंतु हें सर्व शांतपणें व कोणावर न चिडतां केलें
परंतु आक्काच्या या बलिदानामुळें अण्णांच्या अंतःकरणाला चटक
बसला व अशा अनेक आक्कांचे अश्रू पुसण्यासाठीं आपणच कां पु
सरसावूं नये असा विचार त्यांना अस्वस्थ करूं लागला.

आक्काच्या उदाहरणामुळें अण्णांच्या विचारांत क्रांति घडून आली
आसपासच्या इतर शेंकडों विधवांचीं दुःखें अधिक स्वच्छपणें
स्पष्टपणें त्यांना समजूं व जाणवूं लागलीं. पुरुषाला जें सामान्यत
अशक्य असतें तें, म्हणजे स्त्री मनाचे क्लेश व दुःखें समजून घेणें,
अण्णांना शक्य होऊं लागलें. अण्णांच्या मनाची ही उत्क्रांति त्यांच्या
आप्तांना व मित्रांना न समजण्यासारखी होती. अण्णांचें अंतःकरण
अण्णांचें हृदय इतर पुरुषांपेक्षां निराळ्या व उच्च पातळीवर पोचू
लागलें होतें.

पुण्याला आल्यानंतर सुधारकाग्रणी प्रिन्सिपल आगरकर यांचा प्रत्यक्ष
परिचय अण्णांना लाभूं शकला. त्यामुळें स्त्रियांसंबंधीं अण्णांच्या मनांत



निर्माण होऊं लागलेला कळवळा अधिकच पक्का झाला. त्यामुळेंच "माझीं दुःखें हलकीं कर, माझे अश्रू पूस" अशी स्त्रीजातीनें मारलेली करुण हांक त्यांच्या कानांत सदैव घुमूं लागली.

* * *

## प्रकरण पंचविसावें

* * * * * * * * * * * * * * *

# अण्णांनीं पुनर्विवाह केला

विधवेशीं विवाह करण्याचा निश्चय अण्णांनीं केला खरा, पण तो तडीस नेण्याबाबत दोन अडचणी होत्या. त्यांतील पहिली, आईची व वडील बंधूंची संमति मिळविणें व दुसरी, अनुरूप विधवा स्त्री शोधणें.

यांतील पहिल्या अडचणीसंबंधीं अण्णांनीं सत्याग्रहाचे व आत्मक्लेशाचे मार्ग चोखाळले. आई व दादा यांना त्यांनीं असें कळविलें कीं, "कुमारिकेशीं लग्न करायला माझ्या मनाची तयारी होत नाहीं हें तुम्हांला माहीतच आहे. आणि विधवेशीं लग्न करायला तुमची संमति मिळणें जर शक्य नसेल तर एकच मार्ग माझ्यापुढें शिल्लक राहतो; तो म्हणजे यापुढील सर्व काळ विधुरावस्थेंत घालवावयाचा."

अण्णांची ही निर्वाणीची व कठोर प्रतिज्ञा ऐकून आईला व दादांना फार दुःख झालें. अण्णांची बाजू नैतिक दृष्ट्या आपल्यापेक्षां श्रेष्ठ पातळीवर आहे हें त्या दोघांनीं ओळखलें होतें. शिवाय अण्णांचा निश्चयी स्वभाव त्यांना माहीत होता. तेव्हां त्यांनीं पड खायची ठरविली. त्यांनीं अण्णांना कळविलें कीं, "आम्हांला आमच्या परिस्थितींत सोडून देऊन तुझ्या मनाला योग्य दिसेल तें कर."

अण्णांना अशी मोकळीक देण्यांत आई व दादा यांच्या मनाचा थोरपणाच सिद्ध झाला. असो. अशा प्रकारें अण्णांची पहिली अडचण दूर झाली.

दुसरी अडचण दूर होण्याबाबत दैवानें त्यांना अनपेक्षितपणें हात दिला.

अण्णांना पुण्याला येऊन सुमारें दीड वर्ष पुरें होत आलें होतें. त्या सुमारास नरहरपंतांचे वडील (यांना बाबा म्हणत) आपल्या विधवा मुलीला भेटण्याकारितां ( हिचें नांव गोदूबाई ) पुण्याला आले होते. गोदूबाई त्या वेळीं पंडिता रमाबाईंनीं चालविलेल्या 'शारदासदन' या विधवांच्या संस्थेंत शिकत होती. पंडिता रमाबाई ही एक अलौकिक स्त्री होती. ती स्वतः विधवा होती. जन्मानें ती हिंदू होती. परंतु पुढें ख्रिश्चन झाली होती. हिंदु विधवांच्या उन्नतीकारितां शारदासदन ही संस्था त्यांनीं चालविली होती. ११ मार्च १८८९ रोजीं ही संस्था मुंबईंत सुरू झाली होती. त्या संस्थेच्या गोदूबाई या पहिल्या विद्यार्थिनी होत्या. पुढें ही संस्था मुंबईहून पुणें येथें हलविण्यांत आली होती. त्यामुळेंच गोदूबाईंना भेटण्याकारितां बाबा पुण्याला आले होते.

नरहरपंतांच्या मैत्रीमुळें त्यांच्या कुटुंबांतील सर्वच मंडळी अण्णांच्या परिचयाची झाली होती. त्यामुळें पुण्यास आल्यावर बाबा स्वाभाविक-पणेंच अण्णांना भेटले. त्यामुळें विधवेशीं विवाह करण्यासंबंधींचे अण्णांचे विचार बाबांना ऐकावयास मिळाले. हे विचार ऐकत असतांना अचानकपणें बाबांच्या मनांत कल्पना आली कीं, 'गोदूबाईशींच अण्णांचा विवाह झाला तर किती छान होईल ?'

पुढील गोष्टी झटपट घडून आल्या. सनातनी वृत्तीच्या नातेवाईकां-कडून जरी जोराचा विरोध झाला तरी अण्णांची आई व वडील बंधू तटस्थ राहिले. ते लग्नाला आले नाहींत. प्रिन्सिपल आगरकर व राम-



भाऊ जोशी यांच्या सहीनें निमंत्रणपत्रिका छापण्यांत आल्या व ११ मार्च १८९३ रोजीं विवाह-समारंभ साजरा झाला.

अण्णा किती खंबीरपणें वागूं शकतात हें सिद्ध झालें.

* * *

## प्रकरण सव्विसावें

* * * * * * * * * * * * * * * *

## जीवनाचें आव्हान

अण्णा व आनंदीबाई ( गोदूबाईंचे विवाहानंतरचें नांव अण्णांनीं आनंदीबाई असें ठेवलें. ) यांनीं जेव्हां विवाह केला तेव्हां समाजाकडून आपला किती छळ होईल याची खरी कल्पना त्यांना कितपत आली होती कोणास ठाऊक ! प्रत्यक्षांत जें घडून आलें तें मात्र भयंकर होतें. महाराष्ट्रांतील बहुसंख्य वृत्तपत्रांनीं त्यांच्या विवाहावर टीकास्त्र सोडलें व हिंदुधर्म बुडविण्याचें पाप त्यांच्या माथीं मारलें.

मुरुडकरांनीं तर यावरहि कळस केला. विवाहानंतर दोनतीन महि-न्यांनीं जेव्हां अण्णा मुरुडास गेले तेव्हां 'गांवकी' ( म्हणजे गांवांतील ब्राह्मणांची सभा) भरवून त्यांनीं पुढील तीन निर्णय घेतले:–(१) धोंडो-पंतांना एका बैठकीवर बसवूं नये. (२) ते ज्या सभेंत असतील त्या सभेला कोणी जाऊं नये. (३) या मे महिन्यानंतर ते पुनः येऊन आपले कवाडींत पाऊल टाकतील तर त्यांचे बंधू भिकाजीपंत यांच्यावर बहिष्कार घालावा.

या तीन निर्बंधांचें आतां हंसूं आल्यावांचून राहात नाहीं. परंतु त्या काळांत हे निर्बंध रोजच्या व्यवहारांत सहन करणें हें किती अपमाना-स्पद व जाचक वाटलें असेल याची वाचकांनीं कल्पना करावी.

गांवकीनें अण्णांवर कठोर बंधनें घातल्यामुळें आईला व दा फार दुःख झालें. अण्णांचा छळ पाहून त्यांचें मन भयंकर कष्टी दादा कांहीं दिवस भ्रमिष्टासारखे व वेड्यासारखे वागूं लागले. दादांच्या मनावर झालेल्या या आघातामुळें अण्णा अधिकच कष्टी झाले.

खुद्द पुण्यांतहि अण्णांना कमी विरोध सहन करावा लागला अ नाहीं. विशेषतः आनंदीबाईंना भोंवतालच्या स्त्रियांकडून फार मानहा सहन करावी लागली.

परंतु हा सर्व छळ सहन करीत असतांना अण्णांचें व आनंदीबाईंचेंहि मन बिथरलें नाहीं. पुनर्विवाह करण्यांत आपण योग्यच गो केली या विचारावरील त्यांची श्रद्धा कमी झाली नाहीं. उलटपक्षीं, अधिकाधिक खंबीर होत गेली. एकादें आव्हान पुढें उभें राहिलें कीं माणसांतील सुप्त शक्ति प्रचंड वेगानें जागृत होते. पुनर्विवाहामुळें समाजानें त्यांचा जो छळ केला त्यामुळें अण्णा व आनंदीबाई यांच्या पुढें एक नवें जबरदस्त आव्हान उभें राहिलें होतें.

* * *

## प्रकरण सत्ताविसावें

* * * * * * * * * * * * * * *

## स्त्रियांचा कैवारी

आपण कोणतेंतरी समाजकार्य करावें अशी जी तळमळ किंवा हुरहुर अण्णांच्या हृदयांत विद्यार्थिदशेपासून होती, तिला योग्य प्रकारचें क्षेत्र पुनर्विवाह करावा लागल्यामुळें अण्णांना सांपडलें. ही घटना केवळ योगायोगानेंच घडून आली. अण्णांची पहिली पत्नी निवर्तली नसती तर अण्णा विधवांच्या कार्याकडे वळले असते कीं नाहीं याबद्दल शंका आहे. माणसाच्या वैयक्तिक जीवनांत घडणाऱ्या दुःखद गोष्टी-



पासूनहि समाजाला उपयोगी होणाऱ्या कार्याचा उगम कसा होऊं शकतो हें अण्णांच्या पुनर्विवाहापासून आपणांला दिसून येतें.

वरील विवेचनाचा असा अर्थ मात्र कोणी घेऊं नये कीं, अण्णांनीं विधवेशीं विवाह केला म्हणूनच त्यांनीं जन्मभर लोकसेवेचें कार्य केलें. अण्णांसारखा माणूस हा स्वस्थ बसण्याच्या प्रवृत्तीचा नव्हता. त्यामुळें लोककार्याचें कोणतेंतरी क्षेत्र निवडून आपलें तनमनधन त्यांनीं समाजरूपी मातेला अर्पण केलेंच असतें.

परंतु विधवांसंबंधींचें कार्यक्षेत्र डोळ्यापुढें स्पष्ट दिसूं लागल्यानंतर अण्णांनीं आपल्या सर्व शक्ति त्या कार्यावर केंद्रित केल्या हें अत्यंत स्वाभाविक असेंच झालें. पुण्यांतील त्यांच्या नोकरीचें बस्तान सुदैवें-करून ठीक बसलें होतें; त्यामुळें कॉलेजांत शिकवून नंतर दिवसाचा उरलेला सर्व वेळ ते विधवांच्या उन्नतीसंबंधींच्या कार्याला देऊं लागले. सुट्यांमध्यें जेव्हां कॉलेज बंद राही त्यावेळीं अण्णा प्रचारासाठीं व निधी जमविण्याकरितां परगांवीं जाऊं लागले.

विधवांच्या दुःस्थितीवर कोणते इलाज योजावे याबद्दल अण्णांनीं बराच खोलवर विचार केला व नंतर आपल्या कार्याला हात घातला. या कामांत आनंदीबाईंची त्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें बरीच मदत झाली. आनंदीबाई स्वतः बालविधवा होत्या. आठव्या वर्षीं पहिलें लग्न झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांनीं त्यांचा पति निवर्तला होता. त्यानंतर सासरीं व माहेरीं अत्यंत कष्टाचे दिवस आनंदीबाईंनीं काढले होते. पुढें १८८९ सालीं केवळ योगायोगानें मुंबईला आपल्या भावाकडे ( नरहरपंतांकडे ) यावयास मिळाल्यामुळें त्याच वर्षीं सुरू झालेल्या पंडिता रमाबाईंच्या शारदासदन या संस्थेंत त्यांना प्रवेश मिळाला. पंडिता रमाबाईंच्या सान्निध्यांत चार वर्षें राहून स्त्रियांच्या उन्नतीसंबंधींच्या आधुनिक विचारांशीं आनंदी-

बाईंचा दाट परिचय झाला होता. पंडिता रमाबाई या कांहीं वर्षें अमेरिकेंत राहून तेथील स्त्रियांची प्रगति व सुस्थिति पाहून आलेल्या होत्या. पंडिता रमाबाईकडून आनंदीबाईंनीं जें जें ग्रहण केलें होतें तें तें त्यांनीं अण्णांच्या कानावर घातलें असेल हें उघड आहे.

ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा फुले, न्यायमूर्ति रानडे, प्रिन्सिपल आगरकर आणि इतर मातबर समाजसुधारकांचे लेख वाचून आपल्याकडील स्त्रियांची उन्नति परदेशांतील स्त्रियांप्रमाणें सर्व बाजूंनीं झाली पाहिजे व त्याकरितां त्यांना लहानपणापासून शिक्षण देऊन मोठेपणीं पुरुषांप्रमाणेंच विकासाची संधि दिली पाहिजे अशा प्रकारचीं अण्णांची मतें बनत चाललीं होतींच. शिवाय कांहीं विधवांचे हाल व दुःखें समक्ष पाहावयास मिळाल्यानें त्यांच्या हृदयांत स्त्रीजातीविषयीं कळवळा निर्माण झाला होताच. परंतु आनंदीबाईंच्या तोंडून स्वतःची सर्व कहाणी साक्षात् ऐकावयास मिळाल्यानें स्त्रियांच्या उन्नतीसंबंधींच्या अण्णांच्या विचारांना व कल्पनांना अधिक बळकटी आली.

त्यामुळेंच आनंदीबाईशीं विवाह झाल्यावर अवघ्या वर्षभराच्या आंतच अण्णांनीं आपल्या सार्वजनिक कार्याचा झेंडा उभारला. एकाद्या धर्माचा किंवा पंथाचा प्रचार करणारीं माणसें जसें देहभान विसरतात, आपल्या वैयक्तिक सुखांना क्षुल्लक लेखूं लागतात व आपल्या संसाराची उपेक्षा करूं लागतात त्याप्रमाणेंच अण्णांचें थोड्या वर्षांतच झालें. आपल्या संसारावरून त्यांचें चित्त उडालें. स्त्रियांच्या उन्नतीचे विचार त्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळूं लागले. इतकी अपूर्व उत्कटता जेव्हां एकाद्या जीवात्म्यांत दिसूं लागते त्यावेळीं परमात्म्याची कृपा त्याच्यावर होऊं लागते असा प्रेषितांच्या जीवनावरून जो अनुभव आपण पाहातों तो अण्णांच्या बाबतींतहि खरा ठरूं लागला.

अण्णांनीं आपल्या कार्याला सुरुवात केल्यानंतर पहिलीं कांहीं वर्षें त्यांना फार कष्टाचीं गेलीं. त्यावेळच्या समाजांतील बहुसंख्य मंडळी विधवांच्या विवाहाला व स्त्रियांच्या उन्नतीला विरोध करणारी होती. त्यांनीं अण्णांच्या वाटेंत अनेक अडथळे निर्माण केले. परंतु अण्णांनीं आपले प्रयत्न चिकाटीनें चालू ठेवले. प्रथमतः त्यांनीं विधवांचे विवाह जमविण्याकरितां प्रचारकार्य सुरू केलें, नंतर विधवांच्या शिक्षणाकरितां प्रयत्न सुरू केले. त्यानंतर विधवांसाठीं आश्रम काढला, तसेंच कुमारिका व विधवा अशा सर्व प्रकारच्या स्त्रियांना शिक्षण देण्याकरितां शिक्षणसंस्था सुरू केल्या. असे हे अण्णांच्या कार्याच्या प्रगतीचे प्रमुख टप्पे आहेत.

एवढें मात्र खरें कीं, पन्नास–साठ वर्षांपूर्वीं स्त्रीसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीकरितां शुद्धबुद्धि व प्रगतिपर विचार यांनीं प्रेरित होऊन अहर्निश झटणारा अण्णांसारखा दुसरा पुरुष महाराष्ट्रांतच काय परंतु अखिल भारतांत नव्हता. म्हणूनच ‘ स्त्रियांचा कैवारी ’ या शब्दांनींच अण्णांचें वर्णन करणें सर्वथैव उचित होईल.

* * *

## प्रकरण अठ्ठाविसावें

# अपूर्व यशाचे धनी

अण्णांनीं आपलें कार्य १८९३ सालीं ‘ विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी ’ची स्थापना करून सुरू केलें. १८९६ सालीं ‘ अनाथ बालिकाश्रम ’ ही संस्था त्यांनीं स्थापिली. १९०० सालच्या जून महिन्यांत अण्णांनीं आपला आश्रम हिंगण्यास नेला. पुढें १९०७

8719

सालीं त्यांनीं ' महिला विद्यालया ' ची स्थापना केली. १९१५ सालीं महिलांसाठीं एक स्वतंत्र विद्यापीठ सुरू केलें.

विधवा-विवाह-मंडळीच्या स्थापनेपासून महिलांसाठीं स्वतंत्र विद्यापीठ काढण्यापर्यंत उण्यापुऱ्या तेवीस वर्षांत अण्णांनीं जी प्रगति केली ती त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करतां अत्यंत आश्चर्यकारक समजली पाहिजे. अण्णांनीं स्थापलेल्या संस्थांची तपशीवार हकीगत येथें सांगणें स्थलाभावीं मला शक्य नाहीं. परंतु ही सर्व हकीकत अनेक नाट्यपूर्ण प्रसंगांनीं भरलेली आहे. अण्णांनीं लिहिलेल्या स्वतःच्या ' आत्मवृत्तां 'त ही हकीकत विस्तारानें देण्यांत आली आहे, त्यांच्या ' आत्मवृत्तां 'ची नवी आवृत्ति १३-४-५८ रोजीं हिंगणें स्त्रीशिक्षण संस्थे-तर्फे प्रकाशित करण्यांत येत आहे. त्यांत त्यांच्या संस्थांची समग्र व अद्ययावत् हकीगत रसाळपणानें सांगण्यांत आली आहे. ती तुम्हीं अवश्य वाचावी अशी माझी शिफारस आहे.

हातीं घेतलेल्या कार्यांत अण्णांना जें यश लाभलें आहे तें मात्र अभूतपूर्व असें आहे. हजारों विधवांना व कुमारिकांना त्यांनीं आपल्या संस्थांच्या द्वारां सुमार्ग दाखविला आहे हें तर त्यांचें यश आहेच; परंतु आपल्या समाजांतील पुरुषवर्गाच्या विचारांत व आचारांत क्रांति घडवून आणून त्यांनीं आजच्या पिढींतील सर्वसाधारण स्त्रीचें जीवन पूर्वींपेक्षां कितीतरी अधिक सुखी व स्वतंत्र केलें आहे. ही त्यांची कामगिरी अतिशय महत्त्वाची समजली पाहिजे. साठ-सत्तर वर्षांपूर्वीं ज्या मुलीला वयाला आठदहा वर्षें होतांच संसारांत अडकावें लागे, दुर्दैवानें वैधव्यावस्था वाट्याला आल्यास ती निमूटपणें सहन करावी लागे व सर्व जन्म हालांत काढावा लागे; त्या मुलीला आज विद्यापीठांतील शिक्षण घेण्याची, कोणताही व्यवसाय करण्याची व स्वतःच्या संमतीनें



निवडलेल्या पुरुषाशीं विवाह करण्याची जी मुभा मिळाली आहे त्याचें सर्व श्रेय अण्णांच्या प्रयत्नांनाच दिलें पाहिजे.

अण्णांचें कार्य अत्यंत अवघड असूनहि त्यांना इतकें अपूर्व यश कसें मिळवितां आलें ?

वरील प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास अण्णांच्या यशाचें श्रेय त्यांच्यांतील पुढील विशिष्ट गुणांनाच द्यावें लागेल.

( १ ) **आपल्या अंगीकृत समाजकार्याची मर्यादा नीट घालून घेणें**—याबाबत अण्णांनीं कौशल्यानें अनेक पथ्यें पाळलीं. स्त्रियांचें कार्य सोडून अन्य कार्यांत त्यांनीं कटाक्षानें लक्ष घातलें नाहीं. त्यामुळें सर्व धर्मांच्या लोकांची व राजकीय पक्षांची सहानुभूति ते आपल्या कार्याला मिळवूं शकले.

( २ ) **मुख्य तत्त्व सांभाळून लहानसहान बाबतींत तड-जोडीची वृत्ति ठेवणें**—स्त्रियांचे प्रश्न वगळून अन्य धार्मिक चाली-रीतींविषयीं ( उदा० सोंवळेओवळें पाळणें, श्रावणी करणें ) अण्णांनीं तडजोडीची वृत्ति ठेवली. त्यांनीं स्वतःचा पुनर्विवाह जुन्या शास्त्रा-प्रमाणें करून घेतला. या समेटवादी वृत्तीमुळें अण्णांना फारसा उघड विरोध सहन करावा लागला नाहीं.

( ३ ) **सोशिकपणा**—कोणीहि अण्णांवर टीका केली तरी अण्णा ती शांतपणें सहन करीत. प्रखर गलिच्छ टीका सहन करण्याचे अनेक कटु प्रसंग त्यांच्यावर आले. पण त्यावेळीं अण्णांनीं लोकांची टीका शांतपणें ऐकली, ते स्वतः रागावले नाहींत. आपल्या वृत्तीची नम्रता व प्रसन्नता कमी होऊं दिली नाहीं. त्यामुळें त्यांचे टीकाकारच हळूहळू विरघळत गेले.

**(४) हिशेबांतील व व्यवहारांतील चोखपणाः**—याबाबत अण्णांनीं फार मोठा लौकिक संपादिला. त्यामुळें त्यांच्या संस्थांना देणगी देण्यास

गरीब-श्रीमंत लोक आजहि तत्पर असतात. महाराष्ट्रांत व भारतांतच नव्हे, तर जगांतील सर्व प्रमुख देशांत स्वतः हिंडून अण्णांनीं पैसा मागितला व लोकांनीं त्यांना तो विश्वासानें दिला.

(५) **वर्तनांतील निर्मळपणाः**—अण्णांच्या जीवनांत आंतबाहेर असें त्यांनीं कांहीं ठेवलें नाहीं. फार थोड्या सार्वजनिक कार्यकर्त्यांना हें साधूं शकतें. सर्व जन्म स्त्रियांच्या संस्थांत काम करूनहि अण्णांनीं आपलें चारित्र्य स्वच्छ ठेवलें आहे.

(६) **अपार कष्ट घेण्याची तयारीः**—चंदनाप्रमाणें झिजत झिजत अण्णांनीं आपलें सेवाव्रत आचरिलें आहे. फार थोड्या समाजसेवकांनीं त्यांच्याइतकें पायीं हिंडून आपल्या जीवनकार्याचा प्रचार केला असेल व इतरहि कष्ट रात्रंदिवस सोसले असतील. वयाला पंचाण्णव वर्षें पूर्ण होईपर्यंत आपल्या संस्थांच्या महत्त्वाच्या सभांना ते हजर राहात असत. व अद्यापहि साधेल त्यावेळीं संस्थेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहून कार्यकर्त्यांना उत्तेजन देत असतात.

(७) **श्रद्धाशील वृत्ति व नवे प्रयोग करण्याची तयारीः**—अण्णांच्या वृत्तींत उतावीळपणा नाहीं; उलट कमालीचा संथपणा आहे. स्त्रियांमध्यें आढळतो तसा वृत्तीचा भाविकपणा त्यांच्यांत आहे. त्यामुळें अंगीकृत कार्यावरील त्यांची श्रद्धा केव्हांहि कमी झाली नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या स्वभावांत नवनवे प्रयोग करण्याची हौस मुरलेली आहे. एकदां एकादी गोष्ट ठरली कीं, कितीहि अडचणी आल्या तरी अण्णांची श्रद्धा दुर्बल होत नाहीं. परंतु त्याबरोबरच आपल्या श्रद्धेची तपासणी करून एकादा नवा प्रयोग आवश्यक ठरला तर जुन्या प्रयोगाला अण्णा अत्यंत निष्ठुरपणें सोडूनहि देऊं शकतात. अण्णांच्या वृत्तींतील हा लवचिकपणा असामान्य आहे.

वरील सात प्रमुख गुणांमुळें अण्णांना आपल्या समाजकार्यांत अपूर्व



यश लाभलेलें आहे. हें ध्यानीं घेऊन वाचकांनीं अण्णांच्या जीवनाचा अधिक अधिक खोलवर अभ्यास सवड सांपडेल तेव्हां करावा अशी माझी सूचना आहे.

* * *

## प्रकरण एकोणतिसावें

* * * * * * * * * * * * * * *

## अण्णांचा स्वभाव व आवडीनिवडी

' मोठ्या ' किंवा ' थोर ' माणसांसंबंधींचें आपलें कुतूहल, औत्सुक्य अमर्याद म्हणजे कधीं न संपणारें असतें, नाहीं का? जितकी अधिक माहिती या माणसांबद्दल समजेल तितकी आपल्याला हवीच असते.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या शत्रूंना आपल्याप्रमाणेंच मोठ्या माणसांनाहि तोंड द्यावें लागतें. त्यांना रोज जेवावें लागतें. स्नान करावें लागतें, व्यायाम करावा लागतो, आपल्याप्रमाणें प्रसंगीं रागवावें लागतें, प्रसंगीं राग आवरावा लागतो. कुटुंबांतील लहानसहान प्रश्न सोडवावे लागतात.

या सर्व प्रसंगांतून त्यांचा स्वभाव दिसून येतो व आवडीनिवडी समजून येतात. आणि हे प्रसंग समजले म्हणजे त्या मोठ्या माणसाची व आपली खरीखुरी ओळख झाली असें आपल्याला वाटायला लागतें. मोठ्या माणसांचें 'अलौकिक कार्य' समजावून घेऊन त्यांच्या जीवनाच्या ' सार्वजनिक ' बाजूचा परिचय आपल्याला झालेला असतो. परंतु ' खाजगी ' बाजूचा परिचय झाला म्हणजे आपणाला अधिक आनंद वाटतो; अधिक आपुलकी वाटते.

अण्णांची सोबत त्यांच्या ज्या पत्नीनें १८९३ पासून १९५० पर्यंत

केली तिच्याकडून अण्णांचा स्वभाव व आवडीनिवडी याबाबत ऐकायास मिळालें तर तुम्हांला आवडेल, नाहीं का? सुदैवानें आनंदीबाईंनीं मरणापूर्वी आपलें आत्मचरित्र लिहिलें व १९४४ सालीं 'माझें पुराण' या नांवानें तें प्रसिद्ध झालें. १९५० सालीं त्याची दुसरी आवृत्ति निघाली. हें पुस्तक तुम्ही वाचावें अशी माझी आग्रहाची शिफारस आहे. त्यांत तुम्हांला अण्णांच्या खाजगी जीवनाचें खरेखुरें दर्शन घडेल.

'माझें पुराण' मध्यें आनंदीबाईंनीं अण्णांसंबंधीं बरीच माहिती सांगितली आहे. नमुना म्हणून त्यांतील थोडी हकीकत पुढें देत आहें.

आनंदीबाई म्हणतात :

" कर्वे हे खाण्यापिण्याच्या बाबतींत अतिशय साधे व म्हणूनच माझे दिवस निभले. मी जें खायला घालीन तें ते खात असत. फोडणीचा भात व शिळी भाकर त्यांना फार आवडते. फोडणीचा भात असला आणि शिळा कसा घालावा असें म्हणून जर बाजूला ठेवला तर मुद्दाम मागून घेतील. भाकरी शिळीच खुसखुशीत लागते म्हणून हवी. पोळीचें तर वावडेंच. त्यांनीं कधीं कोठल्या गोष्टीला नांवें ठेवलीं नाहींत किंवा अमूक पदार्थ आज कां झाला नाहीं म्हणून डोक्यांत राख घातली नाहीं. गार असो, गरम असो, खारट असो, तुरट असो, प्रत्येक गोष्ट त्यांनीं गोड करून घेतली.

नाहीं म्हणायला कर्व्यांना एकच खोड आहे आणि ती म्हणजे तुपाची. त्यांना तूप साजूक असेल तर थोडेसें चालतें पण शिळें असलें कीं अगदीं डोकें फिरून जातें.

कर्वे जितके शांत तितकेच रागीट. त्यांच्या स्वभावांत अत्यंत राग व अत्यंत शांतपणा दिसतो.

त्यांना संवय अशी कोणतीच नाहीं. नाहीं म्हणायला फिरायची



आहे. पण तें सुद्धां दिवसाच्या कोणत्याहि प्रहरांत फिरलेलें चालतें. फिरायला डोंगर किंवा रस्ताच पाहिजे असें नाहीं. बोटींतसुद्धां फिरतात किंवा लहानसा व्हरांडाहि चालतो.

त्यांचा स्वभाव कमालीचा एकमार्गी. आपण बरें कीं आपलें काम बरें. कोणाच्या अध्यांत मध्यांत नसायचे; इतकेंच नव्हे तर आजूबाजूला त्यांचें लक्षहि जायचें नाहीं.

कर्व्यांचा स्वभाव बोलका नाहीं. ते फार अबोलपणानें व भिडस्तपणानें वागतात.

एकंदरींत कर्वे फार शांत व धिम्या वृत्तीचे. अत्यंत करारी, हेकट म्हणा. संसाराकडे स्वतः मन घालीत नसत. पण माझा कारभार त्यांनीं मला करूं दिला. त्यामुळें मला स्वातंत्र्य मिळालें व माझीहि प्रगति झाली. "

अण्णांसंबंधीं लिहितांना आनंदीबाईंनीं पुढीलप्रमाणें शेवट केला आहे:—

" केव्हां तरी गंमतीनें बोलणें निघालें म्हणजे मी म्हणतें, 'उगीच लोकांनीं तुम्हांला 'महर्षि' नांव दिलें. नुसतें म्हणून घ्यायला काय? मी जर घरांत सर्व पहायला नसतें तर तुम्ही काय केलें असतेत? मी होतें म्हणूनच तुम्ही एवढे मोठे झालांत.'

हें आपलें मजेचें बोलणें; पण खरें म्हटलें, तर एवढ्या मोठ्या थोर गृहस्थाची मी बायको आहे व त्यांच्या कामांत मला थोडीबहुत मदत करतां आली, या कल्पनेनें मला किती आनंद व समाधान होतें त्याचें वर्णन करतां येणार नाहीं. "

* * *

प्रकरण तिसावें

* * * * * * * * * * * * * * *

## आजचे ' भारतरत्न ' अण्णा

हल्लीं अण्णांचा मुक्काम नेहमीं एरंडवण्यास त्यांचे चिरंजीव डॉ. दिनकरराव यांच्याकडे असतो. एरंडवणा ही पुण्यांतीलच एक नवी वस्ती आहे. या पुस्तकाची छपाई चालू असतांना एके दिवशीं मी दिनकररावांच्या घरीं गेलों होतों. पण अण्णांची भेट पडली नाहीं. अण्णा हिंगण्यास गेले आहेत असें समजलें.

मनांतून मी थोडा खट्टू झालों. अण्णांची भेट मला हवी होती तांतडीनें हवी होती. कारण या पुस्तकांत छापण्यासाठींच त्यांच्याकडून एक संदेश मला घ्यायचा होता.

त्यामुळें दिनकररावांच्या बंगल्यांतून बाहेर पडतांना मी असें ठरविलें कीं, असेंच तडक हिंगण्यालां जायचें. म्हणून मी हिंगण्याकडे जाणारी बस पकडली.

आजचा योग अपूर्व होता. हिंगण्याच्या संस्थांचे थोर संस्थापक आपल्या कर्मभूमीवर उपस्थित असतांनाच त्यांचें दर्शन मला घडणार होतें.

ते पहा अण्णा ! लांबवरच्या एका झाडाखालीं अण्णा एका दहा-बारा वर्षांच्या मुलीजवळ बोलत असलेले दिसले. मी झपाझपा पावलें उचलीत तेथें जाऊन पोंचलों व कांहीं आवाज न करतां जवळच उभा राहिलों.

त्या मुलीनें अण्णांची स्वाक्षरी घेतली. नंतर मी अण्णांना नमस्कार केला व माझ्या येण्याचा उद्देश सांगितला. त्यावर ते म्हणाले, ' चला, माझ्या झोंपडींत जाऊं व तेथेंच बोलूं. '



आम्ही दोघे बरोबर चालू लागलों व ' मूळ झोंपडी ' अशी पाटी लावलेल्या खोलींत शिरलों. माझ्या जीवनांतील हा क्षण अमोल होता. ज्या झोंपडींत १९०० सालच्या जून महिन्यांत अण्णांनी आपल्या ' अनाथ बालिकाश्रमा ' चें काम हिंगण्यास सुरू केलें त्याच पवित्र वास्तूंत मी संस्थापकाच्या सान्निध्यांत होतों.

मोहरीहूनहि लहान असलेल्या बीजांतून महान् वटवृक्ष निर्माण होतो. तसेंच अण्णांच्या कार्याचें झालें आहे. ' मूळ झोंपडी ' किती लहान व जुनाट ! आसपास केवढाल्या टोलेजंग इमारती. ही कसली तर अध्यापिकाशाळेची, ही कसली तर दुय्यम शाळेची, ही कसली तर सभागृहाची आणि ह्या कसल्या तर वसतिगृहाच्या. छे. छे. या इमारतींना ' मूळ झोपडी 'चे वैभव कधीहि प्राप्त होणार नाहीं.

नंतर अण्णांनी एक संदेश दिला. त्यांची स्वाक्षरी घेऊन तो या पुस्तकांत छापलाच आहे.

अण्णांजवळचें माझें काम संपतें न संपतें तोंच अण्णांचे सर्वांत धाकटे चिरंजीव श्री. भास्करराव हे तेथे आले. भास्करराव कर्वे हे ' हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थे 'चे चिटणीस म्हणून काम पाहतात. आपल्या वडिलांप्रमाणेंच यांनींहि स्त्रियांच्या कार्याला आपलें जीवन वाहिलें आहे.

हिंगणें येथील सध्यांच्या कार्यासंबंधींची माहिती मी भास्कररावांना विचारली. सध्यां तेथें सुमारें ७०० विद्यार्थिनी शिकत आहेत. सुमारें ६०० वसतिगृहांत राहतात. दहा वर्षांखालील मुलग्यांना राहाण्याची परवानगी देण्यांत येते. असे सुमारें ४० मुलगे सध्यां तेथें आहेत.

१ जानेवारी १८९९ रोजीं सदाशिव पेठेंतील गोरे वाड्यांत अण्णांनीं अनाथबालिकाश्रमाला सुरवात केली तेव्हां त्या दिवशीं अवघी एक विधवा त्यांच्या आश्रमांत होती. आज तेथें शेंकडों स्त्रिया शिकत

आहेत. गेल्या अठ्ठावन वर्षांत हजारों स्त्रिया हिंगण्याला आपलें शिक्षण पुरें करून देशभर पसरल्या आहेत.

आपलें जीवितकार्य पूर्ण झालें असें अण्णांना वाटत असेल का ? बहुधा नाहीं. कारण स्त्रियांच्या जीवनांतील सर्व प्रश्न अद्यापीहि संपलेले नाहींत. समाजांतील सर्व अनिष्ट रूढींचें अद्यापीहि निर्मूलन झालेलें नाहीं. हुंडा घेण्याची चाल व पत्रिका पहाण्याची चाल मुलींच्या विवाहाच्या आड येत आहे. विवाह ठरविण्याबाबत इतरहि अनेक नव्या अडचणी निर्माण होत आहेत. पुरुषवर्गाच्या मनांत स्त्रियांसंबंधीं जेवढा आदर व समतेची भावना असणें आवश्यक आहे तेवढी अद्यापि निर्माण झालेली नाहीं. त्यामुळें स्त्रीजीवनाची गळचेपी चालूच आहे.

ही झाली पांढरपेशा समाजांतील स्त्रियांची परिस्थिति. परंतु अण्णांचें लक्ष सुरुवातीपासून केवळ वरच्या वर्गांतील स्त्रियांच्या उन्नतीकडे नव्हते. त्यांना समाजांतील सर्व जाति, धर्म व पंथ यांतील भेदाभेद नाहींसे व्हावें असें नेहमी वाटत राहिलेलें आहे. त्यांचे विचार अतिशय पुरोगामी आहेत. त्यामुळेंच 'जातिनिर्मूलन संस्था' व 'समता संघ' या संस्थांच्या कार्यांत ते गेलीं दहापंधरा वर्षें विशेष मन घालीत आले आहेत.

अस्पृश्यता-निवारण व जातिभेद-निर्मूलन याविषयीं अण्णांची मतें फार जहाल आहेत. कारण या प्रश्नांशीच स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न संलग्न आहे असें त्यांना वाटतें. समतेचे व स्वातंत्र्याचे प्रश्न हे सर्व दलितांविषयीं सारखेच असतात. त्यामुळें अण्णांना या सर्व सामाजिक प्रश्नांविषयीं आस्था वाटणें स्वाभाविक आहे.

असे आहेत हे आजचे अण्णा ! तारुण्यांतल्याइतकेंच स्त्रियांचे व दलितांचे कैवारी. परमेश्वर त्यांना दीर्घायु करो व त्यांच्या संस्थांची भरभराट करो हीच प्रार्थना.

* * *



*अण्णा ! आज तुम्हांला एकशेंएकावें वर्ष लागत आहे. हा दिवस महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या जीवनांतील एक मंगल दिवस आहे. स्त्री-वर्गाच्या व दलितांच्या संपूर्ण उद्धाराचें जें स्वप्न तुम्हीं गेलीं ऐशीं वर्षें आपल्या उराशीं बाळगलें व त्याकरितां हाडाचीं काडें केलीं तें स्वप्न सत्यसृष्टींत साकार झालेलें पहाण्याचें भाग्य तुम्हांला 'याचि देहीं, याचि डोळां' मिळो हींच आजच्या शुभदिनीं आमचीं सर्वांचीं मन:पूर्वक प्रार्थना आहे. अण्णा ! तुमचें जीवन-स्वप्न साकार करण्याकरितां आम्हीं सर्वजण शक्य तें तें सर्व करूं अशीं प्रतिज्ञा आजच्या मंगळदिनीं आम्हीं करीत आहों. अण्णा ! तुमचे आशीर्वाद हें आमचें बळ आहे.*





●●●

आहेत. गेल्या अठ्ठावन वर्षांत हजारों स्त्रिया हिंगण्याला आपलें शिक्षण पुरें करून देशभर पसरल्या आहेत.

आपलें जीवितकार्य पूर्ण झालें असें अण्णांना वाटत असेल का? बहुधा नाहीं. कारण स्त्रियांच्या जीवनांतील सर्व प्रश्न अद्यापीहि संपलेले नाहींत. समाजांतील सर्व अनिष्ट रूढींचें अद्यापीहि निर्मूलन झालेलें नाहीं. हुंडा घेण्याची चाल व पत्रिका पहाण्याची चाल मुलींच्या विवाहाच्या आड येत आहे. विवाह ठरविण्याबाबत इतरहि अनेक नव्या अडचणी निर्माण होत आहेत. पुरुषवर्गाच्या मनांत स्त्रियांसंबंधीं जेवढा आदर व समतेची भावना असणें आवश्यक आहे तेवढी अद्यापि निर्माण झालेली नाहीं. त्यामुळें स्त्रीजीवनाची गळचेपी चालूच आहे.

ही झाली पांढरपेशा समाजांतील स्त्रियांची परिस्थिति. परंतु अण्णांचें लक्ष सुरुवातीपासून केवळ वरच्या वर्गांतील स्त्रियांच्या उन्नतीकडे नव्हते. त्यांना समाजांतील सर्व जाति, धर्म व पंथ यांतील भेदाभेद नाहींसे व्हावें असें नेहमी वाटत राहिलेलें आहे. त्यांचे विचार अतिशय पुरोगामी आहेत. त्यामुळेंच 'जातिनिर्मूलन संस्था' व 'समता संघ' या संस्थांच्या कार्यांत ते गेलीं दहापंधरा वर्षें विशेष मन घालीत आले आहेत.

अस्पृश्यता-निवारण व जातिभेद-निर्मूलन याविषयीं अण्णांची मतें फार जहाल आहेत. कारण या प्रश्नांशीच स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न संलग्न आहे असें त्यांना वाटतें. समतेचे व स्वातंत्र्याचे प्रश्न हे सर्व दलितांविषयीं सारखेच असतात. त्यामुळें अण्णांना या सर्व सामाजिक प्रश्नांविषयीं आस्था वाटणें स्वाभाविक आहे.

असे आहेत हे आजचे अण्णा! तारुण्यांतल्याइतकेंच स्त्रियांचे व दलितांचे कैवारी. परमेश्वर त्यांना दीर्घायु करो व त्यांच्या संस्थांची भरभराट करो हीच प्रार्थना.

* * *



अण्णा! आज तुम्हांला एकशेंएकावें वर्ष लागत आहे. हा दिवस महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या जीवनांतील एक मंगल दिवस आहे. स्त्री-वर्गाच्या व दलितांच्या संपूर्ण उद्धाराचें जें स्वप्न तुम्हीं गेलीं ऐंशीं वर्षें आपल्या उराशीं बाळगलें व त्याकरितां हाडाचीं काडें केलीं तें स्वप्न सत्यसृष्टींत साकार झालेलें पहाण्याचें भाग्य तुम्हांला 'याचि देहीं, याचि डोळां' मिळो हीच आजच्या शुभदिनीं आमची सर्वांची मनःपूर्वक प्रार्थना आहे. अण्णा! तुमचें जीवन-स्वप्न साकार करण्याकरितां आम्हीं सर्वजण शक्य तें तें सर्व करूं अशीं प्रतिज्ञा आजच्या मंगलदिनीं आम्हीं करीत आहों. अण्णा! तुमचे आशीर्वाद हें आमचें बळ आहे.



शुक्रवार, १८ एप्रिल १९५८

●●●